मासिक वार्तापत्र • अंक 25 • मार्च 2022 • सहयोग मूल्य - रु. 5 • 16 पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


चिले: “समाजवादा”च्या नावाने पुन्हा एकदा फसवे स्वप्न! 5

रेल्वेभरती प्रक्रियेविरोधात बिहार, उत्तर प्रदेश मध्ये आंदोलन 7

स्त्री कामगारांचा संघर्ष श्रमाच्या मुक्तीच्या महान संघर्षाचा हिस्सा आहे ! 8


## पाच राज्यातील निवडणूक निकाल

### पुन्हा एकदा सिद्ध झाले की फॅसिझमला फक्त निवडणुकीच्या मार्गाने हरवणे शक्य नाही!

उत्तरप्रदेश, उत्तराखंड, पंजाब, गोवा आणि मणिपुरच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की फॅसिझमला फक्त निवडणुकीच्या मार्गाने हरवणे शक्य नाही. अतिप्रचंड बेरोजगारी, करोनाचा जबरदस्त फटका, आभाळाला भिडू पाहणारी महागाई, युक्रेन युद्धामुळे त्यात पडलेली भर, लखीमपूर खेरी आणि हाथरस सारख्या घटनांचा परिणाम, अंतर्गत लाथाळ्या या सर्वांपलीकडे जाऊन भाजप चार राज्यांमध्ये जिंकला आहे तर ‘आप’ ने पंजाबमध्ये विजय मिळवला आहे. या निवडणुकांच्या निकालांनी उदारवादी, समाजवादी लोकांच्या जातीय-धार्मिक बेरजेच्या राजकारणाला सुद्धा पुन्हा चुकीचे ठरवले तर आहेच, सोबतच धनिक शेतकरी आंदोलनाच्या जोरावर फॅसिझमला हरवण्याच्या वल्गना करणाऱ्यांना सुद्धा जोरदार चपराक दिली आहे. या निकालांनी हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की भांडवली लोकशाहीतील निवडणुकांमध्ये त्याच पक्षाच्या विजयाची शक्यता बनते ज्याच्याकडे भांडवलाचा प्रवाह वाहत असतो.

#### भांडवलाच्या शक्तीची जादू

पंजाबमध्ये आम आदमी पक्षाने मोठा विजय मिळवला आहे. शिरोमणी अकाली दल, भाजप व सत्ताधारी कॉंग्रेस यांचा सुपडा साफ झाला आहे. उत्तरप्रदेशात भाजपच्या जागा घटल्या आहेत, परंतु मतांचे प्रमाण मात्र घटलेले नाही! येथे समाजवादी पक्ष आणि भाजपमध्येच स्पर्धा आहे हे सुरुवातीपासूनच स्पष्ट होते, आणि सपाच्या जागा आणि मतं दोन्ही वाढले असले तरी भाजपला सत्तेपासून दूर करण्यापासून तो अपयशी ठरला आहे. गोव्यामध्ये आप, कॉंग्रेस आणि मगोप मध्ये झालेल्या मतविभागणीमुळे भाजपने

**संपादक मंडळ**

जवळपास बहुमत प्राप्त केले आहे. मणिपूरमध्ये तर भाजपला आह्वान देण्याकरिता कोणताही सक्षम पक्ष अस्तित्वात नव्हताच आणि 2017 पासूनच कॉंग्रेस पक्षातील बहुसंख्य ‘दिग्गज’ भाजपवासी झालेले होते. उत्तराखंडमध्ये गेल्या 5 वर्षांमध्ये भाजपला तिनदा मुख्यमंत्री बदलावा लागला. तरीही कॉंग्रेस सक्षम विरोधी पक्ष बनू न शकल्यामुळे भाजपचा विजय होणारच होता. प्रत्येक पक्षातील नेतृत्वाच्या कार्यक्षमतेचा (उदाहरणार्थ, राहुल गांधींचे नेतृत्व) नक्कीच पक्षाच्या कामगिरीवर प्रभाव पडत असतो, परंतु त्याहीपेक्षा भांडवली पक्षांकरिता सर्वात महत्वाचे असते भांडवलदारांचे समर्थन.

या सर्व विजयांमागे असलेले भांडवलाचे समीकरण सर्वात महत्वाचे आहे. हे निर्विवाद सत्य आहे की भाजप आज देशातील मोठ्या भांडवलदारांचा सर्वाधिक लाडका पक्ष आहे. याचा सर्वात स्पष्ट पुरावा राजकीय पक्षांना मिळत असलेल्या निधीपुरवठ्याच्या ‘आधिकारिक’ (कारण बेहिशोबी निधी तर यापेक्षाही खूप मोठा असतो) आकड्यांवरून मिळतो. 2021 मध्ये 7 राष्ट्रीय आणि 44 क्षेत्रीय पक्षांना उद्योगपतींकडून (आणि किरकोळ प्रमाणात लोकसंख्येच्या इतर भागांकडून) मिळून प्राप्त झालेल्या क्रमशः 6,988 कोटी आणि 2,199 कोटी रुपयांपैकी एकट्या भाजपला 4,847 कोटी रुपये मिळालेत! थोडक्यात 53 पक्षांपैकी एकट्या भाजपला 54 टक्के निधी मिळाला आहे. समाजवादी पक्षाला 563 कोटी रुपये, तर कॉंग्रेसला 588 कोटी रुपये मिळाले आहेत. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स या उदारवादी संस्थेने ही आकडेवारी प्रकाशित केली आहे. स्पष्ट आहे की 60 वर्षे भांडवलदार वर्गाची प्रामाणिकपणे सेवा करणाऱ्या कॉंग्रेसवर सध्या भांडवलदार वर्गाची खप्पामर्जी आहे. सुरुवातीला “पारदर्शकपणे” सर्व निधीची घोषणा करणारा आणि जनतेकडून निधी गोळा करणारा आम आदमी पक्ष सुद्धा आता भांडवलदार

पान 6 वर

## जगभरात व भारतातही तीव्र होत आहे आर्थिक विषमता

जयवर्धन

भारत आणि जगभरात आर्थिक विषमतेचे भीषण वास्तव समोर येत आहे. ‘इनइक्वालिटी किल्स’ या 17 जानेवारी 2022 ला प्रकाशित ऑक्सफॅमच्या रिपोर्टनुसार जगातील सर्वात श्रीमंत दहा व्यक्तींची संपत्ती गेल्या दोन वर्षांच्या महामारीच्या काळात दुपटीपेक्षा जास्त, म्हणजे 700 अब्ज डॉलर (जवळपास 53 लाख-कोटी रुपये) वरून 1500 अब्ज डॉलर (जवळपास 114 लाख-कोटी रुपये) इतकी प्रचंड वाढली आहे. म्हणजेच सेकंदाला 15,000 डॉलर किंवा दिवसाला 1.3 अब्ज डॉलर (9.8 हजार कोटी रुपये) या गतीने वाढली आहे. तर दुसऱ्या बाजूला 99 टक्के जनतेचे उत्पन्न घसरले आहे आणि 16 कोटी लोक दारिद्र्यात ढकलले गेले आहेत. जगातील सर्वात गरीब 310 कोटी लोकांकडे असलेल्या एकूण संपत्तीपेक्षा सहापट संपत्ती या दहा श्रीमंत लोकांकडे एकत्र झाली आहे. या दहा लोकांनी दिवसाला 1 कोटी रुपये याप्रमाणे जरी त्यांची संपत्ती खर्च करायचे ठरवले तर त्यांना ती संपूर्ण संपत्ती खर्च करायला तब्बल 3100 वर्षे एवढा काळ लागेल! 1995 पासून वरच्या 1 टक्के लोकांनी तळाच्या 50 टक्के लोकांपेक्षा 20 पट संपत्ती (एकूण जागतिक संपत्तीपैकी) जमवली आहे. याच रिपोर्टनुसार ही विषमता दररोज 21,300 मृत्यूंचे कारण ठरत आहे. भुकेने दरवर्षी 21 लाख लोकांचा बळी जात आहे. 56 लाख लोक आरोग्यसुविधा न मिळाल्याने जीव गमावत आहेत.

जागतिक आर्थिक विषमतेचे हे विदारक चित्र असताना भारताच्या बाबतीतही गरीब-श्रीमंत दरी आणखी खोल आहे. ऑक्सफॅमने 16 जानेवारीला प्रसिद्ध केलेल्या ‘इनइक्वालिटी किल्स - इंडिया सप्लीमेंट 2022’ च्या रिपोर्टनुसार भारतातील अब्जाधीशांची संख्या 102 वरून 142 वर गेली आहे. या अब्जाधीशांचे उत्पन्न गेल्या दोन वर्षांच्या महामारीच्या काळात—मार्च 2020 पासून नोव्हेंबर 2021 पर्यंत—23.14 लाख कोटींवरून वाढून 53.16 लाख कोटी इतके झाले आहे. जगात 24 व्या व भारतात दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या गौतम अडाणीची संपत्ती गेल्या एक वर्षाच्या काळात आठ पट वाढली आहे. 2020 मध्ये 8.9 अब्ज डॉलर (67 हजार कोटी रुपये) असलेली अडानीची संपत्ती 2021 मध्ये 82.5 अब्ज डॉलर (6 लाख 27 हजार कोटी रुपये) वर पोहोचली आहे. मुकेश अंबानीची संपत्ती 36.8 अब्ज डॉलरवरून (2 लाख 79 हजार कोटी रुपये) दुप्पट होत 2021 मध्ये 85.5 अब्ज डॉलर (6 लाख 49 हजार कोटी रुपये) झाली आहे. 98 सर्वात श्रीमंत व्यक्तींवर लावलेल्या 1 टक्के कराच्या रकमेत आयुष्यमान भारत योजना 7 वर्षे चालू शकते असे तज्ज्ञांचे अनुमान आहे. तसेच त्यांच्यावरील 4 टक्के कराच्या रकमेत मध्यान्ह भोजन योजना 17 वर्षे किंवा समग्र शिक्षण अभियान 6 वर्षे चालू शकते. तळाच्या 50 टक्के जनतेकडे राष्ट्रीय संपत्तीचा केवळ 6 टक्के हिस्सा आहे. FAO च्या अन्न सुरक्षा आणि पोषण स्थिती 2021 च्या रिपोर्टनुसार भारतात 20 कोटी लोक कुपोषित आहेत. जागतिक कुपोषित लोकसंख्येच्या 25 टक्के लोक भारतात आहेत.

या सर्व आकड्यांवरून हे अगदी स्पष्ट दिसत आहे की गेल्या दोन वर्षांच्या काळात जनता एका बाजूला दुःखाने होरपळून निघत असताना, रोजगार व भुकेसाठी वणवण फिरत असताना, आरोग्याच्या खर्चापायी

पान 7 वर

# क्रिप्टोकरन्सी (कूटचलन): जुगाराचे अजून एक साधन

पान 4 वरून

भांडवलशाही विरोधातील हत्यार समजू लागलेत!

### केंद्रिय "छपाई" नसणे?

बिटकॉईनला एखादी रिझर्व बँकेसारखी बँक "छापत" (म्हणजे खरेतर याबाबतीत संगणकावर निर्माण करत) नाही, त्यामुळे त्याला कोणीही "छापू" शकते असे काहींना वाटते. परंतु बिटकॉईन सारखे चलन "छापले" कसे जाते? संगणक वापरून एक अतिशय जटील गणित सोडवले की बिटकॉईन तयार होतो. याला बिटकॉइन "मायनिंग" म्हणतात. याकरिता तुमच्याकडे गरज आहे संगणकीय शक्तीची (म्हणजे भांडवलाची) आणि वीजेवर खर्च करण्याच्या आर्थिक क्षमतेची (म्हणजे पुन्हा भांडवलाचीच!). आज 1 बिटकॉइन कमवायला एका अमेरिकन घराला 9 वर्ष वापरता येईल एवढी वीज लागते. म्हणजेच एका व्यक्तीला आज हे शक्य नाही. त्यासाठी आज मोठ्या कंपन्या तयार झाल्या आहेत ज्यांना 'बिटकॉइन मायनिंग फार्म्स' म्हटलं जातं. आज बिटकॉइन मायनिंग साठी लागणारी वीज एकूण जागतिक वापराच्या 1% च्या जवळ पोचली आहे. त्यामुळे बिटकॉइन मायनिंग तेच करू शकतील ज्यांच्याकडे गुंतवायला तेवढे भांडवल आहे. भांडवलच केंद्रित असेल तर चलन निर्मिती सुद्धा केंद्रिकृतच होत जाणार. एकंदरीत किती बिटकॉईन निर्माण होतील याचा आकडा सुद्धा सॉफ्टवेअरने ठरवून दिला आहे, त्यामुळे "छपाई" संपल्यानंतर अस्तित्वात असलेले बिटकॉईनच संचयाचे साधन बनतील.

### गोपनीयता: एका मर्यादेपर्यंतच

क्रिप्टोकरन्सीच्या गोपनीयतेच्या गुणवैशिष्ट्याबद्दल वारंवार बोलले जाते. पण जर का क्रिप्टोकरन्सी खरंच एक चलन म्हणून सगळीकडे वापरास आली तर कोणत्याही व्यवहारामध्ये वाद झाल्यास (आणि असे वाद होणारच!), व्यक्तिंच्या पडताळणीसाठी आणि भांडवली देवाणघेवाणीच्या व्यवहारांना कायदेशीर संरक्षण देण्यासाठी ज्यांनी व्यवहार केला त्यांची ओळख या ना त्या मार्गाने पटवावीच लागेल. उदाहरणार्थ भारतात क्रिप्टोकरन्सी वापरासाठी के.वाय. सी लागू करणे, यासारखी पावले लागू होतील. थोडक्यात, गोपनीयता तोपर्यंतच असू शकते जोपर्यंत लोक कायद्याच्या चौकटीच्या बाहेर राहून काम करण्यास तयार होतील, जे बाजाराच्या व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात शक्य नाही!

### सुरक्षिततेच्या मर्यादा

क्रिप्टोकरन्सीचे व्यवहार आणि एकंदरीतच क्रिप्टोकरन्सी खूप सुरक्षित आहे असे बोलले जाते पण मानवीय चुकांमुळे क्रिप्टोकरन्सी सुद्धा असुरक्षित असू शकते आणि क्रिप्टोकरन्सी चोरीला जाण्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. 2011 मध्ये एम.टी गोक्स नावाच्या ऑनलाईन बिटकॉइन एक्सचेंज मधून 3700 कोटी रुपये एवढे बिटकॉईन्स चोरीला गेले. ही चोरी बिटकॉइनच्या नेटवर्क मध्ये असलेल्या चुकीमुळे शक्य झाली.

### भांडवलदार वर्गामधील अंतर्गत मतभेद

आजच्या घडीला विविध देशातील भांडवलदार वर्ग क्रिप्टोकरन्सीकडे विविध प्रकारे बघत आहेत, कारण त्यांच्यामध्येच या तंत्रज्ञानाबद्दल मतभेद आहेत. चीन, रशिया मध्ये क्रिप्टोकरन्सीवर बंदी घालण्यात आली आहे, सिंगापुर क्रिप्टोकरन्सीला एक माल म्हणून बघते, फिनलंड त्याला डिजिटल माल मानते. भारतात सुद्धा क्रिप्टोकरन्सी कायदेशीर चलन नाही, परंतु त्यावर बंदी सुद्धा नाही. म्हणजे आज क्रिप्टोकरन्सी बद्दल जगभरात काहीच सुसंगत धोरणं नाहीत आणि भांडवलदार वर्गामध्ये सुद्धा काही प्रमाणात गोंधळाचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत बिटकॉईनसारख्या विकेंद्रित क्रिप्टोकरन्सीचे एकंदर चरित्र पाहता ते कायदेशीर चलन म्हणून सर्व देशांना स्विकार्य नाही, कारण त्यामुळे केंद्रिय बँकांचा आणि त्यामार्फत असलेला भांडवलदारांचा अर्थव्यवस्थेवरील ताबा सुटेल. यामुळेच भारतासारखे देश आता केंद्रिय बँकेमार्फतच क्रिप्टोकरंसीचे चलन आणण्याचा विचार करत आहेत! क्रिप्टोकरंसी नंतर बाजारावरचे नियंत्रण आणि नियमन कसे टिकवता येईल, भांडवली कायद्याच्या चौकटीत व्यवहार कसे घडवता येतील, भांडवली व्यवस्था दीर्घकाळात कसा आकार घेईल याबद्दलच्या अनिश्चिततांमुळे हे मतभेद आहेत. क्रिप्टोकरंसीचा वापर, तिचे केंद्रिय किंवा विकेंद्रित स्वरूप, गोपनीयता इत्यादींबद्दल भांडवलदार वर्गाच्या गटांमध्ये जरी मतभेद असले तरी बाजाराची व्यवस्था चालवणे, नफा-मजुरीची व्यवस्था चालवणे, भांडवलाचे एकंदरीत अर्थव्यवस्थेवर नियंत्रण कायम ठेवणे याबाबत मात्र त्यांच्यामध्ये कोणतेही मतभेद नाहीत!

### कामगार वर्गाचा दृष्टिकोन

पण आज क्रिप्टोकरन्सी असो वा नसो कामगारांच्या आयुष्यात काहीच फरक पडणार नाही! मूळ प्रश्न उत्पादनाच्या साधनांच्या मालकीचा आहे, उत्पादित मालाच्या वितरण व्यवस्थेचा नाही. कामगार-कष्टकरी वर्ग आपल्या मेहनतीतून संपत्ती निर्माण करतो, परंतु बाजाराच्या व्यवस्थेमध्ये तो सतत पिचलेलाच राहतो. त्यामुळे या कामकरी वर्गाने क्रिप्टोकरन्सीच्या नवीन जुगारात सहभागी न होता भांडवली व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले पाहिजेत जी आज कामकरी वर्गाला भूक, गरिबी, बेरोजगारी शिवाय काहीच देऊ शकत नाही!

---

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.


• रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. 9619039793, 9082861727
• अहमदनगर : 74992 64646
• पुणे : 8669735643


---

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

---

**बिगुल व्हॉट्सॲप चॅनेल**

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सॲप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सॲप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704**

---



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**

---


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | kamgarbigul@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 100 (टपाल शुल्कासह) |

## नेटवर्क मार्केटींगचा भुलभुलैया

# जनतेला मूर्ख बनवून पैसा कमावण्याची अजून एक सट्टेबाज प्रवृत्ती

✎ राहुल

नेटवर्क मार्केटींगच्या नावाने झटपट श्रीमंत होण्याची स्वप्ने दाखवत असंख्य कायदेशीर आणि बेकायदेशीर योजना आज भारतात सर्रास राबवल्या जात आहेत. या सर्व योजना कामकरी वर्गातील लोकांना लुटून मुठभरांचे खिसे भरण्याचे मार्ग आहेत. नेटवर्क मार्केटींग ही संकल्पनाच मूळातून अत्यंत बोगस आहे आणि तिचे कोणतेही रूप जनतेला श्रीमंत तर करू शकत नाहीच, उलट कोट्यवधी लोकांच्या घामाच्या कमाईला मूठभर लबाडांच्या खिशात घालण्याचे काम मात्र या योजनांद्वारे चालू आहे. कामकरी वर्गाने या सर्व योजनांचे खरे स्वरूप, त्यामागचे अर्थकारण, खरे अर्थशास्त्र समजले पाहिजे आणि या परिवर्तनाच्या खऱ्या मार्गाकडे वळले पाहिजे.

"घरबसल्या पैसे कमवा", "पार्ट टाईम काम करून पैसे कमवा" अशा जाहिराती आज बस, रेल्वे पासून ते अनेक सार्वजनिक जागी लागलेल्या दिसतात. सिग्नलवर छोटी पत्रके वाटत अनेक युवक-युवती पैसे कमावण्याचे प्रलोभन इतरांना दाखवताना दिसतात. हे सर्व युवक नेटवर्क मार्केटींगच्या विविध योजनांचे बळी आहेत. ऍमवे, ईझीवेज, आर.सी.एम., एम.आय. मार्केटींग, व्हेस्टीज, फ्युचर मेकर, एवोन, ओरिफ्लेम, मोदीकेअर अशा अनेक कंपन्या आज नेटवर्क मार्केटींग या तंत्राचा वापर करून "माल" विकण्याच्या बहाण्याने एकीकडे लोकांना फुकट राबवून घेत आहेत, आणि दुसरीकडे जनतेला फसवून पैसे हडपत आहेत. कसे ते समजून घेऊया.

नेटवर्क मार्केटींग च्या योजना विविध प्रकारांनी समोर येतात. त्यांच्या वैविध्यामुळे सुद्धा अनेकदा सर्वसामान्य माणसांना फरक करता येत नाही, आणि गोंधळून ते अशा योजनांना बळी पडतात. परंतु या सर्व योजनांमध्ये समान वैशिष्ट्य असते ते 'पिरॅमिड' संरचनेचे.

### पिरॅमिड स्किम म्हणजे काय?

कोणत्याही मालाच्या विक्रीशिवाय असलेल्या शुद्ध स्वरूपातील पिरॅमिड स्किममध्ये तुम्हाला हे सांगितले जाते की तुम्ही अमुक (समजा रु. 5,000) रक्कम कंपनीकडे गुंतवायची. यानंतर तुम्ही काही व्यक्तींना, उदाहरणार्थ 4, या स्किममध्ये गुंतवणूक करण्यास सांगायचे. या लोकांनी पैसे जमा केल्यानंतर तुम्हाला त्यांनी जमा केलेल्या रु. 5,000 पैकी काही रक्कम परत मिळेल. उदाहरणार्थ 4 लोक जोडल्यास प्रत्येकी 1,000 म्हणजे एकूण 4,000 रुपये लगेच परत मिळतील. नंतर तुम्ही जोडलेल्या लोकांनी परत असेच करायचे. या 4 लोकांकडून दुसऱ्या "पायरी"चे 4 गुणिले 4 म्हणजे 16 लोक जोडले गेल्यानंतर तुम्हाला त्यांनी गुंतवलेल्या प्रत्येकी रु. 5,000 पैकी काही रक्कम (समजा रु. 500) मिळेल. उदाहरणार्थ, दुसऱ्या "पायरी" च्या 4 गुणिले 4 म्हणजे 16 लोकांनी प्रत्येकी रु. 5,000, म्हणजे कंपनीला एकूण रु. 80,000 दिल्यावर त्यांच्या वरच्या पायरीच्या प्रत्येक व्यक्तीला 4,000 (म्हणजे एकून रु. 16,000 )आणि तुम्हालाही रु. 4,000 परत मिळतील. थोडक्यात दुसऱ्या पायरीला गेल्यावर तुम्हाला चक्क अतिरिक्त रक्कम मिळेल. स्किम जसजशी वाढत जाईल तसतसे तुम्हाला घरबसल्या पैसे मिळतील.


वरील वर्णनामध्ये रक्कम, व्यक्तींची संख्या, तुम्हाला मिळणारा वाटा हे बदलू शकतात. परंतु हे प्रलोभन बदलू शकत नाही की जसजसे लोक जोडले जातील तुम्हाला मिळणारे पैसे वाढत जातील. अनेक तथाकथित "सुशिक्षित" लोक सुद्धा अशा योजनांना बळी पडत आहेत.

या योजनेचा फोलपणा दोन अर्थांनी समजून घेतला पाहिजे. सर्वप्रथम गणिती पद्धतीने. अनेकांना असे वाटते की अशा योजना चालत राहिल्या तर पृथ्वीवरील सर्व माणसे सामावून घ्यायला शेकडो वर्षे वगैरे लागतील. खरेतर अशा योजना चालतच नाहीत याबद्दल पुढे मांडले आहेच, परंतु समजा अशा योजना चालत जरी राहिल्या असत्या तरी 4 गुणिले 4 गुणिले 4 असे करत जगाची लोकसंख्या संपायला फक्त 17 पायरी पुरेशा आहेत! लोभ-लालसा, स्वार्थ यापायी आंधळे झालेले लोक हा प्रश्नही विचारत नाहीत की योजना आपल्या पर्यंत आली आहे तेव्हा आपण कितव्या पायरीवर आहोत!

दुसरे आणि सर्वात महत्वाचे, ज्याबद्दल पुढे विस्ताराने मांडणी केली आहे, ते म्हणजे विना मेहनत, काहीही माल निर्माण न करता, पैशाने पैसा कमावणे म्हणजे फक्त एका खिशातील पैसा दुसऱ्या खिशात जाणे असते, थोडक्यात संपत्ती निर्मिती नाही तर लूट असते. तेव्हा अशा योजनांमध्ये एकतर तुम्ही लुटखोर आहात किंवा लुटले जात आहात! बहुसंख्य कामकरी लोकांच्या बाबतीत तर ते लुटले जात आहेत हेच खरे आहे. आता याच पिरॅमिड स्किमचे अजून फसवे रूप म्हणजे नेटवर्क मार्केटींग म्हणजे काय ते बघूयात.

### नेटवर्क मार्केटींगचा भुलभुलैया

नेटवर्क मार्केटींग मध्ये पिरॅमिड स्किम सोबत माल विक्री सुद्धा जोडली जाते. पैशातून पैसा कमावला जात आहे हे लपवण्याचा केविलवाणा प्रयत्न करण्याकरिता हे केले जाते. ऍमवे हे याचे एक प्रसिद्ध उदाहरण आहे. यात कंपनी म्हणते की तुम्ही आम्हाला सामील व्हा(यालाच 'आयडी' बनवणे असेही म्हणतात), नंतर आम्ही तुम्हाला काहीतरी माल देऊ, जो तुम्ही विकायचा. या मालाच्या विक्रीच्या बदल्यात कंपनी तुम्हाला कमिशन पण देईल (काही वेळेस माल विकूनही थोडा नफा मिळेल). परंतु पुढे जाऊन तुम्ही अजून माल विक्रेते जोडायचे. तुम्ही जोडलेल्या या विक्रेत्यांनी विकलेल्या मालाच्या बदल्यातही तुम्हाला कमिशन दिले जाईल. परंतु तुम्हाला कमिशन कोणत्या दराने दिले जाईल हे मात्र एकूण विक्रीवर अवलंबून असते, आणि तुम्ही जोडलेले विक्रेते (आणि त्यांनी पुढे जोडलेले विक्रेते) जितके जास्त, तितकी विक्री जास्त आणि तितका कमिशनचा दरही वाढतो. थोडक्यात तुम्ही (विनामजुरी!) मालही विकायचा आणि इतर विक्रेतेही जोडायचे.



अशा पद्धतीने सर्वप्रथम या कंपन्या तुम्हाला विनावेतन सेल्समनचे काम करायला लावतात आणि मजुरी वाचवतात. दुसरीकडे यात हा आभास जरी असला की माल विकला जात आहे, तरीही ही योजना पिरॅमिड स्किमचेच एक बदललेले फसवे रूप आहे.

या योजना विकताना खूप भारी छपाई असलेले माहितीपुस्तक देतात, त्यामध्ये स्वर्गासारख्या आयुष्याचे फोटो, विदेशात फिरायला जाण्याचे आमीष, 1-2 जणांच्या "यशगाथा" छापलेल्या असतात जेणेकरुन तुम्हाला प्रलोभन वाटावे. पण या योजना पिरॅमिड स्कीमच आहेत, कारण की तुम्ही जितके जास्त सेल्समन कामाला लावू शकाल तितक्याच प्रमाणात तुमचे "उत्पन्न" वाढते. जर तुम्ही तेवढे सेल्समन कामाला लावू शकला नाहीत, तर तुम्हाला स्वत:ला विनावेतन अतिशय जास्त विक्री करावी लागेल, जी शक्य नसते! थोडक्यात सतत वाढत राहणाऱ्या पिरॅमिडच्या आधारावरच या स्किम चालतात. उदाहरणार्थ ऍमवेच्या स्कीममध्ये तुम्ही 16,000 रुपयांची विक्री केली तर 3 टक्के कमिशन आहे, परंतु त्याच्या 50 पट विक्री केल्यावर, म्हणजे 8 लाखांची विक्री केल्यावर कमिशन 21 टक्के होते, म्हणजे 7 पट वाढते. थोडक्यात जास्त दराने कमिशन मिळवायला विक्री मात्र त्यापेक्षा खूपच जास्त दराने वाढवावी लागते. हा भ्रम आहे की हे एक "पार्ट-टाईम" काम आहे, खरेतर किमान उत्पन्न मिळवण्याकरिता सुद्धा वास्तवात तुम्हाला 8 नाही तर 10-12 तास सुद्धा काम करावे लागते!

या योजनांमध्ये कधी कंपनी तुम्हाला माल अगोदर विकत घ्यायला लावते तर कधी माल विकून कंपनीला पैसे द्यायला लावते. जर तुम्ही माल कंपनीकडून विकत घेत असाल, तर तुमचे स्वत:चे पैसे गुंतवले जातात आणि स्वाभाविकपणे माल विकण्याचे मोठे दडपण तमच्यावर असते. आणि जरी कंपनीने तुम्हाला माल उधार दिला असेल, तरीही कमिशनवर किंवा थोडक्यात पिरॅमिड वाढण्यावरच तुमचे उत्पन्न अवलंबून असते.

आज 30 लाखांहून जास्त लोक ऍमवे सारख्या कंपनीकरिता फुकट राबत आहेत. अनेक अभ्यास झाले आहेत ज्यांच्यानुसार अशाप्रकारच्या नेटवर्क मार्केटींग मध्ये गुंतलेल्या 99 टक्क्यांवर लोकांना कधीही "फायदा" होतच नाही, उलट ते पैसे गमावतात, आणि ते फुकट राबणारे नोकरच बनतात! फायदा फक्त पिरॅमिडच्या टोकाला असलेल्या 1 टक्के लोकांना होतो, जे अशा योजना सुरू करणारे अतिश्रीमंत लोक असतात. थोडक्यात गरिबांची संपत्ती श्रीमंतांच्या खिशात जाण्याचा हा अजून एक मार्ग आहे! ऍमवे सारख्या कंपन्यांविरोधात अनेकदा खटले भरले गेले आहेत, परंतु पैशाच्या जोरावर, कायद्याच्या खाचाखोचा शोधून, या कंपनीने नेहमीच कायद्याच्या कचाट्यातून सुटका करवली आहे. ऍमवे कंपनीवर तर अमेरिकेमध्ये शेकडो खटले दाखल केले गेले आहेत. भारतातही ऍमवे वर 2006 मध्ये आंध्र प्रदेशात, 2011 व 2013 मध्ये केरळ मध्ये, 2016 मध्ये हरियाणात खटले दाखल झाले परंतु यांमध्ये काहीही सिद्ध झाले नाही. हीच स्थिती इतर अनेक नेटवर्क मार्केटींग कंपन्यांची आहे.

### संपत्ती कशी निर्माण होते?

जगात संपत्तीचे दोनच स्त्रोत आहेत. एक निसर्ग आणि दुसरा उत्पादक मानवी श्रम. पैसा हा फक्त वस्तूंच्या देवाणघेवाणीचे साधन आहे, खरी संपत्ती तर वस्तू आणि सुविधांच्या रूपात असते. थोडक्यात संपत्ती निर्माण होते ती कारखान्यांमध्ये, शेतामध्ये आणि सुविधांच्या रूपात (शिक्षण, आरोग्य, प्रवास, मनोरंजन, इत्यादी). जिथे संपत्ती निर्माण होते, तिथे सुद्धा कामगारांच्या श्रमातूनच ती सर्व संपत्ती निर्माण होते, परंतु भांडवली उत्पादन व्यवस्थेमध्ये जो मालक असतो त्याच्या खिशात या संपत्तीचा खूप मोठा वाटा जातो, आणि कामगारांना फक्त मजुरीएवढी संपत्ती हातात येते.

विक्री प्रक्रियेत तर कोणतीही संपत्ती निर्माण होत नाही. विक्रीमध्ये अगोदरच (म्हणजे श्रमातून, उत्पादन प्रक्रियेत) निर्माण झालेली संपत्ती, म्हणजे माल, एकाकडून दुसऱ्याकडे जाते. इथेही पैसा फक्त माध्यम असतो. कोणत्याही प्रकारच्या पिरॅमिड स्कीम मध्ये, नेटवर्क मार्केटींग मध्ये कधीही कोणतीही संपत्ती तयारच होत नसते त्यामुळे अशा सर्व योजना मूळातच फसव्या असतात. त्यामुळे अशा योजना जेव्हा प्रत्येकाला श्रीमंत होण्याचे स्वप्न दाखवतात, तेव्हा ती फसवणूकच असू शकते. या योजना फक्त काही जणांच्या खिशात अगोदरच असलेला पैसा मूठभरांच्या खिशात नेऊन ठेवतात. थोडक्यात नेटवर्क मार्केटींग जुगाराचा सर्वात वाईट प्रकार आहे!

### कामगार वर्गाचे निम्न-भांडवलीकरण

नेटवर्क मार्केटींग सारख्या योजना फक्त कामगार-कष्टकरी वर्गाची फसवणूकच करत

पान 14 वर

# क्रिप्टोकरन्सी (कूटचलन): जुगाराचे अजून एक साधन

✎ सुस्मित

गेल्या काही वर्षात क्रिप्टोकरन्सीचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलाय. क्रिप्टोकरन्सी मध्ये पैसे गुंतवा आणि झटपट श्रीमंत व्हा अशा प्रकारच्या ऑनलाईन जाहिरातींचा सुळसुळाट झालाय. भारतात 10 कोटी लोकं क्रिप्टोकरन्सी बाळगतात आणि जगात क्रिप्टोकरन्सीच्या वापरकर्त्यांच्या यादीत अव्वल स्थानावर येतो. यात काहीच नवल नाहीये. कारण भारतात कामकऱ्यांमध्ये आज रोजगाराच्या संधी अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे त्याला क्रिप्टोकरन्सीमध्ये पैसे गुंतवून श्रीमंत होण्याची स्वप्न दाखवली जात आहेत. याचसाठी एकीकडे क्रिप्टोकरन्सी कशी काम करते, ती कागदी चलनापासून वेगळी कशी, ती कामकऱ्यांच्या आयुष्यात क्रांतिकारी परिवर्तन करू शकते का, हे समजणे हे आवश्यक आहे. तर दुसरीकडे क्रिप्टोकरन्सीच्या मागील भ्रामक वैचारिक धारणा समजून त्यांचा वैज्ञानिक पद्धतीने उहापोह करणे आवश्यक आहे.

### क्रिप्टोकरन्सी म्हणजे नेमके काय आणि ती कशी काम करते?

क्रिप्टोकरन्सीला, म्हणजे कूटचलन, एक प्रकारचे डिजिटल चलन म्हटले जाऊ शकते. जसे कागदी चलन असते, म्हणजे रुपया, डॉलर इत्यादी; तसेच क्रिप्टोकरन्सीचे विविध प्रकार अस्तित्वात आहेत. बिटकॉइन ही सर्वप्रथम अस्तित्वात आलेली क्रिप्टोकरन्सी होती पण आजघडीला बिटकॉइन सोडून इथेरियम, टेदर अशा एकूण तब्बल 6,000 प्रकारच्या क्रिप्टोकरन्सी अस्तित्वात आहेत. क्रिप्टोकरन्सी हातात कधीच येत नाही; फक्त ऑनलाईन खात्यात दिसते आणि म्हणायला वस्तू विकत घ्यायला सुद्धा या चलनाचा वापर होऊ शकतो; पण वास्तवात मात्र यांचा वापर गोष्टींच्या देवाणघेवाणीसाठी कमी आणि गुंतवणुकीसाठी, सट्ट्यासाठीच होताना दिसतो.

दुसरीकडे, अनेकांना क्रिप्टोकरन्सीच्या चलनाच्या वापरापेक्षा तिच्या मागच्या तंत्रज्ञानात काही दूरगामी फायदे दिसतात. हे फायदे काय आहेत ते आपण पुढे बघू त्याआधी क्रिप्टोकरन्सी मागील तंत्रज्ञान काय आहे ते समजून घेऊ. क्रिप्टोकरन्सीच्या मागील तंत्रज्ञानाला डिस्ट्रीब्युटेड लेजर टेकनोलोजी (Distributed Ledger Technology) म्हणतात. म्हणजे उदाहरणाकरता बिटकॉइनच्या सगळ्या व्यवहारांची नोंदवही एका केंद्रिकृत संगणकावर नाही, तर जगभरातल्या शेकडो संगणकांवर विकेंद्रीत असते. यामुळेच, बिटकॉइनच्या सगळ्या व्यवहारांची नोंद आणि नियंत्रण बँक, सरकार किंवा इतर कोणतीही वित्तीय संस्था करत नाही तर ती सर्वांना ज्ञात असलेल्या सॉफ्टवेअरने नियंत्रित केली जाते. ही नोंद जगातल्या अनेक संगणकांवर विकेंद्रीकृत असते आणि गणितीदृष्ट्या जटील पण सुरक्षित असे क्रिप्टोग्राफीचे (cryptography) तंत्र वापरुन अशी व्यवस्था केली जाते की कोणी एक व्यक्ती यामध्ये फेरफार करू शकणार नाही. म्हणूनच क्रिप्टोकरन्सीला सुरक्षित समजले जाते.

### क्रिप्टोकरंसी: सट्टेबाजीचे अजून एक उपकरण!

क्रिप्टोकरन्सीच्या वापराची सुरुवात 2008 नंतरच्या जागतिक आर्थिक मंदीच्या काळापासून पासून झाली आणि गेल्या 10 वर्षात क्रिप्टोकरन्सी अधिक लोकप्रिय होत गेली. आधी म्हटल्याप्रमाणे क्रिप्टोकरन्सीसारख्या डिजिटल चलनाचा वापर वस्तूंच्या देवाणघेवाणीसाठी कमी आणि गुंतवणूक आणि सट्ट्यासाठी होत आहे. आज (म्हणजे हा लेख लिहिला गेला त्या दिवशी!) एका बिटकॉइनची किंमत 32 लाख रुपये एवढी आहे! इथे आपल्याला हे समजले पाहिजे की आजच्याघडीला क्रिप्टोकरन्सी वापरून तुम्ही बाजारात सध्यातरी थोड्याच गोष्टी विकत घेऊ शकता; पण दुसऱ्या बाजूला क्रिप्टोकरन्सी चलन म्हणून स्थापित झाली



नसतानाही क्रिप्टोकरन्सी मध्ये गुंतवणूक सतत वाढत आहे. याच्यामागचे कारण आहे सट्टेबाजी आणि ते समजून घेतले पाहिजे. 2008 पासून जग वैश्विक मंदीतून जात आहे. भांडवलशाहीच्या नैसर्गिक गतीतून नफ्याच्या घसरत्या दराची प्रवृत्ती निर्माण होते आणि आज पुन्हा जग त्याच मंदीच्या स्थितीत पोहोचले आहे. त्यामुळे आज भांडवल गुंतवून भरघोस नफा मिळवायची साधने फारच कमी उपलब्ध आहेत. परिणाम आहे सट्टेबाजी. ही सट्टेबाजी शेअरबाजारापासून ते खेळापर्यंत आणि घरांपासून ते क्रिप्टोपर्यंत अनेक गोष्टींमध्ये चालू आहे. यामुळेच क्रिप्टोकरंसीचे दर दर मिनिटाला प्रचंड खालीवर होतात! सट्टेबाजीमुळेच क्रिप्टोकरन्सी मध्ये पैसा गुंतवणं अतिशय जोखमीचं असतानाही यावर प्रचंड गुंतवणूक केली जात आहे. अनेकजण यामध्ये बर्बाद सुद्धा झाले आहेत. उदाहरणार्थ, जानेवारी 2022 मध्ये बिटकॉइन ची किंमत 12% ने घसरली आणि एकूण 1 लक्ष कोटी डॉलर एवढे बाजार मूल्य कमी झाले.

**क्रिप्टोकरन्सी प्रचलित होण्याचे एक मुख्य कारण तिच्या समर्थनात दिले जाणारे वैचारिक तर्क आहेत. या तर्कांची पडताळणी आणि भ्रमांचे निराकरण आवश्यक आहे.**

### विकेंद्रीकरणाचा भ्रम

सर्वात आग्रही क्रिप्टोकरन्सी समर्थक म्हणतात की क्रिप्टोकरन्सी सरकारांच्या केंद्रिय नियंत्रणापासून मुक्त असेल. जसे रुपयाला नियंत्रित करायचे काम रिझर्व बँक ऑफ इंडिया करते त्याचप्रकारे क्रिप्टोकरन्सीला कुणी एक केंद्रीय संस्था, बँक नियंत्रित करत नाही. यांचा असा दावा आहे की, क्रिप्टोकरन्सीला जगभरातल्या तिला वापरणाऱ्या लोकांचे जाळे संचालित करते आणि "नियंत्रण" फक्त सॉफ्टवेअर करते, जे व्याख्येनुसारच भेदभाव करत नाही. क्रिप्टोकरन्सीच्या याच विकेंद्रीकृत गुणवैशिष्ट्याचे तुणतुणे क्रिप्टोकरन्सी समर्थक वाजवत राहतात. भांडवलशाहीतील अर्थव्यवस्थेच्या प्रश्नांना सोडविण्याचे उत्तर म्हणून याकडे बघितले जात आहे.

या लोकांची समस्या ही आहे की ते चलन नियंत्रणाच्या केंद्रिकरणाला भांडवलशाहीची समस्या मानतात, जेव्हा की ती समस्या नाहीच. क्रिप्टोकरन्सीच्या मागील तंत्रज्ञानाचे प्रामुख्याने उदारमतवादी-अराजकतावादी लोक समर्थन करत आहेत. त्यामागे त्यांची व्यवस्थेची चुकीची समज कारणीभूत आहे. त्यांच्यामते आजच्या व्यवस्थेच्या प्रश्नांच्या मुळामध्ये विविध प्रकारच्या संस्था आहेत ज्यांचे स्वरूप केंद्रीय आहे. त्यांना हे समजत नाही की केंद्रिय बँकांसारख्या वित्तीय संस्था आकाशातून नाही तर भांडवलशाहीच्या नैसर्गिक गतीने निर्माण झाल्या आणि भांडवलाची गरज म्हणून क्रिप्टोकरन्सीच्या जगामध्ये सुद्धा पुढे जाऊन अशा संस्था निर्माण होतील, ज्यांच्यावर प्रभावीरित्या मोठ्या भांडवलाचे नियंत्रण असेल. खरा फरक याने पडतो की या केंद्रीय संस्थांवर सत्ता कोणाची आहे: कामगार वर्गाची का भांडवलदारांची, पण हा प्रश्न मात्र क्रिप्टोकरंसी समर्थकांच्या ध्यानीमनीही नाही!

दुसरे, त्यांना हे समजत नाही की भांडवलशाहीच्या प्रश्नांचे मूळ उत्पादनाच्या पद्धतीत आहे, ना की वितरणामध्ये. असमान विनिमय हा मूळात बाजारात खरेदी विक्रीमध्ये होत नाही तर उत्पादन प्रक्रियेमध्ये होतो. भांडवली उत्पादन पद्धतीत कामगार त्याची श्रमशक्ती भांडवलदाराला विकतो आणि त्याबदल्यात त्याच्या समतुल्य मजुरी मिळवतो. परंतु श्रमशक्ती ही ती गोष्ट आहे जी कार्यान्वित झाल्यानंतर, म्हणजे श्रमात रूपांतरीत होताना, तिच्या स्वत:च्या मूल्यापेक्षा जास्त मूल्य निर्माण करते. थोडक्यात उत्पादन प्रक्रियेमध्येच अतिरिक्त संपत्तीसह संपूर्ण उत्पादित संपत्ती तयार होते. याच एकंदरीत संपत्तीचा छोटा भाग असतो मजुरी आणि मोठा भाग असतो भांडवलदारांचा नफा. अशा व्यवस्थेमध्ये फक्त चलन विकेंद्रीकृत करून काय होणार? ना तुमची मजुरी बदलेल, ना मालकांचा नफा! पुढे, जर तुम्ही आज गरीब असलात, तर उद्या क्रिप्टोकरन्सी आल्यानंतर सुद्धा तुम्ही गरीबच रहाल, म्हणजे रुपये देऊन क्रिप्टोकरंसी विकत घेण्यापासून ते क्रिप्टोकरंसीद्वारे इतर काही माल विकत घेण्याकरिता गरिबांकडे पैसे कुठे आहेत? क्रिप्टोकरंसी आहे म्हणून ना रोजगार निर्मिती होईल, ना बाजाराच्या मूलभूत नियमांना काही फरक पडेल!

आर्थिक संकटं का येतात? भांडवलशाही व्यवस्थेचा प्रमुख अंतर्विरोध हा आहे की एकीकडे ती उत्पादनाचे सामाजिकीकरण करत जाते आणि दुसरीकडे (नफ्याच्या रूपाने) संपत्तीचे खाजगी हस्तगतीकरण होत राहते. ज्या व्यवस्थेत उत्पादन सामाजिक आहे आणि विनियोग खाजगी आहे, ज्या उत्पादनाच्या पद्धतीत अराजकता आहे, ज्या व्यवस्थेत उत्पादन मानवी गरजा भागवण्यासाठी नसून नफ्यासाठी आहे, ती व्यवस्था मूळातच अन्यायपूर्ण आहे. मार्क्सने शिकवल्याप्रमाणे, भांडवलशाहीत आर्थिक संकटे येतात कारण की स्पर्धेच्या दबावापोटी सर्व भांडवलदारांना यंत्र, तंत्रज्ञान इत्यादींमध्ये प्रचंड गुंतवणूक करावी लागते (याला स्थिर भांडवल म्हणतात), ज्यापोटी माल तर स्वस्त होतो, पण वाढत्या स्थिर भांडवलामुळे नफ्याच्या दराच्या घसरणीची प्रवृत्ती निर्माण होते. हाच नफ्याचा दर जेव्हा अर्थव्यवस्थेच्या स्तरावर घसरू लागतो, तेव्हा गुंतवणूक मंदावते, कारखाने बंद होतात, बेरोजगारी अजून वाढते आणि भांडवली विकासाचे चक्र थांबू लागते. क्रिप्टोकरंसी ही समस्या सोडवू शकत नाही!

याची दुसरी बाजू ही सुद्धा आहे की भांडवलशाहीत भांडवलाचे मूठभरांच्या हाती केंद्रीकरण (centralisation) आणि एकंदरीत भांडवल संचय वाढणे, म्हणजे संकेंद्रीकरण (concentration) ही नियमित चालणारी प्रक्रिया आहे. म्हणजे भांडवलशाहीत भांडवल मूठभरांच्या हातात मोठ्या प्रमाणात सतत जमा होत जाते. क्रिप्टोकरन्सीच्या बाबतीत सुद्धा हे दिसत आहे. क्रिप्टोकरन्सीला जनतेचे चलन वगैरे म्हटले जाते पण जसे भारतात वरच्या 10% लोकांकडे 40% संपत्ती एकटवलेली आहे त्याचप्रमाणे जगभरात वरच्या 0.01% बिटकॉइन मालकांकडे 27% बिटकॉइनची मालकी आहे. हे नॅशनल ब्युरो ऑफ इकॉनॉमिक रिसर्च (NBER) या अमेरिकी संस्थेने केलेल्या अभ्यासात स्पष्ट झाले आहे. त्यामुळे क्रिप्टोकरन्सी सुद्धा जनतेचे चलन नसून मूठभरांचे चलन बनले आहे आणि भांडवली विकासाच्या नियमाने यात फक्त वाढ होईल, घट नाही. क्रिप्टोकरन्सीची नोंदवही ही कागदावर विकेंद्रीकृत असली तरी वास्तवात क्रिप्टोकरन्सीच मूठभरांच्या हातात केंद्रीत झाली आहे.

विकेंद्रीकरणाचे समर्थक हे विसरतात की केंद्रिय बँकांचा कार्यभार हा मुख्यत्वे देशाच्या भांडवली आर्थिक संरचनेला चालू ठेवण्याचा असतो आणि यामध्ये मोठमोठ्या मक्तेदार कंपन्यांचे हित केंद्रस्थानी असते कारण भांडवल संचय त्यांच्याकडेच असतो. तेव्हा केंद्रिय बँक असो वा नसो, ज्यांच्याकडे भांडवल संचय आहे तेच अर्थव्यवस्थेचे नियंत्रक बनणार हे निश्चित! थोडक्यात, भांडवलशाहीची कार्यपद्धती न समजू शकल्यामुळे अनेक क्रिप्टोकरंसी समर्थक या चलनालाच

पान 2 वर

# चिले: "समाजवादा"च्या नावाने पुन्हा एकदा फसवे स्वप्न!

✎ अभिजित

देशभरामध्ये अनेक उदारवादी-डावे आणि डावे-उदारवादी अतिशय खूश होऊन चिले देशातील सत्तापरिवर्तनाचे गुणगाण गात आहेत. गॅब्रियेल बोरिक नावाचा 35 वर्षीय तरुण सर्वाधिक तरुण राष्ट्रपती म्हणून निवडून आल्यानंतर, त्याच्या "डावे"पणाचे गोडवे गात जगभरातील सामाजिक-जनवादी (समाजवादी) हर्षोल्लसित झाले आहेत आणि तेथील जनतेच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन होणार अशा वल्गना केल्या जात आहेत. शोषणमुक्त समाजाची कल्पना मांडणाऱ्या क्रांतिकारी शक्तींनी या प्रचाराला बळी पडता कामा नये. दक्षिण अमेरिकेतील चिले देशाप्रमाणेच बोलिव्हिया, व्हेनेझुएला अशा इतर देशांमध्येही अशाप्रकारचे "डावे" सत्तेवर आल्यानंतर या उदारवाद्यांना असाच हर्षोल्हास झाला होता. परंतु ज्याप्रकारे इतिहास आणि वर्तमानाने या परिवर्तनांचा पोकळपणा उघड केला आहे, तसाच गॅब्रियेल बोरिकबद्दलचा पोकळपणाही उघड झाल्याशिवाय राहणार नाही. बोरिक हा कामगार वर्गाचा नाही तर सर्व सामाजिक जनवाद्यांप्रमाणे चिलेमधील भांडवलदार वर्गाचा प्रतिनिधी आहे आणि "लोककल्याणकारी" घोषणांनी फक्त चिलेयन जनतेला भ्रमित करत आहे.

### चिलेची ऐतिहासिक पार्श्वभूमी

चिलेसहीत जवळपास सर्वच दक्षिण अमेरिकी देश अमेरिकेच्या साम्राज्यवादी धोरणांखाली भरडले जात आले आहेत. अमेरिकन राष्ट्रपती जेम्स मन्रोने व्याख्यायित केलेल्या मन्रो डॉक्ट्रिनवर चालत अमेरिकेने दक्षिण अमेरिकेला आपले परसघर समजून भांडवली साम्राज्यवादी भुकेकरिता लुटले आहे. या साम्राज्यवादाच्या विरोधात संपूर्ण दक्षिण अमेरिकेत सतत साम्राज्यवाद विरोधी आंदोलने होत आली आहेत. साम्राज्यवादासोबतच त्याला जन्म देणाऱ्या भांडवलशाहीला आह्वान देऊ शकणाऱ्या कामगार वर्गाला संघटित करेल अशा वैज्ञानिक समाजवादी शक्तींच्या कमजोरीमुळे या आंदोलनांचे नेतृत्व सामाजिक जनवाद्यांकडे जात राहिले आहे. चिले मध्ये 1970 मध्ये साल्वादोर अलांदे या समाजवादी नेत्याच्या नेतृत्वात सत्तेत आलेल्या सरकारने कल्याणकारी योजनांची मोठी मोहिम उघडली, जिच्या स्वत:च्या मर्यादा काही काळातच उघडही होऊ लागल्या होत्या. परंतु अलांदेविरोधात अमेरिकन साम्राज्यवादी भांडवल आणि चिलेमधील भांडवलदारांच्या एका गटाने हातमिळवणी करत ऑगस्टो पिनोचेट या लष्करी अधिकाऱ्याच्या नेतृत्वात बंड करवून अलांदेंची हत्या करवली आणि देशभरातील युवक, विद्यार्थी, कामगार कार्यकर्ते, कलाकारांचे हत्याकांड घडवले. यानंतर दोन दशके भांडवलाला लुटीची खुली सूट देणारी नव-उदारवादी धोरणे पिनोचेटने लागू केल्यानंतर 1990 पासून पुन्हा भांडवलदार वर्गाने लोकशाहीच्या दिखाव्याची व्यवस्था पुनर्स्थापित करवली. यावेळी लागू झालेल्या घटनेने मात्र पिनोचेटच्या काळातील हुकूमशाहीची अनेक तत्वे तशीच कायम ठेवली, जसे की सैन्याला शिक्षेपासून संरक्षण, सैनिकी दल आणि काराबिनेरोस या गुप्तहेर-पोलिसी संस्थेची स्वायत्तता.

अर्थातच नव-उदारवादी धोरणांच्या परिणामी महागाई, गरिबी, बेरोजगारी, शिक्षण व आरोग्याची वाताहात या समस्यांनी आक्राळविक्राळ रुप धारण केले आहे आणि वेळोवेळी चिलेमधील जनतेच्या तीव्र आंदोलनांना जन्म दिला आहे. जगातील सर्व भांडवली देशांप्रमाणेच चिलेमध्ये विषमता टोकाला पोहोचलेली आहे. चिलेतील 1 टक्के लोकांकडे देशातील 26.5टक्के संपत्ती आहे; तर 50 टक्के लोकांकडे फक्त 2.1 टक्के. चिलेमधील निम्म्याच्या वर कामगारांना कायद्याने सांगितलेले किमान वेतनही मिळत नाही.

### 2019 मधील जनतेचे दैदिप्यमान आंदोलन

2019 मध्ये महागाई, खाजगीकरण, विषमता, वाढता भ्रष्टाचार या सर्वांविरोधातील वाढत्या असंतोषाच्या परिस्थितीत मेट्रो ट्रेन च्या भाडेवाढी विरोधातील आंदोलनाने ठिणगी पाडली आणि आंदोलनाचा वणवा भडकला. विद्यार्थ्यांनी बस, ट्रेनची तिकिटे काढण्यास नकार देत आंदोलनाला सुरुवात केली आणि



ट्रेन स्टेशन्स ताब्यात घेणे, जाळणे इथपर्यंत आंदोलन पसरले. यानंतर इतर सर्व मुद्यांवर धुमसत असलेला असंतोष बाहेर आला आणि जनतेचे व्यापक आंदोलन उभे झाले. 25 ऑक्टोबर 2019 रोजी चिले मध्ये आजवर निघालेला सर्वात "मोठा मोर्चा" निघाला, ज्यामध्ये 12 लाखांवर लोक सहभागी झाले होते. या आंदोलनामध्ये विद्यार्थी संघटना, अराजकतावादी, सामाजिक-जनवादी यांची मोठी भुमिका होती. पिनोचेट सत्तेतून गेल्यानंतरचे हे तीन दशकातील सर्वात मोठे आंदोलन होते. आंदोलनादरम्यान चिलेचे उजव्या विचारसरणीचे आणि अमेरिकन साम्राज्यवादाचे हस्तक, अब्जाधीश राष्ट्रपती सेबास्तियन पिनेरा हे रोमारियो नावाच्या एका महागड्या हॉटेलात मजा करत असतानाचे फोटो समोर आले आणि आंदोलन अजूनच भडकले. यानंतर पिनेराने देशात आणीबाणी लागू केली आणि आंदोलनाला दडपण्याचे काम जोमाने पुढे नेले. या अत्यंत प्रखर आंदोलनाच्या परिणामी देशाला नवीन राज्यघटना लागू करण्यासाठी घटनासमिती स्थापन करण्याची मागणी पुढे आली आणि 16 मे 2021 रोजी नवीन घटनासमिती निवडली गेली, जिचे काम सध्या चालू आहे. या वातावरणात झालेल्या 2021 च्या निवडणुकीत गॅब्रियेल बोरिक राष्ट्रपती म्हणून निवडून आला आहे. तो 11 मार्च रोजी कार्यभार स्विकारेल.

### बोरिकचा दिखावा आणि वास्तव

शिक्षण नफ्याकरिता नसून अधिकार असला पाहिजे, महत्वाच्या क्षेत्रांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग कमी असला पाहिजे, ब्रिटन सारखी सार्वत्रिक आरोग्यव्यवस्था असली पाहिजे, किमान वेतन वाढले पाहिजे, कामाचे तास आठवड्याला 40 असले पाहिजेत, कंपन्यांच्या बोर्डावर कामगारांचे प्रतिनिधी गेले पाहिजेत, श्रीमंतांवरचे कर वाढवले पाहिजेत, पेंशन मिळाली पाहिजे, अशा मागण्यांसहीत लैंगिक समानता, समलैंगिकांचे अधिकार, पर्यावरणाचे रक्षण, हरित अर्थव्यवस्था, मानवाधिकार, इस्त्रायल विरोधात पॅलेस्ताईनचे समर्थन अशा मुद्यांवर बोरिक यांनी व्यक्त केलेल्या मतांमुळे अनेक उदारवादी त्याच्यावर "फिदा" आहेत. याहीपलीकडे जाऊन त्याच्या अंगावर टॅटू आहेत, तो रॉक संगीत ऐकतो, टी-शर्ट जीन्स सारखे 'कॅज्युअल' कपडे घालतो आणि यामुळे तरुण त्याच्यामागे जात आहेत यावरही अनेक प्रसारमाध्यमे जोर देत आहेत.

गॅब्रियेल बोरिक किंवा त्याचप्रमाणे कोणत्याही राजकीय व्यक्तीचे खरे रूप तेव्हाच समजू शकते जेव्हा त्याच्या विचारधारेचे वर्गविश्लेषण केले जाईल कारण सत्ता चालवणे हे वर्गीय पक्षधरतेचे काम आहे. व्हेनेझुएलाचे माजी राष्ट्रपती ह्यूगो चावेझ असोत, किंवा बोलिव्हियाचे माजी राष्ट्रपती इव्हो मोरालेस, किंवा तत्सम नेते, यांच्याबद्दलही याचप्रकारच्या धारणांचा वापर करून "21 व्या शतकातील समाजवाद", "नवे डावे" अशा धारणांना मजबूत केले गेले, परंतु ना चावेझ, ना मोरालेस त्यांच्या देशामध्ये क्रांतिकारी बदल घडवू शकले, ना बोरिक घडवेल. हे समजून घेण्यासाठी अगोदर सामाजिक-जनवादी विचारधारेचे खरे स्वरूप आणि त्याद्वारे बोरिक यांचे खरे राजकारण ओळखणे आवश्यक आहे.

### भांडवलदार वर्गाची "सुरक्षा" फळी: सामाजिक-जनवाद

सामाजिक-जनवाद्यांचा (समाजवाद्यांचा) मूळ पूर्वज म्हणजे तत्कालिन जर्मन "कम्युनिस्ट" नेता कार्ल कौट्स्की, ज्याच्या नकली मार्क्सवादाच्या विरोधात लेनिनने बंड पुकारत कामगार वर्गाची "दुसरी इंटरनॅशनल" फोडून "तिसरी इंटरनॅशनल" स्थापन केली. पहिल्या महायुद्धाच्या वेळी कार्ल कौट्स्कीने या युद्धाचे साम्राज्यवादी स्वरूप नाकारत प्रत्येक देशातील कामगार वर्गाला आपल्या देशातील भांडवलदार वर्गाला युद्धात साथ देण्याचे आवाहन केले होते. जर्मनीतील क्रांतिकारी शक्यता-संपन्न अशा शक्तीशाली कामगार चळवळीला यानंतरच्या काळात भांडवलदारांसोबत तडजोडी करायला लावण्यात आणि नंतरच्या काळात हिटलरच्या नाझी शक्तीला क्रांतिकारी प्रतिकार न करता त्यांना उभे राहू देण्यात याच कार्ल कौट्स्कीच्या "समाजवादी" बनलेल्या पक्षाचा मोठा वाटा होता. कामगार चळवळीच्या इतिहासात बर्नस्टीन आणि कार्ल कौटस्की पासून ते भारतासारख्या देशात लोहिया-जेपी सारख्या समाजवाद्यांनी सतत भांडवलदार वर्गाच्या सुरक्षा फळीचे काम केले आहे. भांडवली व्यवस्थेच्या शोषण-छळवणुकीच्या विरोधात जेव्हा कामगार चळवळ क्रांतिकारी रूप धारण करण्याची शक्यता धारण करते, तेव्हा भांडवलदार वर्गाने "डावी" पोपटपंची करणाऱ्या पण वास्तवात भांडवलदार वर्गाशी हातमिळवणी करणाऱ्या समाजवाद्यांना पुढे करतो.

सामाजिक-जनवाद मुख्यत्वे क्रांतिकारी समाजपरिवर्तनाला नाकारतो आणि हळू-हळू परिवर्तन करत, कल्याणकारी राज्याची कल्पना मांडत "समाजवादा"चे स्वप्न कामगारवर्गाला दाखवतो. कल्याणकारी राज्याची कल्पनाच मुळात यावर आधारलेली आहे की समाजातील उत्पादन साधनांवर भांडवलदार वर्गाचा ताबा तसाच रहावा, सर्व शासनयंत्रणेवर, मीडियावर, समाजाच्या सर्व अंगांवर अधिनायकत्व त्यांचेच रहावे आणि जनतेच्या वाढत्या असंतोषाला कमी करण्यासाठी भांडवलदारांच्या वतीने सरकारने कराच्या पैशातून थोडा दानधर्म करत "कल्याणकारी" योजना राबवाव्यात. **"कल्याण"कारी शब्दातच निहीत आहे की सत्ता त्यांची आहे जे "कल्याण" करू शकतात, थोडक्यात मालमत्ताधारक वर्गाची.** नफ्याचा एकमेव स्त्रोत आहे कामगारांनी पैदा केलेल्या संपत्तीचे मालकांकडे हस्तांतरण; त्यामुळे एकीकडे बाजाराच्या व्यवस्थेद्वारे भांडवलदार वर्गाला नफ्याच्या चढ्या दराची हमी सुद्धा द्यायची आणि दुसरीकडे जनतेचे "कल्याण" सुद्धा करायचे या अंतर्विरोधांना ही सरकारे कधीच सोडवू शकत नाहीत आणि म्हणूनच सतत आर्थिक संकटाकडेच नेत गेली. उदाहरणार्थ, साल्वादोर अलांदेंच्या सरकारच्या काळातही महागाई 6 पट वाढली, व्हेनेझुएलामध्ये तर भ्रष्टाचार-महागाईने कळस गाठला आहे, आणि अशाच स्थितीमुळे इव्हो मोरालेसला सत्ता गमवावी लागली आहे. खरेतर सामाजिक जनवाद्यांच्या अशा कारभारामुळेच फॅसिस्ट, किंवा हुकूमशाही शक्तींना बळकट होण्याची संधी मिळते, जे दक्षिण अमेरिकेच्या ब्राझीलसहीत अनेक देशांमध्ये झालेल्या उजव्या शक्तींच्या उभारातही दिसून येते.

### गॅब्रियेल बोरिक काही वेगळा नाही!

चिले मध्ये 2019 मध्ये झालेल्या, सत्तेला हादरवणाऱ्या आंदोलनाचाच परिणाम आहे की चिले मधील भांडवलदार वर्गाला सामाजिक-जनवादाचा आसरा घ्यावा लागला आहे. गॅब्रियेल बोरिक मध्ये त्यांना हा आसरा मिळाला आहे. गॅब्रियेल बोरिक आज जरी जनतेला "स्वर्ग" देण्याचे आश्वासन देत असला तरी खालील गोष्टी स्पष्ट करतील की भांडवलदारांच्या हितांचे रक्षण करण्याच्या बाबतीत त्याच्या मनात कोणत्याही शंका नाहीत.

बोरिक मार्क्सवादी नाहीच, आणि त्यामुळे स्वाभाविकपणे बाजाराची व्यवस्था, खाजगी मालकी, भांडवलाचे अधिराज्य याबाबत त्याच्या भुमिका अगदी स्पष्ट आहेत. थोडक्यात नफ्याच्या व्यवस्थेच्या तो विरोधात नाहीच. बोरिक खुल्या बाजाराच्या व्यवस्थेचा समर्थक आहे याबद्दल तर जगातील अनेक भांडवली प्रसारमाध्यमांनीही आग्रहाने मांडले आहे. तो स्वत: विद्यार्थी चळवळीतून पुढे **आलेला** असला, तरी **हा भ्रम सोडला पाहिजे की "संघर्षां"मधून पुढे आलेले नेते खरोखर जनपक्षधर असतात.** भारतातील कन्हैया कुमार सारखी उदाहरणे याकरिता डोळ्यासमोर आणली तरी पुरेसे आहे. 2019 मध्ये जेव्हा जनतेच्या आंदोलनाने चिलेला हादरवून सोडले होते, तेव्हा प्रतिक्रियावादी राष्ट्रपती पिनेरासोबत "राष्ट्रीय सरकार" बनवण्याकरिता बोरिकने बोलणी चालू केली होती हे विसरून चालणार

पान 13 वर

# पाच राज्यातील निवडणूक निकाल

पान 1 वरून

वर्गाच्या विविध हिश्श्यांकडून मिळणाऱ्या निधीला सरावला आहे आणि जनतेकडून निधी गोळा करणे जवळपास बंद केले आहे!

भांडवली निवडणुका हा प्रामुख्याने पैशांचाच खेळ असतो, याचे कारण आहे की निवडणुकांची पूर्ण संरचनाच त्यांच्या हिताची असते ज्यांच्याकडे पैसा आहे. लाखो लोकांचे मतदारसंघ, शेकडो किलोमीटरचा परिसर, डिपॉझिट करिता लागणारे पैसे, हजारो वा लाखो लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी लागणाऱ्या प्रचारसाहित्याचा खर्च, अतिमहागड्या टीव्ही चॅनेल्स आणि वर्तमानपत्रांमध्ये लाखो-कोटी खर्च करून करावी लागणारी जाहिरात, सोशल मिडीयावर पैसे देऊन करवुन घेण्याची जाहीरात, थ्री-डी तंत्रज्ञानाद्वारे भाषणे, मोठमोठ्या रॅली आयोजित करताना पैसे देऊन जमवावी लागणारी गर्दी आणि तेथील सर्व तामझाम, मतदारांना दाखवण्याचे बिर्याणी-दारू पासून ते रोकड्याचे आमिष, निवडणुकीनंतर लोकप्रतिनिधींची खरेदी विक्री, सर्वात महत्वाचे म्हणजे या सर्वांकरिता लागणारी पगारी कार्यकर्त्यांची फौज इत्यादी सर्वांसाठी लागणारा पैसा येतो तो भांडवलदारांकडून. भांडवलदारांनी कमावलेल्या नफ्याचा एक वाटा भांडवली पक्षांचा निधी बनतो. स्वाभाविक आहे की काँग्रेस असो वा सपा, किंवा अगदी आम आदमी पक्षही सध्या या बाबतीत भाजपशी स्पर्धा करण्याच्या स्थितीत नाहीत. अर्थात, पंजाबमध्ये आप कडे धनिक शेतकरी वर्ग, मध्यम आणि निम्न भांडवलदार वर्गाचा मोठा हिस्सा आपला निधी घेऊन वळला आहे आणि निधीचा प्रमुख स्त्रोत बनला आहे हे विसरता कामा नये. सर्वच भांडवली लोकशाह्यांमध्ये आपापल्या विविध पक्षांमार्फत भांडवलदार वर्गाने निवडणुकांचा हा "खेळ" बऱ्यापैकी विकसित केला आहे. अमेरिकेत तर कंपन्या, भांडवलदार यांच्याकडून खुलेआम पणे निधी स्विकारला जातो आणि जनतेला तरीही पटवले जाते की हे त्यांच्या हितामध्ये आहे! भाजप आणि आप सारखे पक्ष आज या विचाराला हळूहळू रुजवण्याचे काम यशस्वीरित्या करत आहेत!

त्यामुळे यात काही आश्चर्य नाही की खुलेआम कॉर्पोरेटची बाजू घेणारा भाजप, सर्वाधिक निधी मिळवणारा भाजप हाच निवडणुकीच्या खेळातील सर्वाधिक सक्षम स्पर्धक आहे. वरवर "भाजपने धनशक्तीचा वापर केला" असे म्हणणारे विरोधी पक्ष हे फक्त आतून स्वत:चे रडणे गात असतात की "आमच्याकडे इतके पैसे का नाहीत!". राहुल गांधींनी तर 2019 मध्येच जाहीरपणे रडणे गायले होते की "आमच्यापेक्षा 20 पट जास्त पैसा भाजपकडे आहे!"

## उत्तरप्रदेशात बेरजेचे राजकारण पुन्हा एकदा निकामी, धनिक शेतकरी आंदोलनाचे वर्गचरित्र उघडे

यादव-मुस्लिम आणि सोबत ओबीसींचा एक हिस्सा व दलितांचा एक हिस्सा सोबत घेऊन "बेरजेचे" राजकारण करत भाजपला आह्वान देण्याचा समाजवादी पक्षाचा इरादा धुळीस मिळाला आहे. समाजवादी पक्षाच्या एकूण मतांमध्ये वाढ झालेली असली आणि जागाही वाढल्या असल्या तरीही अशाप्रकारच्या ध्रुवीकरणाच्या आधारावर फायदा फॅसिस्ट भाजपला होतो हे सतत दिसून आले आहे. दलित, ब्राह्मण, क्षत्रिय, जाट यांच्या मतांचा मोठा हिस्सा भाजपला गेला आहे आणि यामागे फक्त भाजपचे जातीय़ राजकारण कारणीभूत नाही तर सपाचे, आणि इतर सर्व भांडवली पक्षांचे राजकारण सुद्धा कारणीभूत आहे.

बहुजन समाज पक्ष आणि एम.आय.एम. हे भाजप करिता मते फोडण्याचेच काम करत आहे हे तर वारंवार दिसून आलेच आहे. नेहमीप्रमाणे अनेक आकडे समोर येत आहेत की अनेक जागांवर भाजपचा निसटत्या फरकाने विजय झाला आहे आणि बसप वा एम.आय.एम.च्या मतांमुळे हा फरक झाला आहे. परंतु या बेरजेच्या-वजाबाकीच्या गणिताने भाजपला खूप फरक पडतच नाही. खरेतर उत्तर प्रदेशात बसप चा आधार असलेल्या दलितांचा बऱ्यापैकी मोठा हिस्सा भाजपकडे वळला आहे आणि भाजपच्या मुस्लिम मतांमध्ये सुद्धा घट नाही तर वाढ झाली आहे! या मतांचे भाजपकडे सरकणे हे पुन्हा विविध जात-धर्म गटांमधील अंतर्गत वर्गीय फरकांनाच समोर आणते. पुढे जाऊन, अशा प्रकारच्या आकड्यांच्या खेळापायी लोक हे विसरतात की भाजपचा एक वास्तव जनाधार आहे जो बदललेला नाही आणि फॅसिस्ट विचारसरणीच्या प्रभावाखाली जनतेचा एक मोठा हिस्सा आहे. थोड्याबहुत आकड्यांमुळे विजय किंवा पराभव होऊन ही जमिनी शक्ती नष्ट होत नाही.

बेरीज-वजाबाकीच्या राजकारणाच्या प्रतिक्रियेमध्ये भाजप नेहमीच जिंकेल कारण की तथाकथित 'हिंदू' अस्मितेभोवती जनतेच्या मोठ्या हिश्श्याला, एका नकली शत्रूच्या विरोधात उभे करवण्याची शक्ती भाजपकडे इतरांपेक्षा खूपच जास्त आहे.

## धनिक शेतकरी आंदोलनाचे वर्गचरित्र पुन्हा एकदा सिद्ध !

**धनिक शेतकरी आंदोलनाच्या माध्यमातून फॅसिझमला आह्वान उभे झाले आहे असे म्हणत या आंदोलनाच्या वर्गचरित्राचा प्रश्न गायब करत या आंदोलनाला पाठिंबा देणारे अनेक उदारवादी, समाजवादी आणि काही तर "कम्युनिस्ट" सुद्धा दिवास्वप्न बघत होते.** शेतकरी आंदोलनाचे दमन, लखीमपूर खेरी येथे भाजप नेत्याने शेतकऱ्यांवर गाडी चालवून केलेला खून, यापलीकडे जाऊन पश्चिम उत्तरप्रदेशातील धनिक शेतकरी वर्गाच्या जवळपास निम्म्या हिश्श्याने भाजपला मतदान केले आहे. इतकेच नाही तर गेल्या निवडणुकीपेक्षा थोडी मते भाजपला जास्तच मिळाली आहेत. थोडक्यात, या भांडवलदार शेतकरी समुदायाने आपले वर्गहित समोर ठेवत भाजपचा पर्याय योग्य मानला आहे. धनिक शेतकरी वर्ग हा भांडवलदार वर्गाचाच एक हिस्सा आहे आणि तथाकथित "शेतकरी" आंदोलन हे वास्तवात धनिक शेतकरी वर्ग विरूद्ध कॉर्पोरेट भांडवलदार वर्ग यांच्यामधील संघर्ष होता. धनिक शेतकरी वर्ग आजही भाजपच्या मागे उभा आहे कारण की त्याला कॉर्पोरेट वर्गाविरूद्ध लढावे लागत असून सुद्धा कामगार वर्गाच्या विरोधात सर्वाधिक भरवशाचा पक्ष भाजपच वाटतो. या धनिक शेतकरी धार्जिण्या आंदोलनाच्या जिवावर 'फॅसिझम'शी लढण्याच्या वल्गना करणारे उदारवादी तर आज तोंड लपवत फिरत आहेत आणि जनतेला दोष देत आहेत की जनता याच्याच लायक आहे! उदारवादाची परिणती अशाप्रकारे निराशेतच होत असते!

## भाजप भांडवलदारांचा लाडका पक्ष का बनलेला आहे?

भाजप आणि त्याची मातृसंस्था असलेल्या आर.एस.एस. ची फॅसिस्ट विचारसरणी, फॅसिस्ट पद्धतीची कॅडर आधारित संघटना बांधणी, कामकरी वर्गाच्या विरोधातील विचारधारेच्या आधारावर बनलेल्या एकतेची शक्ती या त्या सर्व गोष्टी आहेत ज्या आज भांडवलदार वर्गाला गरजेच्या झाल्या आहेत. देशामध्ये 2012 पासून घसरत चाललेल्या नफ्याच्या दराच्या परिणामी जे आर्थिक संकट वाढत होते, त्याचीच परिणती होती की 2013-14 पासूनच देशातील उद्योगपतींनी मोदीला सक्षम पर्याय म्हणून जनतेसमोर आणणे चालू केले होते. आर्थिक संकटांच्या काळात जनतेची जी दैन्यावस्था वाढते, अशामध्ये एकीकडे तिला जात-धर्माच्या नावाने द्वेषाचा खुराक पाजून भरकटवण्याची क्षमता असलेल्या आणि दुसरीकडे पाशवी दमन करून जन-आंदोलनांना चिरडून टाकू शकणाऱ्या "लोहपुरुषांची" भांडवलदार वर्गाला गरज भासते.

ही गरज पूर्ण केली आहे भाजप आणि संघ परिवाराने. मोदी सरकारने आणि विविध राज्यांमधील भाजप सरकारांनी कामगार आंदोलनांचे दमन, नोटबंदी पासून ते कोव्हिड पर्यंत जनतेवर संकटांचा मारा करूनही स्थिति नियंत्रणात ठेवण्यात दाखवलेले कौशल्य, कामगार कायदे रद्द करून कामगार अधिकारांना पायदळी तुडवत नवीन चार कायदे लागू करणे, कंत्राटीकरण आणि खाजगीकरणाचा अनिर्बंध वारू उधळू देणे, कल्याणकारी खर्चाला कुशलतेने बाजाराशी जोडत एकीकडे जनतेला "आशा" दाखवणे आणि दुसरीकडे बाजारांनाही खुश करणे, राज्यसत्तेच्या सर्व यंत्रणांमध्ये संविधानाचाच वापर करत घुसखोरी करत सत्तायंत्रणेला अधिक दमनकारी बनवणे आणि हे सर्व करत असताना काश्मिर, पाकिस्तान, लव्ह जिहाद, गोमाता, हिजाब सारखे मुद्दे उपस्थित करून आणि नियंत्रित पद्धतीने आंदोलने घडवत जनतेच्या मोठ्या हिश्श्याला भरकटवण्यात आणि बेरोजगारी, गरिबी, लोकशाही-नागरी अधिकार अशा मुद्यांवरची आंदोलन कमजोर करण्यात जे कौशल्य दाखवले आहे त्यामुळेच भाजप भांडवलदारांचा आजही लाडका पक्ष आहे.

## पंजाब मध्ये आपच्या विजयाचे गणित

आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांना छोटा मोदी असेच म्हटले जात नाहीये. काश्मिर, राम मंदिरासारख्या मुद्यांवर भाजपच्या भुमिकेला समर्थन देणाऱ्या, अयोध्येला यात्रा आयोजित करवणाऱ्या, धार्मिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देणाऱ्या, कामगारांना सोडून इतर वर्गांना दिलेली आश्वासने पूर्ण करवणाऱ्या, आंदोलनांचे दमन करणाऱ्या केजरीवालचे चरित्र आता कामगार वर्गसमोर उघडे होऊ लागले आहे. कंत्राटीकरण रद्द करण्याच्या आश्वासनाला फासलेला हरताळ आणि त्याकरिता लढणाऱ्या कामगारांचे दमन असो, अंगणवाडी कामगारांवर 'एस्मा' सारखा दमनकारी कायदा लागू करणे असो, वा नावापुरती किमान मजुरी वाढवून वास्तवात स्वत:च्याच मंत्र्यांच्या कारखान्यांमध्ये कामगारांना जुन्या किमान वेतनालाही लागू न करण्याचे धोरण असो, केजरीवालचे दमनकारी आणि मजूर विरोधी चरित्र लपलेले नाही.

अशामध्ये पंजाबमध्ये 'आप'ला मिळालेला विजय हा एकीकडे पंजाबमध्ये तथाकथित 'दिल्ली मॉडेल'च्या यशस्वी खोट्या प्रचाराचा परिणाम आहे आणि दुसरीकडे पंजाबमधील पक्षांच्या नाकर्तेपणाचा. धनिक शेतकरी आंदोलनाचे दमन केल्यामुळे भाजप-अकाली दलापासून दुरावलेला धनिक शेतकरी वर्ग 'आप' मागे उभा राहिला आहे. काँग्रेस मधील अंतर्गत सुंदोपसुंदी-फाटाफुटी आणि दलित नेतृत्वाचा चेहरा दिल्यामुळे याच धनिक शेतकरी वर्गाची दूर गेलेली मते यामुळे त्यांचा पराजय होणारच होता. आपच्या विजयामागे पंजाबमधील धनिक शेतकरी वर्गाने दिलेल्या निधीचा मोठा वाटा आहे हे विसरता कामा नये.

## आर्थिक संकटाच्या काळात सर्वच सत्ताधारी अधिक दमनकारी होणार!

वाढत्या आर्थिक संकटाचीच परिणती आहे की आज देशात काही ठिकाणी सत्तेत असलेले गैर-फॅसिस्ट भांडवली पक्ष, जसे की तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, आम आदमी पक्ष, तेलंगणा राष्ट्र समिती, इत्यादी सुद्धा आज दमनकारी बनलेले आहेत आणि कामगार वर्गाच्या सर्व लढ्यांना दडपून टाकण्यात कसर सोडत नाहीयेत. ममता बॅनर्जींचा तृणमूल पक्ष तर गुंडशक्तीच्या वापरात नावाजलेला आहेच; **महाराष्ट्रामध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी-शिवसेनेच्या महाविकास आघाडी सरकारने चालवलेले संपकरी एस.टी. कामगारांचे दमन आणि नुकतेच दिल्लीमध्ये आम आदमी पक्ष व भाजपने मिळून 'एस्मा' लावत केलेले अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या संपाचे दमन ही त्याची ताजी उदाहरणे आहेत.**

त्यामुळेच या पक्षांच्या भाजपच्या विरोधातील सुरावरून ते कामगार वर्गाचे रक्षक किंवा समर्थक आहेत हा भ्रम जर कोणी पाळलेला असेल तर तो लवकर दूर झालेला बरा!

## फॅसिझम निवडणुकीच्या लढाईद्वारे संपू शकत नाही : जमिनीवर शक्ती उभी करावीच लागेल!

उदारवादी, समाजवादी हे समजू शकत नाहीत की फॅसिझम एक प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलन असते, ज्याला एक सामाजिक आधार असतो. निम्न-भांडवलदार वर्ग जो भांडवलशाही मध्ये उध्वस्त होत असतो तो एका प्रतिक्रियेच्या स्वरूपात फॅसिस्टांचा मुख्य सामाजिक आधार बनतो. यासोबतच अर्ध-कामगार आणि कामगार वर्गाचाही एक हिस्सा फॅसिस्टांच्या भ्रामक प्रचाराच्या प्रभावाखाली त्यांचा समर्थक बनतो. निवडणुकीमध्ये गैर-फॅसिस्ट भांडवली पक्ष जिंकून आले तरी त्यांच्या भांडवली धोरणांच्या परिणामी जनतेचे जे उध्वस्तीकरण होत जाते, त्याचा फायदा घेऊनच फॅसिस्ट

पान 14 वर

# रेल्वेभरती प्रक्रियेविरोधात बिहार, उत्तर प्रदेश मध्ये आंदोलन

✍ सुस्मित

जानेवारी महिन्याच्या अखेरीस आरआरबी (Railway Recruitment Board) एनटीपीसी (Non Technical Popular Categories) 2021 च्या परीक्षेत घोटाळ्यांचे कारण देत विद्यार्थांनी आंदोलन केले. उमेदवारांचे म्हणणे आहे की रेल्वे बोर्डाने आधी जाहीर केल्या पेक्षा कमी उमेदवारांची निवड केली आहे आणि त्यातसुद्धा एकाच उमेदवाराला प्रत्येक वर्षी, म्हणजे अनेकदा निवडले गेले आहे. विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की परीक्षेचे स्वरुप उच्च शिक्षित विद्यार्थ्यांच्या बाजूने आहे कारण ज्या पदांसाठी पात्रता फक्त 12 वी शिक्षण आहे त्या पदांवर सुद्धा असे उच्चशिक्षित विद्यार्थी निवडले गेले आहेत. ही परीक्षा डिसेंबर 2020 ते जुलै 2021 या काळात एकूण 7 टप्प्यात श्रेणी 2 ते श्रेणी 6 पदांसाठी तसेच ₹19,900 ते ₹35,400 वेतन श्रेणीसाठी घेतली गेली. याच परीक्षेचा निकाल जानेवारी मध्ये जाहीर करण्यात आला. एकूण 35,000 जागांसाठी 1.25 कोटी उमेदवारांचे अर्ज आले होते. यानंतर रेल्वे बोर्डाने उमेदवार निवडीसाठी आणखी एक परीक्षा घेणार असल्याचे जाहीर केले. विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की 2019 मधल्या प्रसारित करण्यात आलेल्या सूचनापत्रात एकाच परीक्षेबद्दल बोलण्यात आले होते. परीक्षेच्या प्रक्रियेतील एकूणच ढिसाळपणा (ही 2019 ची परीक्षा झाली 2020 मध्ये आणि पहिल्या टप्प्याचा निकाल लागला 2022 मध्ये!), प्रक्रियेत झालेले घोटाळे यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले होते. विविध विद्यार्थी संघटना आणि स्वयंस्फूर्त विद्यार्थ्यांनी बिहार बंदचे सुद्धा आवाहन केले होते. विद्यार्थ्यांनी यु.पी., बिहार मधल्या अनेक रेल्वे रोखल्या. काही ठिकाणी जाळपोळ सुद्धा करण्यात आली.

सरकारने सुद्धा आंदोलनकर्त्यांच्या दमनाचे हत्यार उगारले. जे विद्यार्थी आंदोलन करताना सापडतील त्यांना रेल्वे मध्ये आयुष्यभर नोकरी मिळणार नाही अशा प्रकारच्या धमक्या सुद्धा रेल्वेबोर्डाकडून देण्यात आल्या. त्या नंतर यु.पी. मधील अलाहाबाद मध्ये पोलीस विद्यार्थ्यांच्या होस्टेल्स मध्ये घुसून तोडफोड, विद्यार्थ्यांना मारहाण करतानाचे व्हिडीओ आले आहेत. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला बदनाम करण्याचे सुद्धा अनेक प्रयत्न सरकारी अधिकाऱ्यांकडून करण्यात आले.

### विद्यार्थ्यांच्या असंतोषामागची कारणं

आज देशभरात सगळ्याच ठिकाणी अशा प्रकारचे विद्यार्थ्यांचे उद्रेक होताना दिसत आहेत. वाढती बेरोजगारी विद्यार्थ्यांमध्ये असंतोषाला कारण ठरत आहे. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीच्या ताज्या अहवालानुसार देशात एकूण 5.3 कोटी बेरोजगार आहेत यात महिलांचा वाटा जास्त आहे. यात 3.5 कोटी लोकं अशी आहेत जी सक्रियपणे रोजगार शोधत आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणात पाहायचे झाल्यास आज बेरोजगारीचा दर 6.57% आहे. खरे आकडे यापेक्षा नक्कीच जास्त असले पाहिजेत कारण यात जे निराशेने रोजगाराच्या शोधात नाहीत त्यांची गणनाच करण्यात येत नाही.

बेरोजगारी वाढण्यामागे मूळ कारण आहे भांडवली आर्थिक व्यवस्था आणि तात्कालिक मुख्य कारण आहे 1991 पासून लागू केली गेलेली खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणा (खाउजा) ची धोरणं. या धोरणांनी कामकऱ्यांच्या मेहनतीतून उभे राहिलेले सार्वजनिक उपक्रम मोठ्या भांडवलदारांना स्वस्त दरात सुपूर्द करण्यात आले आणि कामगार कपात केली गेली. याशिवाय राहिलेल्या सार्वजनिक उपक्रमांत खाजगीकरण, कंत्राटीकरण यांचा शिरकाव, वर्षानुवर्षे रिक्त असलेल्या जागा न भरणे या धोरणांचाही परिणाम आहे की सरकारी नोकऱ्या कमी होत आहेत!

अशी परिस्थिती असताना विद्यार्थी, तरुणांमध्ये खूप निराशेचं वातावरण आहे. रवी यादव हा 26 वर्षीय इलेक्ट्रिकल इंजिनीरिंग चं शिक्षण घेणारा तरुण म्हणतो "माझ्या पालकांनी माझ्या शिक्षणावर आणि राहण्यावर खुप खर्च केलाय. मी एका गरीब कुटुंबातून येत असल्यामुळे माझे कुटुंब माझ्यावरच अवलंबून आहे. पण या सततच्या अपयशात मी हे कसं करू? हे अगदीच हृदयद्रावक आहे. अशा परिस्थितीत आमच्या समोर आंदोलन किंवा आत्महत्या एवढे दोनच मार्ग आहेत. याशिवाय आम्ही काय करू?"

### भांडवली व्यवस्थेत बेरोजगारी समूळ नष्ट करणे शक्य नाही

आज देशभरात विविध ठिकाणी विद्यार्थ्यांचे, कामगारांचे आंदोलनं चालू आहेत. त्यात विविध राज्यात चालू असलेलं आंगणवाडी महिलांचे आंदोलन, महाराष्ट्रात चालू असलेलं एस.टी. विलीनीकरणाचे आंदोलन असुद्या किंवा दिल्लीतील सरकारी डॉक्टरांनी केलेलं आंदोलन असुद्या. या सगळ्या आंदोलनांमध्ये रोजगाराबद्दलची हमी, पक्का रोजगार, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता यांसारखेच मुद्दे पुढे येत आहेत. इतकेच नाही तर वरवर जातीय



आरक्षणाच्या नावाने होणारी आंदोलने सुद्धा चुकीच्या विचारधारात्मक प्रभावांखाली होणारी, परंतु वास्तवात बेरोजगारांचीच आंदोलने आहेत. विद्यार्थ्यांमध्ये आणि कामगारांमध्ये असणाऱ्या असंतोष आणि अस्वस्थतेच्या मागची कारणं तत्कालिक नसून भांडवली-बाजारी व्यवस्थेमध्ये अंतर्निहित आहेत. या व्यवस्थेमध्ये उत्पादन कशाचे करायचे, कधी करायचे, कोणासाठी करायचे हे मूठभर भांडवलदार नफ्याच्या गणिताच्या आधारे करतात. प्रत्येक व्यक्तीला रोजगार मिळाला पाहिजे, सन्मानजनक आयुष्य मिळाले पाहिजे हा आजच्या व्यवस्थेचा प्रश्नच नाही आहे. आज आपण जगो किंवा मरो या व्यवस्थेला फरक पडत नाही. उलट या व्यवस्थेत एका मर्यादित पातळीपर्यंत बेरोजगारी असलेली चांगलीच आहे जेणेकरून कमी मजुरीत काम करून घेऊन नफा वाढवता येतो. भांडवली अर्थतज्ज्ञ सुद्धा हे उघडपणे मान्य करतात. त्यामुळे हे समजणे आवश्यक आहे की जो पर्यंत ही नफ्यावर चालणारी मानवद्रोही व्यवस्था चालू आहे तो पर्यंत बेरोजगारी समूळ नष्ट करणे शक्य नाही.

### राज्यसत्तेकडून विद्यार्थ्यांचे झालेले दमन

आधी सांगितल्याप्रमाणे रेल्वे अधिकाऱ्यांकडून, पोलिसांकडून विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे अनेक मार्गांनी दमन करण्याचे प्रयत्न करण्यात आले. पोलिसांनी आंदोलन हिंसक झाल्याची कारणं दिली असली तरी कोणतेही शांततेच्या मार्गाने चाललेले आंदोलन सुद्धा सगळी शासनव्यवस्था तितक्याच निर्दयीपणे चिरडते. यात हे समजणे अत्यंत महत्वाचे आहे की राज्यसत्तेचे कामच कुठल्यातरी वर्गाच्या हितासाठी दुसऱ्या वर्गाच्या दमनाचे असते. भांडवलशाहीतील राज्यसत्तेचं काम असतं भांडवलदार वर्गाचे हित आणि त्याकरिता कामगार वर्गाचं दमन. त्यामुळे या व्यवस्थेतल्या राज्यसत्तेची सर्व अंगे म्हणजे सरकार, पोलीस, न्यायव्यवस्था ही याच व्यवस्थेला टिकवून ठेवायचे काम करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आंदोलन कितीही न्याय्य वाटत असले तरी या व्यवस्थेत अशा आंदोलनाचे दमन हे होणारच!

### विद्यार्थ्यांसमोरची पुढील दिशा

आज विद्यार्थांनी हे समजून घेणे खूप गरजेचे आहे की बेरोजगारीचा प्रश्न हा देशासमोरचा खूप मोठा प्रश्न आहे. सत्तेत बसलेल्यांना सुद्धा हे माहिती आहे. त्यामुळेच विद्यार्थ्यांनी या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन या व्यवस्थेला प्रश्न विचारू नयेत म्हणून सत्ताधारी वर्ग विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक, जातीय, भाषिक किंवा आरक्षणाचा मुद्दा उचलून भेद उभे करत राहतात. म्हणून विद्यार्थ्यांनी आजच्या कुठल्याच भांडवली पक्षाच्या नादी न लागता रोजगाराचा अधिकार मूलभूत अधिकार झाला पाहिजे यासाठी लढले पाहिजे. अनेक विद्यार्थी, तरुण बेरोजगारीपासून वैयक्तिक सुटकेचा प्रयत्न करत राहतात आणि सतत स्पर्धा परिक्षांच्या मागे धावतात, पण मर्यादित संधींच्या जगात सुटका सुद्धा थोड्यांचीच होऊ शकते. बहुसंख्यांच्या माथी बेरोजगारी सदानकदा राहणार आहे! खऱ्या अर्थाने या समस्येवर उपाय आहे तो आर्थिक व्यवस्थेला मूळापासून बदलण्याचा, जो संघटित शक्तीच्या जोरावरच केला जाऊ शकतो! देशाच्या स्तरावर रोजगार हमी कायद्याची, रोजगाराच्या अधिकाराला मूलभूत अधिकार बनवण्याची मागणी या लढ्याची सुरुवात आहे.

# जगभरात व भारतातही तीव्र होत आहे आर्थिक विषमता

पान 1 वरून

दारिद्र्यरेषेखाली ढकलली जात असताना आणि उपचाराअभावी आपल्या जिवलगांचा मृत्यू बघण्यास बाध्य असताना, दुसऱ्या बाजूला धनदांडग्यांच्या व उद्योगपतींच्या संपत्तीत अमाप वाढ होत होती, त्यांच्या आयुष्याच्या ऐशोआरामात मात्र कुठलीही कमतरता येत नव्हती.

हे असे का होत असावे? एका बाजुला अश्रूंचा व दुःखाचा महासागर असताना त्यात हे संपत्तीचे ऐश्वर्याचे बेट कसे उभे राहत असावे? ते कोणाच्या कष्टाने निर्माण झाले? कोण आहे या सर्व संपत्तीचा खरा मालक? याच दुःखाच्या महासागरात वसलेल्या असंख्य कामगार कष्टकऱ्यांच्या हाड-मास-रक्त-घामातून ही सर्व संपत्ती, ऐश्वर्य उभे राहिले आहे. सर्व उत्पादित संपत्तीचा स्त्रोत तर कामगारांची श्रमशक्तीच आहे. कामगारांनीच तयार केलेल्या संपत्तीचा एक छोटा वाटा मजुरी म्हणून मालक त्यांना देतो आणि भलामोठा हिस्सा नफा म्हणून खिशात घालतो. मालक वर्गाच्या संपत्तीत होणारी वाढ दिसते ती कामकऱ्यांनी निर्माण केलेल्या या संपत्तीमुळेच. उत्पादनाच्या साधनांपासून वंचित असलेला कामगार जगण्यासाठी त्याची श्रमशक्ती विकायला बाध्य असतो. उत्पादनाच्या साधनांची मालकी असलेल्या भांडवलदाराकडे तो त्याची श्रमशक्ती विकतो. त्याला मूल्य मिळतं केवळ श्रमशक्तीचं. बदल्यात तो त्या मूल्यापेक्षा कितीतरी अधिक मूल्याची संपत्ती निर्माण करतो. कारण श्रमशक्तीचा हा गुणधर्मच आहे की ती स्वतःच्या मूल्यापेक्षा जास्त मूल्य निर्माण करु शकते. त्यालाच वरकड मूल्य म्हणतात. हे मूल्य मात्र भांडवलदार हडपतो. हेच वरकड मूल्य सर्व नफ्याचा स्त्रोत असते. तो नफा अजून वाढवायचा ए क मार्ग म्हणजे कामाचे तास वाढवणे, कामगारांची संख्या कमी करणे. बेरोजगारी निर्माण होण्याचे हे एक महत्वाचे कारण आहे. अशी बेरोजगारांची फौज समाजात असणे मालकवर्गासाठी फायद्याची असते कारण त्यामुळे त्यांची मोलभाव करून कमी पैशात कामगाराला कामावर ठेवण्याची क्षमता वाढते. कामगारांनीच तयार केलेल्या, भांडवलदारांकडे एकत्र होणाऱ्या संपत्तीचा एक हिस्साच अप्रत्यक्षपणे नेते, नोकरशहांपासून ते अवाजवी पगार घेणाऱ्या उच्चमध्यम वर्गातील पांढरपेशा नोकरदाराला दिला जातो जो या बाजाराच्या व्यवस्थेचे विचारधारात्मक समर्थन करतो.

कोव्हिड सारख्या महामारींच्या काळातही भांडवलदारांचा एक हिस्सा गब्बर होतच जातो, कारण अनेक उद्योगधंदे जे बंद होतात ते मोठे भांडवलदार कमी किमतीत विकत घेत जातात. यासोबतच मध्यम, निम्न उद्योगपतींचा एक हिस्सा दिवाळखोर होत जातो आणि उद्योग बंद पडल्यामुळे कामगारांची दैन्यावस्था वाढतच जाते. गेल्या 2 वर्षातील प्रचंड वाढलेल्या विषमतेचे तात्कालिक कारण जरी कोव्हिड असले, तरी मूळ कारण मात्र भांडवली उत्पादन व्यवस्थाच आहे.

# स्त्री कामगारांचा संघर्ष श्रमाच्या मुक्तीच्या महान संघर्षाचा हिस्सा आहे !

**एलियानोर मार्क्स**
**अनुवाद: निमिष**

*कामगार वर्गाचे महान नेते आणि शिक्षक कार्ल मार्क्स ह्यांची सगळ्यात लहान मुलगी एलियानोर मार्क्स वयाच्या सोळाव्या वर्षापासूनच वडिलांच्या सचिवाची जबाबदारी पार पाडत होती आणि कामगार चळवळ तसेच समाजवाद ह्या विषयांवरील आंतरराष्ट्रीय संमेलनांमध्ये त्यांच्याबरोबर सहभागी देखील होत होती. कार्ल मार्क्स ह्यांच्या मृत्यूनंतर त्यांची अपूर्ण हस्तलिखितं प्रकाशनासाठी तयार करण्याकरिता फ्रेडरिक एंगेल्ससोबत एलियानोर ह्यांनी काम केले. एलियानोर आणि त्यांचे पती एडवर्ड अवेलिंग इंग्लंडच्या समाजवादी चळवळीत सक्रिय होते. एलियानोर इंग्लंडच्या सर्वोत्तम वक्त्यांपैकी एक म्हणून प्रसिद्ध होती. १८८६ मध्ये एलियानोरने क्लेमेंटिना ब्लॅकबरोबर महिला कामगारांना संघटित करण्याचे काम हाती घेतले. त्या विमेन्स ट्रेड युनियन लीग मध्ये देखील सक्रिय होत्या. लंडनच्या एका मोठ्या आगपेटी कारखान्यातील महिला कामगारांचा यशस्वी संप संघटित करण्यामध्ये देखील त्यांनी त्यांच्या मैत्रीण असणाऱ्या ॲनी बेझंट ह्यांची मदत केली होती. 'नॅशनल युनियन ऑफ गॅस वर्कर्स अँड जनरल लेबरर्स' संघटित करण्यामध्ये देखील त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली आणि गोदी कामगारांच्या संपात देखील त्या सहभागी होत्या. एलियानोर ह्यांनी वैज्ञानिक समाजवादावरच्या अनेक वैचारिक पुस्तकांचा व अनेक प्रसिद्ध साहित्यिक कृतींचा इंग्रजीत उत्कृष्ट अनुवाद केला. त्यांनी कामगार चळवळीवर अनेक पुस्तके व महत्त्वाचे लेख लिहिले, उदाहरणार्थ 'द फॅक्टरी हेल' (कारखान्यातील नरक), 'द विमेन क्वेश्चन' (स्त्री प्रश्न), 'अमेरिकेतील कामगार चळवळ', शेलीचा समाजवाद' आणि 'इंग्लंड मधील कामगार चळवळ'. **8 मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने** आम्ही एलीयानोर ह्यांच्या काही लेखांमधील महत्त्वाचे भाग प्रकाशित करत आहोत जे आपल्या देशातील महिला कामगारांना संघटित करण्यामधील समस्या आणि आव्हानांबद्दल आजदेखील प्रासंगिक ठरतील असे आहेत.*

*- संपादक*

## आपण कशा पद्धतीने संघटित झाले पाहिजे?

केवळ वर्ग संघर्षाकडे लक्ष वेधणे पुरेसे नाही. कुठली हत्यारं वापरायची आणि ती कशी वापरायची ह्याचे ज्ञान देखील कामगारांना असणे आवश्यक आहे. कुठल्या परिस्थितीत हल्ला चढवायचा आहे आणि आधी मिळवलेले कोणते लाभ अबाधित ठेवायचे आहेत. संप आणि बहिष्काराचा मार्ग कुठे आणि कधी अवलंबायचा, कामगारांच्या अधिकारांचे संरक्षण करणारे कायदे कसे पदरात पाडून घ्यायचे आणि आधी मिळवलेले कायदे केवळ कागदावरच राहू नयेत ह्यासाठी काय करायचे हे आता कामगार शिकत आहेत. अशा परिस्थितीत आपण स्त्रियांनी काय केले पाहिजे? निःसंशयपणे आपल्याला जी गोष्ट करायची आहे ती म्हणजे आपण संघटित होऊ तेव्हा महिला म्हणून संघटित व्हायचे नाही, तर सर्वहारा म्हणून. आपल्या पुरुष कामगारांच्या स्त्री प्रतिद्वंद्वी म्हणून नव्हे तर संघर्षात त्यांच्या साथीदार म्हणून. आपण संघटित कसे व्हावे हा सगळ्यात गंभीर प्रश्न आहे असे मला वाटते. आपण आपले अंतिम उद्दिष्ट — आपल्या वर्गाच्या मुक्तीपर्यंत पोहोचण्याचे साधन म्हणून आपल्या संघटित शक्तिचा उपयोग करत ट्रेड युनियन मध्ये संघटित होण्यापासून सुरुवात केली पाहिजे असे मला वाटते. हे काम सोपे निश्चितच नाही. खरंतर महिला कामगारांची परिस्थिती इतकी बिकट आहे कि त्यात पुढे जाणे हे काळीज पिळवटून टाकेल इतके कठीण असते. परंतु दिवसेंदिवस हे काम अधिकाधिक सोपे होईल. सर्वच कामगारांना एकजूट करण्यात किती ताकद आहे हे जसजशा स्त्रिया, आणि विशेषतः पुरुष समजू लागतील तसतसे हे काम सोपे वाटू लागेल.



## स्त्री कामगारांना संघटित करण्यामधील समस्या

आजवर झालेली प्रगती जरी संतोषजनक असली, आणि कामगार संघटनांनी जी प्रगती केली आहे ती उल्लेखनीय जरी असली तरी महिला आजही खूप मागे आहेत, आणि अनेक वर्षांच्या मेहनतीतुन मिळवलेले परिणाम अत्यंत कमी आहेत ह्या सत्यापासून आपण आपली डोळेझाक करून घेऊ शकत नाही.

कापड उद्योग, जिथे महिला कामगार सर्वप्रथम ट्रेड युनियनमध्ये संघटित झाल्या होत्या, तिथेही अनेक कमतरता आहेत. पहिली गोष्ट म्हणजे अनेक क्षेत्रांमध्ये महिला आजही असंघटित आहेत, पण आता अशी क्षेत्रे कमी होत आहेत, कारण असंघटित महिला कामगार कसे त्यांच्याविरोधात मालकांच्या हातातले हत्यार बनून जातात हे आता ट्रेड युनियन देखील शिकत आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे ट्रेड युनियन चालवण्यात महिला कामगारांचा काहीच सहभाग नसतो.

उदाहरणार्थ लँकेशायर आणि यॉर्कशायर मध्ये(इंग्लंड मधील दोन शहरे - संपादक), जिथे स्त्रिया निरपवादपणे युनियन सदस्य आहेत, नियमितपणे युनियनला सहयोग देतात आणि युनियनचा लाभ देखील घेतात, तिथेही ह्या संघटनांच्या नेतृत्वात त्यांची कोणतीही भूमिका नसते, त्यांच्या स्वतःच्या युनियनच्या कोषाच्या व्यवस्थापनाबाबत त्यांचे कसलेही मत घेतले जात नाही, आणि आजवर कधीही त्या त्यांच्या युनियनच्या संमेलनांमध्ये प्रतिनिधी बनलेल्या नाहीत. प्रतिनिधित्व आणि प्रशासन संपूर्णतः पुरुषांच्या हातात असते.

स्त्रियांच्या ह्या स्पष्ट दुय्यमतेचे आणि उदासीनतेचे कारण समजणे सोपे आहे. सर्वच स्त्री संघटनांच्या बहुतांश बाबींमध्ये सामान्यतः हेच दिसून येते आणि आपण ह्याकडे डोळेझाक करू शकत नाही. ह्याचे कारण हे आहे कि आजही स्त्रियांना दोन जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात : फॅक्टरीत त्या सर्वहारा असतात व रोजंदारी कमावतात, जिच्यावर तिची व तिच्या मुलांची गुजराण बऱ्याच अंशी अवलंबून असते, पण त्या घरगुती गुलाम देखील आहेत, त्यांच्या नवऱ्याच्या, वडिलांच्या आणि भावांच्या बिनपगारी नोकर. सकाळी फॅक्टरीला जाण्यापूर्वीच स्त्रियांनी इतके काम केलेले असते कि तेच काम जर पुरुषांनी केले तर त्यांना खूप मोठी कामगिरी पार पाडल्यासारखी वाटेल. दुपारच्या वेळी पुरुषांना कमीतकमी थोडा वेळ आराम मिळण्याची अपेक्षा असते, पण स्त्रियांना तेव्हासुद्धा आराम मिळत नाही. आणि सरतेशेवटी बिचाऱ्या पुरुषाला संध्याकाळचा वेळ तरी स्वतःसाठी मिळतो पण त्याहून अधिक बिचाऱ्या स्त्रीला तर त्या वेळेतही काम करावे लागते. घरातले काम तिची वाटच बघत असते. तिला मुलांकडे बघावे लागते, कपड्यांची धुलाई आणि डागडुजी करावी लागते. थोडक्यात जर कुठल्याही औद्योगिक वस्तीतले पुरुष फॅक्टरीत दहा तास काम करत असतील, तर स्त्रिया सोळा तास काम करतात. त्यानंतर त्या आणखी कुठल्याही गोष्टीत सक्रिय सहभाग कसा घेऊ शकतील? हे भौतिकदृष्ट्याच असंभव असल्याचे दिसून येते. पण तरीही ह्याच औद्योगिक क्षेत्रांमध्ये स्त्रियांची स्थिती सर्वात चांगली आहे. त्यांना 'चांगली' मजुरी मिळते, पुरुषांचे त्यांच्याशिवाय पान हलत नाही, आणि म्हणूनच त्या तुलनेने स्वतंत्र आहेत. आपण जर त्या शहरांमध्ये व जिल्ह्यांमध्ये जाऊन बघितले जिथे स्त्रियांच्या कामाचा अर्थ आहे निरस आणि थकवणारे काम, जिथे सामान्यतः बहुतांश काम हे घरीच (एखाद्या मालकासाठी घरीच केलेलं काम) केलेलं काम असतं तिथे परिस्थिती सगळ्यात वाईट आणि संघटित होण्याची गरज सगळ्यात अधिक असल्याचे दिसून येते.

गेल्या काही वर्षात ह्या समस्येवर बरेच काम झाले आहे, पण प्रयत्नांच्या तुलनेत निष्पन्न फारसे काही झालेले नाही असेही मला म्हणावे लागेल. परंतु स्त्री कामगारांची दयनीय परिस्थिती हेच ह्याचे एकमेव कारण आहे असे मला वाटत नाही. बहुतांश स्त्री संघटनांच्या बांधणी आणि संचालनाच्या पद्धतीत ह्याचे एक प्रमुख कारण निहीत आहे असे मला वाटते. ह्यातील बहुतांश संघटनांचे नेतृत्व मध्यमवर्गातील स्त्री व पुरुष दोघेही करतात असे दिसून येते. हे लोक एका चांगल्या हेतूने काम करतात ह्याबद्दल दुमत नाही, पण कामगार चळवळीचे उद्दिष्ट काय हे ते समजून घेऊ इच्छित नाहीत व समजून घेऊ शकतही नाहीत. ते त्यांच्या आजूबाजूला पसरलेली गरिबी पाहून अस्वस्थ होतात आणि ह्या कमनशिबी कामगारांची परिस्थिती सुधारण्याची त्यांची इच्छा असते. परंतु ते आपले लोक नाहीत.

लंडनच्या दोन संघटनांची उदाहरणे घेऊ ज्यांनी स्त्रियांची युनियन्स बनवण्यासाठी बरेच कष्ट केले आहेत. विमेन्स ट्रेड युनियन प्रॉव्हिडन्ट लीग हि जुनी संघटना आहे व विमेन्स ट्रेंड युनियन असोसिएशन हि नवीन संघटना आहे. पहिल्यापेक्षा दुसऱ्या संघटनेची उद्दिष्टे थोडी जास्त प्रगत आहेत परंतु दोन्ही संघटनांचे नेतृत्व आणि जनाधार सर्वात अभिजन आणि रोकड्या भांडवली मानसिकतेचे स्त्री-पुरुष करतात. बिशप, पाद्री, भांडवली लोकप्रतिनिधी, आणि त्याहून अधिक कद्रू भांडवली मानसिकतेच्या त्यांच्या बायका, धनाढ्य आणि अभिजन स्त्रिया, आणि भद्रजन अनेक स्त्री संघटनांचे पालनकर्ते आहेत.

कोट्यधीश लॉर्ड ब्रेसेन सारखे निर्लज्ज शोषक, आणि अति प्रतिक्रियावादी सर ज्युलियन गोल्डश्मिड ह्यांची बायको ह्यांसारख्या 'अभिजन महिला' विमेन्स लीग करिता पैसे गोळा उभे करण्यासाठी 'सलून चहापानाचे' आयोजन करतात, तर लेडी डिलके ह्या चळवळीचा उपयोग आपल्या नवऱ्याच्या राजकीय हितासाठी करते. एका बैठकीत एका स्त्री कामगाराने तिच्यापेक्षा आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत असलेल्या लोकांच्या शहाणपणाच्या सल्ल्याबद्दल चिकित्सक रस दर्शवला, ह्याबद्दल ह्यांना वाटलेले आश्चर्यच ह्यांचे कामगारांबद्दलचे अज्ञान किती मोठे आहे ते दाखवते. कामगार स्त्रिया स्वतःच्या हितांबद्दल देखील असाच चिकित्सक रस दाखवतील, आपल्या बाबी स्वतःच्या हातात घेतील आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वहाराच्या महान आधुनिक चळवळीचा एक मोठा आणि जिवंत भाग बनतील अशी आम्हाला आशा आणि विश्वास वाटतो. बऱ्याच अंशी त्यांनी असे केले देखील आहे.

## स्त्री कामगार आणि बुर्झ्वा (भांडवली विचारांच्या) स्त्रियांची उद्दिष्टे वेगवेगळी आहेत

'अनेक चांगली उद्दिष्टेच नरकाकडे घेऊन जातात' अशी एक जुनी इंग्लिश म्हण आहे. स्त्री कामगार बुर्झ्वा स्त्री चळवळीच्या मागण्या समजून घेऊ शकतात, त्या मागण्यांबद्दल सहानुभूतीचा दृष्टिकोन ठेवू शकतात, आणि त्यांचा दृष्टिकोन तसाच असला पाहिजे, फक्त स्त्री कामगार आणि बुर्झ्वा स्त्रियांची उद्दिष्टे खूप वेगवेगळी आहेत.

मी माझा दृष्टिकोन स्पष्टपणे मांडू इच्छिते, आणि अनेक स्त्रियांच्या वतीने मी तो मांडत आहे असे मला वाटते. स्त्रिया म्हणून आम्हालाही स्त्रियांकरिता ते सर्व अधिकार मिळवायचे आहेत जे आज पुरुषांना, ज्यात पुरुष कामगार देखील शामिल आहेत, मिळाले आहेत. परंतु 'स्त्री प्रश्न' हा श्रमाच्या मुक्तीच्या व्यापक प्रश्नाचेच एक अनिवार्य अंग आहे असे आम्ही मानतो.

'स्त्री प्रश्न' अस्तित्वात आहे ह्याबद्दल दुमत नाही. परंतु आमच्यासाठी, म्हणजेच जन्माने, किंवा कामगारांच्या उद्दिष्टांसाठी कार्यरत असल्यामुळे कामगार वर्गात गणल्या जाणाऱ्यांसाठी हा व्यापक कामगार चळवळीचा मुद्दा आहे. जेव्हा उच्च किंवा मध्यमवर्गीय स्त्रिया

पान 12 वर

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (नववे पुष्प )

आज भारतातच नाही, तर संपूर्ण दुनियेत कामगार भांडवली लुटखोरांच्या वेगवान होत चाललेल्या हल्ल्यांचा सामना करत आहेत, आणि कामगार आंदोलन विखुरलेपण, साचलेपणा, आणि हताशेने ग्रासलेले आहे. अशामध्ये इतिहासाची पाने उलटून कामगार वर्गाच्या गौरवशाली संघर्षांपासून शिकण्याचे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे महत्व फार वाढते. आजपासून 150 वर्षे अगोदर, 18 मार्च 1871 ला फ्रांसची राजधानी पॅरिस मध्ये पहिल्यांदा कामगारांनी आपले शासन कायम केले. याला पॅरिस कम्युन म्हटले गेले. त्यांनी शोषकांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या या विचारांना ध्वस्त केले की कामगार राज्यकारभार चालवू शकत नाहीत. पॅरिसच्या बहादुर कामगारांनी फक्त भांडवली सत्तेच्या रथालाच उलटवले नाही तर 72 दिवसांच्या शासनाच्या दरम्यान येणाऱ्या दिवसांचे एक छोटे मॉडेल जगासमोर प्रस्तुत केले आणि दाखवले की समाजवादी समाजामध्ये भेदभाव, असमानता, आणि शोषण कशाप्रकारे समाप्त केले जाईल. पुढे चालून 1917 च्या रशियन कामगार क्रांतीने या क्रांतीचा पुढचा टप्पा रचला.

कामगार वर्गाच्या या साहसी कारवाईने फक्त फ्रांसमधीलच नाही तर जगातील भांडवलदारांचे काळीज थरथरले. त्यांनी कामगारांच्या पहिल्या सत्तेला सुरुंग लावण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले आणि शेवटी कामगारांच्या कम्युनला त्यांनी रक्ताच्या नद्यांमध्ये न्हाऊन काढले. पण कम्युनचे सिद्धांत अमर झाले. पॅरिस कम्युनच्या पराजयातूनसुद्धा जगातील कामगार वर्गाने महत्वाचे धडे घेतले. पॅरिसच्या कामगारांचे बलिदान कामगार वर्गाला सतत आठवण देत राहील की भांडवलशाहीला नष्ट केल्याशिवाय त्यांना मुक्ती मिळू शकत नाही.

पॅरिस कम्युनला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'कामगार बिगुल' च्या मार्च 2021 अंकापासून आम्ही जगातील पहिल्या कामगार राज्याच्या सचित्र कथेची सुरुवात केली आहे. 'मजदूर बिगुल' मध्ये मार्च 2012 पासून प्रकाशित झालेल्या धारावाहिक कथेचा अनुवाद पुढील अंकामध्ये आम्ही देत राहू.

**या साखळीतील पहिल्या काही पुष्पांमध्ये आपण पॅरिस कम्युनच्या पार्श्वभूमीमध्ये जाणून घेतले की कामगारांनी कशाप्रकारे भांडवलाच्या सत्तेविरोधात लढण्याची सुरुवात केली आणि कशाप्रकारे चार्टीस्ट आंदोलन आणि 1848 च्या क्रांत्यांमधून जात कामगार वर्गाची चेतना आणि संघटितपणा वाढत गेला. आपण कामगारांच्या मुक्तीच्या वैज्ञानिक विचारधारेचा विकास आणि कामगारांच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय संघटनेबद्दल (इंटरनॅशनलबद्दल) जाणले. गेल्या अंकात आपण पाहिले की कम्युनची स्थापना कशाप्रकारे झाली आणि तिच्या रक्षणाकरिता कामगार वर्गीय जनता कशाप्रकारे शौर्याने लढली. आपण हे देखील पाहिले की कम्युनने खऱ्या लोकशाहीच्या नियमांना इतिहासात पहिल्यांदा व्यवहारात कसे लागू केले आणि हे दाखवले की "जनतेची सत्ता" खरोखर काय असते. आता आपण त्या चुकांवर नजर टाकूयात ज्यांच्यामुळे कम्युनचा पराजय झाला. या चुकांना योग्य रितीने समजणे आणि भांडवलशाही विरोधात निर्णायक लढाईत विजयासाठी त्यातून धडे घेणे कामगारवर्गासाठी अत्यंत आवश्यक आहे.**

**— संपादक मंडळ**

# कामगार वर्गासाठी पॅरिस कम्युनचे ऐतिहासिक धडे



बॅरिकेड्स वर लढा देण्यासाठी एकत्र आलेली कामगार जनता. पॅरिस कम्युनच्या बहादुर कम्युनार्डांनी पॅरिस मध्ये कामगाराची फौलादी सत्ता कायम केली आणि बुर्झ्वा वर्गासोबत कोणतीही तडजोड केली नाही. परंतु ते विसरले की पॅरिसच्या बाहेर थियेरच्या मागे फक्त फ्रांस नाही तर संपूर्ण युरोपचे प्रतिक्रियावादी एकत्र येत आहेत.

**1.** कम्युनने जी ऐतिहासिक पाऊले उचलली, त्यांना ती खूप पुढे नेऊ शकली नाही. तिच्या जन्मापासूनच कम्युन शत्रूंनी घेरलेली होती, जे तिला नेस्तनाबूत करण्यासाठी टपलेले होते. 'कम्युनिस्ट घोषणापत्रा'तील शब्दांनुसार म्हाताऱ्या युरोपला जे "कम्युनिझमचे भूत" 1848 पासूनच सतावत होते, त्याला पॅरिस मध्ये वास्तवात उभे राहताना पाहून भांडवलदार वर्गाचे काळीज थरथर कापायला लागले. कम्युनला नेस्तनाबूत करण्यासाठी सगळ्या प्रतिक्रियावादी शक्ती एकत्र आल्या. पॅरिसच्या कामगारांच्या विद्रोहाच्या ठीक अगोदर मार्क्स आणि एंगल्स यांचे आकलन होते की अजून परिस्थिती तयार झालेली नाही. त्यांचे असे म्हणणे होते की क्रांती अजून चांगली तयारी झाल्यावर सुरू केली पाहिजे. पण जेव्हा कम्युन अस्तित्वात आली तेव्हा त्यांनी तिचे क्रांतीचे अभिवादन आणि जोरदार समर्थन केले. मार्क्सने समाजवादाच्या त्या बाल्यावस्थेतील प्रयोगाचा बारकाईने चांगला अभ्यास केला, जो पॅरिसच्या कामगारांनी आपल्या पुढाकाराने आणि सामुदायिक रचनात्मकतेवर उभा केला होता. यासोबतच मार्क्स कम्युनच्या भवितव्याबाबत कायम चिंतेत होते आणि आपल्या संपर्काद्वारे तसेच आंतरराष्ट्रीयच्या फ्रांस शाखेद्वारे कम्युनला सतत प्रस्ताव पाठवत होते.

**2.** मार्क्स हे स्पष्टपणे समजून चुकले होते की, बिस्मार्कची प्रशियाई फौज जी पॅरिस शहरा जवळ उभी होती, ती कम्युनला चिरडण्यासाठी एकतर थियेरला मदत करेल किंवा स्वतःच पॅरिसवर चाल करेल. म्हणून ते सतत प्रस्ताव देत होते की,पॅरिस कम्युनचा विजय कायम करण्यासाठी पॅरिसच्या कामगार फौजेने पॅरिस मधील प्रतिक्रांतिकारी फौजेला चिरडून आणि न थांबता व्हर्सायच्या दिशेने आगेकुच केली पाहिजे; तेच व्हर्साय जे थियेर सरकार सहीत पॅरिस मधील श्रीमंत लोकांचे आश्रयस्थळ बनले होते. त्यांचे म्हणणे हे होते की, यामुळे कम्युनचा विजय पक्का झाला असता आणि कामगार क्रांती पूर्ण देशात पसरली असती. हे रहस्य तर नंतर उलगडले की थियेर जवळ त्यावेळी एकूण फक्त 27 हजार हिंमत हारलेली फौज होती ज्यांना पॅरिसच्या एक लाख "नॅशनल गार्ड"ने चुटकीसरशी धुळ चारली असती.

मार्क्सने कम्युनच्या प्रमुख नेत्यांना, फ्राकेल आणि वाल्या यांना, सावध केले होते की पॅरिसला घेरण्यासाठी थियेर आणि प्रशियाई लष्कर यांच्या मध्ये सौदेबाजी होऊ शकते. तरी प्रशियाई सेनेला मागे ढकलण्यासाठी मोतंमात्र डोंगराच्या उतारावरील बाजूला नाकेबंदी केली पाहिजे. मार्क्स या गोष्टीमुळे खूप चिंतेत होते की कम्युन वाले फक्त आणि फक्त आपल्या बचावासाठी किंमती वेळ वाया घालवत आहेत आणि व्हर्साय वाल्यांना त्यांच्या सैन्यबळाची तटबंदी उभी करायची संधी देत आहेत. त्यांनी कम्युनार्डांना लिहिले की **प्रतिक्रियावादीची गुहा उध्वस्त करून टाका, फ्रेंच राष्ट्रीय बँकेचा खजिना ताब्यात घ्या आणि क्रांतिकारी पॅरिस साठी प्रांतांचे समर्थन प्राप्त करा.**



# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (नववे पुष्प)



एक कम्युनार्ड स्त्रीयोद्धा. बुर्झ्वा सेना या लढाऊ स्त्रियांना खूप घाबरत असे. कम्युनच्या पराजया नंतर त्यांना शोधून गोळ्या घातल्या गेल्या.


**3.** मार्क्सला हे स्पष्टपणे दिसत होते की, वैज्ञानिक सिद्धांतावर आधारित एका पक्षाचा अभाव त्या ऐतिहासिक परिस्थितीमध्ये कम्युनच्या कामांना वाईट प्रकारे प्रभावित करत होता. आंतरराष्ट्रीयची फ्रांसची शाखा कामगार वर्गाची राजकीय अग्रदल बनू शकली नाही. तिच्यात मार्क्सवादी विचार असलेल्या लोकांची संख्या सुद्धा कमी होती. फ्रेंच कामगारांमध्ये सैद्धांतिक बाजू सुद्धा खूप कमजोर होती. त्यावेळेपर्यंत 'कम्युनिस्ट घोषणापत्र', 'फ्रांसमध्ये वर्ग संघर्ष', 'भांडवल', इ. मार्क्सच्या प्रमुख रचना सुद्धा फ्रेंच भाषेमध्ये प्रकाशित झाल्या नव्हत्या. कम्युनच्या नेतृत्वामध्ये खूप सारे ब्लांकीवादी आणि प्रुधोंवादी सामील होते जे मार्क्सवादी सिद्धांत जाणत नव्हते, किंवा विरोधात होते. सामान्य कामगारांनी धक्का दिल्यावर त्यांनी सत्ता आपल्या हातात घेतली आणि खूप साऱ्या गोष्टी चांगल्या प्रकारे केल्या आणि येणाऱ्या पुढील कामगार क्रांत्यांसाठी बहुमोल शिकवणही दिली; परंतु आपल्या राजकीय चेतनेच्या कमतरतेमुळे त्यांनी खूप चुका सुद्धा केल्या.

कम्युनार्डांची एक मोठी चूक ही होती की ते शत्रूच्या शांततेच्या वाटाघाटींच्या फसवणुकीचे शिकार झाले आणि त्यादरम्यान शत्रूने युद्धाची तयारी पूर्ण केली. शत्रूचा पूर्णपणे नायनाट न करणे, व्हर्साय वर हल्ला न करणे आणि क्रांतीला पूर्ण देशात पसरू न देणे ही सगळ्यात मोठी चूक होती आणि सत्य हे आहे की नेतृत्वात मार्क्सवादी विचारधारेच्या अभावामुळे ह्या चुका होणारच होत्या.



जबरदस्त लढाईच्या दरम्यान थोड्यावेळ विश्रांती घेत आणि पुढची रणनिती बनवताना कम्युनार्ड. संघर्षाने पॅरिसच्या कामगारांमध्ये जबरदस्त एकीची भावना निर्माण केली.

**4.** मार्क्सने नंतर लिहिले की, "**जेव्हा व्हर्साय आपल्या शस्त्रांना धार लावत होते तेव्हा पॅरिस मतदान करत होते; जेव्हा व्हर्साय युद्धाची तयारी करत होते तेव्हा पॅरिस वाटाघाटी करत होते.** " याचा परिणाम असा झाला की, 1871 चा मे उजाडेपर्यंत थियेरच्या सैनिकांनी पॅरिसवर हल्ला चढवला होता. व्हर्सायच्या लुटखोरांच्या भाडोत्री सेनेचा तर कम्युनार्डांनी ठामपणे प्रतिकार केला आणि एकावेळेला तर त्यांना मागे ढकलले सुद्धा; परंतु व्हर्सायची सेना पॅरिसला घेराव घालून गोळीबार करत राहिली. याच वेळी फ्रान्सने कैद केलेल्या हजारो कैद्यांना मुक्त करून प्रशियाने थियेरला मोठी मदत केली. थियेरची सेना दक्षिण बाजूचे दोन किल्ले जिंकून पॅरिसच्या उंबरठ्यावर पोहचली. प्रशियाच्या सेनेने सुध्दा पुढे जाण्यासाठी त्यांची अप्रत्यक्ष मदत केली. 21 मे 1871 ला व्हर्सायचे डाकू आपले खाटकाचे सुरे घेवून पॅरिस मध्ये घुसले. शहराच्या चौका-चौकात आणि विशेषत: कामगार वस्त्यांमध्ये घनघोर लढाई झाली.








कम्युनचे रक्षण करण्यासाठी लढणाऱ्यांमध्ये स्त्रिया प्रत्येक पावलावर पुढे होत्या. घोडेस्वार सेनेला भिडणाऱ्या स्त्रियांची पलटण.

खाली डाव्या बाजूला: सेनेने जळत्या पॅरिस मधील भग्नावषेशांमध्ये घेरून कामगारांच्या कत्तली केल्या.

**5.** शहरातील चौका-चौकात आणि विशेषत: कामगार वस्त्यांमध्ये घनघोर युद्ध झाले. शेवटी 8 दिवसांच्या शौर्यशाली संघर्षानंतर पॅरिसचे शूर कामगार योद्धे पराजित झाले. या खूनी आठवड्यात 30,000 कामगार कम्युनचे रक्षण करताना शहीद झाले. विजयी प्रतिक्रियावाद्यांनी रस्त्यांवर जे तांडव केले ते आश्चर्यकारक होते. नागरिकांना रांगेत उभे करून हातावर पडलेले घट्टे पाहून कामगारांना वेगळे करून गोळी मारत असत. पकडलेल्या लोकांव्यतिरिक्त चर्चमध्ये शरण घेतलेले लोक आणि हॉस्पिटलमधले जखमी सैनिक यांना सुद्धा गोळ्या घालून ठार मारण्यात आले. त्यांनी म्हाताऱ्या कामगारांना हे सांगून गोळ्या घातल्या की "यांनी वेळो-वेळी बंड केली आहेत आणि हे खरे सरावलेले अपराधी आहेत." स्त्री कामगारांना असे म्हणत गोळ्या घातल्या की, "स्त्रिया म्हणजे अग्नी-बॉंब आहेत" आणि या फक्त मेल्यानंतर "स्त्री सारख्या" वाटतात. बाल कामगारांना हे म्हणत गोळी घातली की हे "मोठे होवून बंडखोर बनतील." हा नरसंहार पूर्ण जून महिन्यापर्यंत चालू होता. पॅरिस प्रेतांनी भरले होते. सैन नदी रक्ताची नदी झाली होती

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (नववे पुष्प)

कम्युनार्डांनी खूप शौर्याने सेने सोबत लढत दिली परंतु तोपर्यंत सेनेला तयारी करण्याची पूर्ण संधी मिळाली होती. त्यांच्याजवळ हत्यारे आणि सैनिक सुद्धा जास्त प्रमाणात होते. एकेका रस्त्यावर लढून सुध्दा त्यांना पराजय पत्करावा लागला. पॅरिसचे सर्व श्रीमंत लोक पळून गेले होते ते कामगारांच्या कत्तलींचे दृष्य पाहण्यासाठी परत आले होते. जेव्हा कामगाराना गोळी मारली जात असे, तेव्हा रस्त्यावर उभे राहून ते टाळ्या वाजवत.



6. कम्युनला रक्ताच्या समुद्रात बुडवून टाकले गेले. कम्युनार्डांच्या रक्ताच्या इतिहासाने कामगारासाठी कटू शिकवण लिहिली गेली की कामगार वर्गाला शेवटपर्यंत लढले पाहिजे. सत्ता शांतीने मिळणार आणि शांतीने तिचे रक्षणही होणार नाही. कम्युनची ही शिकवण आहे की पळणाऱ्या डाकूचा शेवटपर्यंत पाठलाग केला पाहिजे, पाण्यात बुडणाऱ्या उंदराला किनाऱ्यावर येण्याची संधी दिली नाही पाहिजे, शत्रूला दम घेवू दिला नाही पाहिजे आणि तोपर्यंत थांबता कामा नये जोपर्यंत भांडवली शत्रू कोणत्याही कोपऱ्यात जिंवत असेल. पॅरिस कम्युन नंतर सुध्दा जगाच्या इतिहासात कामगार वर्ग जेव्हा जेव्हा या शिकवणीला विसरला, तेव्हा तेव्हा त्याला शिकस्त मिळाली.

7. पॅरिस कम्युनच्या शहीदांनी आपल्या रक्ताने एक अमिट इतिहास लिहिला. कामगार वर्गाच्या पुढील क्रांत्यांच्या मार्गदर्शनासाठी त्यांनी बहुमूल्य शिक्षण दिले आणि आपल्या शहादतीच्या प्रकाशात एक दीपस्तंभ उभा केला.

कम्युनच्या जीवन काळात मार्क्सने लिहिले होते. : "जरी कम्युनला नष्ट केले तरी संघर्ष फक्त स्थगित होईल, कम्युनचे सिद्धांत शाश्वत आणि अमर आहेत; जो पर्यंत कामगार वर्ग मुक्त होत नाही तोपर्यंत हे सिद्धांत सतत प्रकट होत राहतील." कामगारांचे पहिले हत्यारबंद बंड आणि कामगारांच्या पहिल्या सर्वहारा सत्तेचे महत्त्व सांगत मार्क्सने म्हटले होते. "18 मार्चचे गौरवशाली आंदोलन मानव जातीला वर्ग शासनापासून नेहमी करता मुक्त करणाऱ्या महान सामाजिक क्रांतीची सुरुवात आहे."

कामगारांच्या कत्तलींचे दृष्य बघण्यासाठी रस्त्यावर जमलेले पॅरिसचे हरामखोर श्रीमंत आणि उच्चभ्रू लोक.





8. पॅरिस मध्ये कम्युनच्या पराजयाच्या दोन दिवसांनंतर मार्क्सने 30 मे 1871 ला आंतरराष्ट्रीयच्या सामान्य परिषदेच्या बैठकीत कम्युनचे मुल्यांकन करत एक अहवाल वाचला होता. हा रिपोर्ट 'फ्रांस मध्ये गृहयुद्ध' या शीर्षकाने प्रसिध्द कृती आहे; आणि ती आजही आपल्यासाठी एक महत्वाचे पुस्तक आहे.

मार्क्सने कम्युनच्या परिस्थितीचा, कारणांचा आणि अनुभवांचा सार काढून हा निष्कर्ष काढला की **"कामगार वर्ग राज्यसत्तेच्या तयार यंत्रणेला जसेच्या तसे हातात घेवू शकत नाही, आणि तिला आपला हेतू साध्य करण्यासाठी वापरू शकत नाही. त्यांनी सांगितले की कामगार वर्गाने जुन्या राज्य यंत्रणेला तोडण्यासाठी आणि नेस्तनाबूत करण्यासाठी क्रांतिकारी हिंसेचा वापर केला पाहिजे आणि कामगारवर्गाचे अधिनायकत्व लागू केले पाहिजे."**

9. अशा प्रकारे मार्क्स आणि एंगल्सने पॅरिस कम्युनच्या अनुभवांच्या आधारे क्रांतीच्या विज्ञानात एक महत्त्वपूर्ण भर घातली. जसे की, लेनिनने म्हटले की मार्क्सवादी म्हणजे तो नाही जो वर्ग संघर्ष मानतो, तर तो जो वर्ग संघर्षासोबत कामगारवर्गाचे अधिनायकत्व सुद्धा मानतो.

मार्क्सने बुर्झ्वा आणि कामगारवर्गीय राज्यसत्तेच्या प्रश्नावर जो महत्वाचा विचार ठेवला आणि लेनिनने ज्याला पुढे नेले, त्याचा स्पष्ट प्रस्थानबिंदू पॅरिस कम्युनच्या शिकवणीतच आहे. मार्क्सने हे स्पष्ट केले होते की सर्वहारा अधिनायकत्वाचा पहिला अवयव कामगार वर्गाची सेना आहे. कामगार वर्गाला आपल्या मुक्तीचा अधिकार युद्धभूमीत मिळवावा लागेल.

पॅरिस कम्युनच्या अपयशाचा सार काढत मार्क्स आणि एंगल्स यांनी हे अधिक स्पष्ट केले की कामगार वर्गाला सत्ता शस्त्रबळाने मिळते आणि त्याच्या सहाय्यानेच ती कायम राहू शकते. ती तेव्हाच टिकू शकते जेव्हा बुर्झ्वा वर्गाची सत्ता नष्ट झाल्यावर सुद्धा त्यांना परत सांभाळण्याची संधी दिली जाणार नाही आणि त्याचा समूळ नाश करण्यासाठी शेवटपर्यंत लढाई लढली जाईल.




...पुढील अंकात चालू

# काश्मिर मध्ये जनतेचे वाढते दमन आणि लोकशाही अधिकारांवर हल्ला

रवी

मोदी सरकारद्वारे लोकशाही अधिकारांच्या गळचेपीच्या घटना दिवसागणिक वाढत असतांना काही दिवसांपूर्वीच अजून एका घटनेची त्यात भर पडली. भारतीय राज्यसत्तेद्वारे काश्मिरी राष्ट्रासोबत केलेल्या अगणित विश्वासघातांच्या यादीमध्ये आता 20 जानेवारी रोजी काश्मिर प्रेस क्लबवर सैन्य पाठवून कब्जा केल्याची घटना देखील जोडली गेली गेली आहे. काश्मीरबाबत मोदी सरकारने केलेले सर्व दावे खोटे ठरले आहेत. स्वतंत्र पत्रकारांच्या हक्काची एकमेव जागासुद्धा आता हिसकावून घेण्याचे कृत्य या अपयशाचेच निदर्शक आहे.

5 ऑगस्ट 2019 रोजी कलम 370 आणि 35ए हटवून मोदी सरकारने जम्मू-काश्मिरच्या स्वायत्ततेला आणि विशेष दर्जाला संपवले. यानंतर काश्मीरचे सैन्य छावणीत रूपांतर करून दहा लाख जवानांना तिथे नियुक्त केले गेले. जगाच्या कोणत्याही क्षेत्रात एवढ्या मोठ्या प्रमाणात सैन्य तैनात केलेले नाही. राजकीय कार्यकर्त्यांना बंदी बनवण्यासोबत सामान्य जनतेलासुद्धा घरातच बंदी बनवले गेले. काश्मीरचे तुरुंग भरल्यानंतर भारताच्या तुरुंगांमध्ये काश्मीरवासियांना डांबण्यात आले. संपूर्ण जम्मू-काश्मिर मध्ये संचारबंदी लागू केली आणि फोन-मोबाईल-इंटरनेट सुविधासुद्धा बंद करण्यात आल्या आणि काश्मिरचा जगासोबतचा संपर्क पूर्णपणे तोडण्यात आला. या काळात अनेक पत्रकारांना चौकशीसाठी बोलवण्यात आले. काही पत्रकारांवर यूएपीए सारखे खटले भरले गेले. विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद पडले आणि सर्व परिक्षांना मुकावे लागले. लाखो लोकांचे रोजगार गेले. परंतु ही काही पहिली वेळ नव्हती जेव्हा काश्मिरी जनतेला अशा संकटांचा सामना करावा लागला आहे. काश्मिरींच्या अनेक पिढ्या अशाच वातावरणात वाढल्या आहेत. सामूहिक हत्याकांड, बलात्कार, अपहरण, गायब होणे ही काश्मिरी जनतेसाठी दैनंदिन बाब आहे. कुनान पाशपोरा पासून ते माछील एन्काऊंटर पर्यंत अनेक अशा घटना काश्मिरी जनतेच्या मनात जखमेप्रमाणे कायम आहेत.

नुकत्याच घडलेल्या काश्मीर प्रेस क्लबच्या घटनेने तर लोकशाही गळचेपीच्या सर्व मर्यादा तोडून टाकल्या. सरकारचे समर्थन करणाऱ्या काही पत्रकारांनी सैन्याच्या मदतीने काश्मीर प्रेस क्लबचा ताबा घेतला आणि त्यानंतर सरकारने हा क्लब बंद करून टाकला. क्लबने सरकारकडे नोंदणी न केल्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेच्या नावाखाली हा क्लब बंद करावा लागला असल्याचे कारण जम्मू आणि काश्मीर सरकारने दिले. टीकात्मक चर्चा करण्यासाठीच्या काही शेवटच्या ठिकाणांपैकी एक असलेल्या काश्मीर प्रेस क्लबला सुद्धा आता टाळे ठोकले गेले आहे. अनेक स्वतंत्र पत्रकारांसाठी काश्मीर प्रेस क्लब फक्त शिकण्याचे, चर्चा करण्याचे, जेष्ठ पत्रकारांकडून मार्गदर्शन घेण्याचे स्थान नाही तर त्यांचे दुसरे घर सुद्धा होते. सरकारच्या जनविरोधी धोरणांवर आणि पत्रकारांवर होणाऱ्या अत्याचारांवर बोलण्याचे बळ या क्लबतर्फे पत्रकारांना मिळायचे. ही एकमेव अशी जागा होती जी कलम 370 उठवण्याच्या काळात आणि कोव्हीड लॉकडाउनच्या काळात मुक्तपणे सुरु होती आणि पत्रकारांना आश्रय देत होती. काश्मीरचा मुक्त मीडिया संपवण्याच्या प्रयत्नातूनच ही कारवाई सरकारने केली आहे यात काही वाद नाही.

काश्मिरी पत्रकारांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न मोदी सरकार सुरुवातीपासूनच करत आले आहे. इण्टरनेशनल प्रेस इंस्टीट्यूट(IPI) ने सांगितले आहे कि काश्मीरमध्ये पत्रकारिता सरकारी दमनाची शिकार आहे. मागच्या 2 वर्षात 40 पेक्षा जास्त पत्रकारांना पोलिसांकडून पार्श्वभूमी तपासणीसाठी, चौकशीसाठी बोलवले गेले आहे. त्यापैकी 2 पत्रकारांना समाजमाध्यांवरील पोस्टच्या नावाखाली यूएपीए अंतर्गत अटक केली. याच काळात सरकारने "काश्मीर टाईम्स" आणि एका स्थानिक वर्तमानपत्राला सील केले. चौकशीसाठी बोलावणे, घरी छापे मारणे, लेख, समाजमाध्यमांवरील पोस्ट्स बद्दल विचारपूस करणे, त्यांच्या स्रोतांबद्दल माहिती काढून घेणे इत्यादी गोष्टी आता सरकारवर टीका करणाऱ्या पत्रकाराच्या आयुष्यात सामान्य झाल्या आहेत. मागच्या वर्षभरात सरकारने 25 पत्रकार आणि मीडिया हाउसेसला निशाणा बनवले. जानेवारी 2022 मध्ये सैन्य आणि अतिरेक्यांच्या झुंजीत एका 17 वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याच्या वार्तांकनाबद्दल 4 फेब्रुवारी रोजी "काश्मीर वाला" वृत्तपत्राचे मुख्य संपादक फहाद शाह आणि समाज माध्यमांवर पोस्ट केल्यामुळे माजिद हैदरी यांच्यावर देशद्रोहाचा खटला भरण्यात आला. काश्मीर मधील नावाजलेले पत्रकार गोव्हर गिलानी यांना अटक करण्याचे आदेश एका कोर्टाने दिले आहेत. पत्रकार आसिफ सुलतान ऑगस्ट 2018 पासून यूएपीए कायद्याअंतर्गत तुरुंगात आहेत. मसरत झाहरा यांच्या काश्मीरमधील पत्रकारितेमुळे त्यांच्या वडिलांना पोलिसांनी चौकशीदरम्यान मारहाण केली. काश्मीरच्या ज्या रस्त्यांवर पत्रकारांची गर्दी आणि मुक्त वावर होता तिथे आता शुकशुकाट पसरला आहे. काश्मीर मध्ये पत्रकारिता म्हणजे गुन्हाच आहे आणि त्यापेक्षा कमी काहीही नाही.

भाजप सरकारने कलम 370 आणि 35ए हटवताना जी "आश्वासनं" (ही आश्वासने कधी काश्मिरी जनतेने मागितलीच नव्हती) दिली होती ती सर्व खोटी ठरणारच होती आणि ठरली आहेत. मोदी सरकारचा दावा होता कि या पावलामुळे काश्मीर खऱ्या अर्थाने भारताचा हिस्सा बनेल, तेथे दहशतवाद संपेल, बेरोजगारी संपेल, "विकास" होईल, वगैरे. मागच्या दोन वर्षात झालेल्या जनदमनकारी कारवाया बघून हे सर्व एक थोतांड होते असे आता स्पष्टच आहे. मोदी सरकारने असाही दावा केला होता की या निर्णयात काश्मिरी जनता त्यांचे समर्थन करत आहे. जर काश्मिरी जनता या निर्णयाच्या समर्थनामध्ये असती तर संपूर्ण जम्मू-काश्मिरला फौजी छावणीमध्ये रुपांतरीत करण्याची आवश्यकता नव्हती. 5 ऑगस्ट 2019 पासून आतापर्यंत आधीच्या तुलनेत वेगवेगळ्या कारवायांमध्ये मृत्युमुखी पडणाऱ्या नागरिकांच्या संख्येत 15 टक्क्यांनी वाढ झाली आहे. काश्मीरमधील जमिनी भारतातील बलाढ्य भांडवलदारांच्या घशात घालण्यासाठी काश्मीरच्या संविधानातील भूमी कायद्यांमध्ये बदल करून मोदी सरकारने आता काश्मिरींना त्यांच्याच जमिनीवरून हाकलणाऱ्या कायद्यांना पारित करून घेतले आहे. या कायद्या अंतर्गत सरकार जमीनमालकांच्या परवानगी शिवाय जमिनीचे अधिग्रहण करू शकते आणि ती "विकासा"साठी वापरू शकते. परंतु याविरुद्ध काश्मिरींना न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार सुद्धा दिला गेलेला नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ चलित भाजप सरकारने कलम 370 आणि 35ए हटवण्याचे मुख्य कारण हेच होते कि देशातल्या भांडवलदारांसाठी काश्मीरचे रान मोकळे करून देणे. 5 ऑगस्ट 2019 नंतर मोदी सरकारने भांडवलदारांना काश्मीरमध्ये गुंतवणुकीसाठी आवाहन केले. भांडवदारांसाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा स्रोत, स्वस्त श्रमशक्ती आणि एक नवी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठीच हे पाऊल उचलले गेले.

काश्मिरी जनतेचे दमन करण्यासाठी आणि येनकेनप्रकारेण सत्ता मिळवण्यासाठी मोदी सरकारने उचललेले आणखी एक पाऊल म्हणजे मतदारसंघाची पुनर्रचना. जम्मू-काश्मीर विधानसभेच्या जागा काश्मीरमध्ये 46, जम्मूमध्ये 37 आणि लडाखमध्ये 4 अशा विभागल्या होत्या. 2014 च्या निवडणुकीत भाजपने धार्मिक ध्रुवीकरण करून हिंदुबहुल जम्मू प्रांतामध्ये वर्चस्व प्रस्थापित केले. भाजपने जिंकलेल्या 25 जागांपैकी 22 जागा हिंदु-बहुल जम्मू आणि 3 जागा मुस्लिम-बहुल जम्मू भागातील होत्या. परंतु भाजपला काश्मीर मध्ये एकही जागा जिंकता आली नव्हती. या निवडणुकीत पी.डी.पी. पक्षासोबतच्या युतीने भाजपने जम्मू आणि काश्मीर मध्ये सरकार स्थापन केले. काश्मीर खोऱ्यामध्ये भाजपला जागा मिळण्याची शक्यता अत्यंत धुसरच होती. तेव्हा धार्मिक ध्रुवीकरणाच्या मार्गाने सत्ता मिळवण्यासाठी आतुर असलेल्या भाजपने आता मतदार संघांची पुनर्रचना करून बहुमत मिळवण्याचे कारस्थान आखले आहे. मोदी सरकार आता जम्मूमधील विधानसभेच्या जागांमध्ये 6 ने वाढ करत आहे. काश्मीरची लोकसंख्या जम्मूच्या तुलनेत 15 लाखांनी जास्त असली तरीही काश्मीरमधील विधानसभेच्या जागांमध्ये फक्त 1 ने वाढ करणार आहे. एवढेच नाही तर काही मतदारसंघांच्या भौगोलिक सीमा बदलून मुस्लिम-बहुल मतदारसंघांना हिंदु-बहुल, किंवा मुस्लिम बाहुल्य कमी केलेले मतदारसंघ बनवण्याचा प्रयत्नसुद्धा मोदी सरकार करत आहे. थोडक्यात जम्मू आणि काश्मीर मधील जनतेच्या धार्मिक ध्रुवीकरणाच्या जोरावर सत्ता हस्तगत करण्याचे भाजपचे षडयंत्र उघड आहे. देशभराप्रमाणेच इथेही हिंदु-मुस्लिम तेढ निर्माण करून संघ परिवार इतर राज्यांप्रमाणे इथे सुद्धा भांडवलदारांच्या सेवेत अग्रणी असेल यात काही शंका नाही.

स्वातंत्र्यावेळी जम्मू-काश्मिरच्या जनतेला दिलेल्या आश्वासनाला, म्हणजे सार्वमताच्या अधिकाराला भारत-पाकिस्तानने सतत डावलले आहे. भारतीय राज्यसत्तेसोबतच पी.डी.पी., एन.सी., काँग्रेस, जे.आर.पी. सारख्या मूळ काश्मिरी पक्षांनीही त्यांच्या भांडवली हितांकरिता भारतीय भांडवली राज्यसत्तेसोबत हातमिळवणी करत, भ्रष्टाचाराचे विक्रम स्थापित करत, आणि संधीसाधूपणा दाखवत काश्मिरी जनतेच्या आकांक्षांना धोकाच दिला आहे. कोणत्याही जनसमुदायासोबत सक्तीने, दमनाने कधीही एकता स्थापित होऊ शकत नाही. कामगार वर्ग नेहमीच दमित राष्ट्रीयतांच्या स्वनिर्णयाच्या अधिकाराचे विनाशर्त समर्थन करतो. त्यामुळेच काश्मिर मध्ये जनतेच्या चाललेल्या दमनाला भारतातील कामगार वर्गाने प्रखर विरोध केला पाहिजे.

# स्त्री कामगारांचा संघर्ष श्रमाच्या मुक्तीच्या महान संघर्षाचा हिस्सा आहे !

पान 8 वरून

न्याय्य अधिकारांसाठी लढतात तेव्हा आम्ही त्यांना समजून घेऊ शकतो, त्यांना सहानुभूती देखील दर्शवू शकतो, व गरज पडल्यास त्यांची मदत देखील करू शकतो, आणि हे अधिकार मिळवल्याने कामगार स्त्रियांना देखील फायदाच होईल.

परंतु ह्या स्त्रियांनी केलेल्या सर्व मागण्या आज मान्य जरी झाल्या तरी कामगार स्त्रियांच्या आयुष्यात खूप फरक पडणार नाही. स्त्री कामगार तेव्हा देखील प्रदीर्घ काळासाठी, अत्यंत कमी मजुरीवर व आरोग्यास अत्यंत घातक अशा परिस्थितीत काम करत राहतील, तेव्हाही वेश्यावृत्ती आणि उपासमार ह्यांतील निवड त्यांना करावीच लागेल. हे देखील पहिल्यापेक्षा जास्त प्रकर्षाने दिसेल कि वर्ग संघर्षात स्त्री कामगारांना त्यांच्या शत्रू गोटात नेक स्त्रिया भेटतील; पण त्यांना अशांशी देखील तितक्याच उग्रपणे लढावे लागेल जितके कामगार वर्गातील त्यांच्या बांधवांना भांडवलदारांशी लढावे लागते. मध्यमवर्गातील स्त्री-पुरुषांना एक 'मुक्त-क्षेत्र' हवे आहे, जेणेकरून कामगारांचे शोषण केले जाऊ शकेल.... जेव्हा बुर्ज्वा स्त्रिया अशा कुठल्याही अधिकाराची मागणी करतात जो आपल्यासाठी देखील फायद्याचा आहे, तेव्हा आपण देखील त्यांच्या बरोबरीने लढू, जसे आपल्या वर्गातील पुरुषांनी सुद्धा मतदानाच्या अधिकाराला केवळ त्याची मागणी भांडवलदार वर्गाने केली आहे म्हणून नाकारले नव्हते. आपण देखील बुर्ज्वा स्त्रियांनी आपल्या हितासाठी मिळवलेला असा कोणताही अधिकार नाकारणार नाही जो त्या आपल्याला इच्छेने वा अनिच्छेने प्रदान करतात. आम्ही अशा अधिकारांना हत्यारे म्हणून स्वीकारतो, अशी हत्यारे जी आम्हाला आमच्या कामगारवर्गीय बांधवांच्या बरोबरीने उभं राहून लढायला बळ देतात. आम्ही पुरुषांशी लढण्यासाठी एकत्र आलेल्या स्त्रिया नसून, शोषकांच्या विरोधात लढणारे कामगार आहोत.

# चिले: "समाजवादा"च्या नावाने पुन्हा एकदा फसवे स्वप्न!

पान 5 वरून

नाही. बोरिक "कम्युनिस्ट" म्हणवल्या जाणाऱ्या पक्षाच्या पार्श्वभूमीतून येत असला तरी ना तो पक्ष कोणत्याही अर्थाने कम्युनिस्ट आहे (या पक्षाचे नेते डॅनियल जाड्यु यांनी बोरिकला समर्थन देताना म्हटले की "मला नाही वाटत की आर्थिक सुधार आणि क्रांती मध्ये काही अंतर्विरोध आहे!"), आणि ना बोरिक.

राष्ट्रपतीच्या निवडणुकीमध्ये फॅसिस्ट प्रवृत्तींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, पिनोचेट च्या सत्तेचे समर्थन करणाऱ्या, कास्ट या उमेदवाराच्या विरोधात सर्व उदारवादी, सामाजिक जनवादी शक्तींनी पाठिंबा दिल्यामुळे बोरिककडे मते वळली. व्यवस्थेला आव्हान देण्याची शक्यता असलेल्या जनांदोलनांना दडपशाहीने उत्तर द्यावे की भुलवून याबद्दल भांडवलदार वर्गामध्ये असलेल्या साशंकतेचेच प्रतिनिधित्व करणारी ही निवडणूक होती. तथाकथित कम्युनिस्टांपासून ते उजव्या-लोकशाहीवाद्यांपर्यंत सर्वांचे समर्थन प्राप्त झालेल्या बोरिक यांचे वर्गचरित्र या समर्थनातूनच व्याख्यायित होते.

आजवरच्या त्याच्या थोडक्या राजकीय कारकिर्दीतच बोरिकने स्वत:च्या "जुळवून" घेण्याच्या प्रवृत्तीची लक्षणे दाखवली आहेत. बोरिकने राष्ट्रपती निवडणुकीच्या काळातच 'काराबिनेरोस' या काळ्या कारवायांसाठी प्रसिद्ध असलेल्या गुप्तहेर-तपास यंत्रणेच्या विरोधातील आपली भाषा बऱ्यापैकी मऊ करून टाकली होती. या यंत्रणेला पिनोचेटच्या काळात सैनिकी दर्जा मिळाला होता. काराबिनेरोसबद्दल अगोदर "लोकांना मारून टाकलेले चालणार नाही", "आमूलाग्र बदल" अशी भाषा करणारा बोरिक मार्च 2020 पासून "संवादातून सुधारणा" करण्याकडे वळला होता. थोडक्यात सत्तेच्या दमनकारी अंगांबद्दल त्याने अगोदरच पडती भुमिका घेतली आहे. हे समजणे आवश्यक आहे की अशा यंत्रणांचे अस्तित्व मूळात देशांतर्गत विरोधाला दाबण्यासाठी असते.

चिले मध्ये मोठ्या संख्येने "मापुचे" आणि "अराउकॅनिया" सारखे अनेक आदिवासी समूह जंगलांमध्ये राहतात. येथे मोठ्या प्रमाणात साम्राज्यवादी भांडवलाला आणि चिलेमधील भांडवलाला "विकास" कामांचे, अर्थातच पर्यावरणाची राखरांगोळी करत धंदा करण्याचे, परवाने दिले गेले होते, ज्यांच्या विरोधात आदिवासींचे व्यापक आंदोलन उभे राहिले होते. बोरिकने मापुचे लोकांसोबत "संवाद" करण्याची भाषा केलेली असली तरीही त्यांना हव्या असलेल्या स्वायत्ततेच्या मागणीबद्दल मात्र भुमिका घेतलेली नाही. थोडक्यात, या भागांमध्ये होत असलेली विकासकामे, पर्यावरणाचा विध्वंस आणि आदिवासींवर होणारे अत्याचार यावर बोरिकने तडजोडीची तयारी दाखवलेली आहे! नव्या संविधानावर होत असलेल्या चर्चेमध्ये आदिवासींच्या विशेष अधिकारांच्या मागणीला भांडवलदारांचे प्रतिनिधी विरोध करत आहेत, परंतु बोरिक यावरही गप्प आहे. "संवादा"वर जोर देणाऱ्या बोरिकने बहुराष्ट्रीय कंपन्यांसोबतही "संवाद" करणार हे जाहिर केले आहे. कामगारांशी, आदिवासींशी आणि कंपन्यांशी "संवादा"नंतर बाजू कोणाची घेणार हे मात्र जाहीर केलेले नाही, पण त्याचे उत्तर तर स्पष्ट आहे!

प्रचारादरम्यानच बोरिकने "सामाजिक अधिकारांच्या विस्तारा"बद्दल बोलले होते, परंतु सोबतच "वित्तीय शिस्ती"ची आणि "व्यापक अर्थव्यवस्थेची काळजी घेण्याची" सुद्धा हमी दिली होती. वित्तीय शिस्तीचा अर्थच आहे की सरकार करत असलेल्या खर्चावर निर्बंधही लावले जातील. हे स्पष्ट आहे की बोरिक जनतेला खुश करण्याकरिता मोठमोठी आश्वासने देत आहे. बोरिक यांच्याबद्दल जगभरातील भांडवली प्रसारमाध्यमांनी त्यांना "डावे" म्हणत जे कौतुकास्पद लेख लिहिले आहेत ते कोणत्याही राजकीयदृष्ट्या जागरूक व्यक्तीला त्यांचे वास्तव समजण्यास पुरेसे असले पाहिजेत. कोणत्याही अर्थाने कामगार वर्गाची सत्ता नसलेल्या, भांडवली अर्थव्यवस्था चालवणाऱ्या व्हेनेझुएला, कुबा, निकाराग्वा येथील सत्तांनाही बोरिकने "नापास" म्हटले आहे, यातूनच त्याची प्राथमिकता लक्षात आली पाहिजे.

व्हेनेझुएलाचे माजी राष्ट्रपती ह्युगो चावेझ यांनी सुद्धा सरळ "समाजवादा"चा नारा देत आणि लाल झेंडे फडकावत अशाच प्रकारच्या आश्वासनांची जंत्री लावली होती. काही प्रमाणात तेल उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करून आलेल्या पैशाच्या वापरातून त्यांनी कल्याणकारी योजना राबवल्या सुद्धा, परंतु नफ्याकरिता चाललेल्या व्यवस्थेला हे सुद्धा मान्य होणे शक्यच नव्हते. चावेझ यांच्याकडे समाजाच्या क्रांतिकारी परिवर्तनाची कोणतीही वैज्ञानिक योजना नव्हती आणि त्यामुळेच चावेझच्या काळातच महागाई, काळाबाजारी सारखे मुद्दे जोर धरू लागले होते. व्हेनेझुएलातील निम्न-मध्यम वर्ग आणि भांडवलदार वर्गाच्या एका हिश्श्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या चावेझच्या सत्तेला त्यामुळेच कोणताही "समाजवाद" आणणे शक्य नव्हते. आज तर व्हेनेझुएला एका भीषण आर्थिक संकटात सापडलेला आहे, जे एका भांडवली अर्थव्यवस्थेचेच लक्षण असते.

चिलेमध्ये सुद्धा यापेक्षा वेगळे भविष्य काही असू शकत नाही. चावेझ वा बोरिक सारख्या "नायकां"च्या मार्फत भांडवली व्यवस्थेला कोणतेही आव्हान मिळत नाही कारण पर्यायी व्यवस्था उभी करण्याचा प्रश्न व्यक्तिगत नेतृत्वाचा वा चांगल्या इच्छांचा नाही, तर विज्ञानाचा प्रश्न आहे. भांडवली व्यवस्थेवर एकच उपाय आहे आणि तो आहे कामगार वर्गाच्या अधिनायकत्वाचा, ज्याची सुरुवात संपूर्ण उत्पादन साधनांच्या सामाजिकीकरणानेच होऊ शकते. योग्य मार्क्सवादी समजदारीवर आधारित कामगार वर्गाच्या राजकीय पक्षाच्या नेतृत्वातच हे काम होऊ शकते, ना की समाजवादी लफ्फाजी करणाऱ्या बोरिक सारख्या लबाडांकडून.

# शिवसेना-भाजप मधील कलगीतुरा व त्याचा खरा अन्वयार्थ

**✎ नेहा**

कधीकाळी शिवसेना आणि भाजप बरेच वर्ष मित्रपक्ष होते, पण नुकताच शिवसेनेचे संजय राऊत व भाजपचे किरीट सोमय्या यांच्यात जो कलगीतुरा झाला, त्याचा खरा अर्थ समजणे गरजेचे आहे. बाजारी प्रसारमाध्यमे याला चघळवण्याचा विषय बनवत असले तरी कामकरी जनतेने या दोन पक्षांमधील वादाच्या विषयाला मनोरंजन म्हणून न बघता या वादातून भाजप, शिवसेना आणि काँग्रेसादी सर्व भांडवली पक्षांचे खरे चरित्र काय आहे ते समजले पाहिजे.

सोमय्या, राउत आणि इतर नेत्यांच्या वक्तव्यांमधून खालील तथ्य समोर आली आहेत.

1. भाजपचे किरीट सोमय्यांनी हजारो कोटींचा गृहनिर्माण प्रकल्प उभारला आहे. पीएमसी बँक घोटाळ्यात सोमय्यांनी ब्लॅकमेल करून कॅश आणि दुसऱ्याच्या नावावर जमीन घेतली. वसईत लाडानी नावाच्या व्यक्तीच्या नावावर असलेली चारशे कोटींची जमीन फक्त साडेचार कोटीला घेतली.

2. भाजपचे किरीट सोमय्या यांचे पुत्र नगरसेवक नील सोमय्या यांनी निकॉन फेज वन आणि टू असे हजारो कोटींचे प्रकल्प उभे केले आहेत. हा सगळा पैसा पीएमसी बँकेतील आहे. पीएमसी बँकेतील पैसे काढून घ्या असेही आपल्या निकटवर्तीयांना त्यांनी सांगितले आहे, म्हणजे ही बँक बुडणार अशी यांना कल्पना आहे.

3. वनमंत्री राहिलेल्या भाजपा नेत्याने मुलीच्या लग्नात जंगलाचा आभास व्हावा म्हणून त्यांनी जे कारपेट टाकलं होतं त्याची किंमत साडेनऊ कोटी रुपये होती.

4. राज्यात भाजपचे सरकार असताना भरतीमध्ये 25 हजार कोटींचा घोटाळा झाला. यामध्ये अमोल काळे आणि विजय ढवंगाळे हे दोन व्यक्ती सामील होते.

5. संजय राऊत यांचे निकटवर्तीय समजले जाणारे उद्योजक प्रवीण राऊत यांच्यावर आर्थिक मामल्यांच्याप्रकरणात ईडीद्वारे अटकेची कारवाई झाली आहे. तसेच 1034 कोटी रुपयांच्या कथित घोटाळा प्रकरणात ईडीने संजय राउतांच्या मुलीच्या कंपनीतील भागिदार सुजित पाटकर यांच्या निवासस्थानी छापे मारले.

6. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे आणि मनिषा वायकर यांच्याकडे 19 बंगले आहेत. ही घरे वनविभागाच्या जमिनीवर बांधण्यात आली आहेत.

7. कधीकाळचे शिवसेना-काँग्रेसवासी आणि आताचे भाजपवासी नारायण राणे यांच्यावर 100 बोगस कंपन्या निर्माण केल्याचा आरोप आहे.

खरेतर याकाळात झालेल्या सर्व आरोपांची यादी अजून मोठी आहे. परंतु मुद्दा समजण्याकरिता वरील तथ्ये पुरेशी आहेत.

आता हे विसरून तर चालणार नाहीच की भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत लोळण्यात यांचे भागीदार काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसपक्ष कोणाच्याही मागे नाहीत! अजित पवारांच्या सिंचन घोटाळ्यावरून त्यांना तुरुंगात टाकण्याची भाषा करणाऱ्या भाजपने अजित पवारांसोबत शपथविधी करवला होता आणि "भूखंडाचे श्रीखंड खाल्ले" सारखे असंख्य भ्रष्टाचाराचे आरोप शरद पवारांवर झाले आहेत. काँग्रेस पक्षाला जनता उपरोधाने "खांग्रेस" म्हणते आणि काँग्रेस व भ्रष्टाचार यांचे समीकरण जनतेला इतके चांगले माहित आहे की त्याची यादी इथे देण्याची गरजही नाही. या पक्षांसोबतच वरवर प्रामाणिकपणा, साधनशुचिता यांचा आव आणणाऱ्या भाजपच्या नेत्यांचे आणि त्यांचा साथीदार असलेल्या शिवसेनेच्या नेत्यांचे पाय भ्रष्टाचाराच्या गाळात किती रुतलेले आहेत हे मात्र पुन्हा दिसून आले आहे.

हे समजणे आवश्यक आहे की शिवसेना-भाजपची एकल सत्ता असताना, युती सरकारच्या काळात यांच्या नेत्यांनी हे भ्रष्टाचार केले, परंतु तेव्हा माहित असूनही दोन्ही पक्षांचे नेते गप्प होते. थोडक्यात वाटा मिळत होता, तेव्हा ते एकमेकांकडे कानाडोळा करत होते. आता जेव्हा दोन वेगळ्या गटात आहेत तेव्हा एकमेकांची थोडीशी प्रकरणे बाहेर काढून जनतेला मूर्ख बनवण्याचा प्रयत्न करत आहेत.

हे विसरता कामा नये की या पक्षांच्या नेत्यांनी एकमेकांचे बाहेर काढलेले भ्रष्टाचाराचे वास्तव म्हणजे फक्त हिमनगाचे टोक आहे. या भांडवली पक्षांच्या सरकारांमध्ये चालू असलेल्या कोणत्या कामामध्ये भ्रष्टाचार होत नाही? अनेकांना वाटते की या पक्षांच्या नेत्यांच्या वैयक्तिक गुण-अवगुणांमुळे ते कमी किंवा जास्त भ्रष्ट असतात. मनमोहन सिंह किंवा इंद्रकुमार गुजरालांसारखी नावे लोक पुढे आणून म्हणतात की ही लोकं प्रामाणिक होती, वगैरे. नक्कीच वैयक्तिक चारित्र्यामुळे थोडाफार फरक तर पडतोच. परंतु हे समजणे आवश्यक आहे की या पक्षांचे भांडवली चरित्र त्यांना कायद्याच्या चौकटीत किंवा चौकटीबाहेरच्या भ्रष्टाचाराकडे नेणारेच आहे!

भांडवली पक्षांचे अस्तित्वच असते भांडवलदार वर्गाच्या एखाद्या गटाच्या हितांच्या रक्षणासाठी. मोठे उद्योगपती, छोटे उद्योगपती, क्षेत्रीय उद्योगपती, व्यापारी, ठेकेदार, बिल्डर अशा भांडवलदारांच्या विविध गटांपैकी काही गटांच्या हितरक्षणासाठीच हे पक्ष अस्तित्वात येतात. निवडणुकांमध्ये जनतेची मतं मिळवायला जरी ते "आम्ही सर्वांचे" सारखी भाषा वापरत असले तरी निवडून आल्यावर मात्र ते निर्णय, धोरणे सर्व आपापल्या पाठिराख्या भांडवलदार वर्गासाठीच राबवतात. म्हणून एकीकडे ते कायदेच असे बनवतात जेणेकरून कामगारांना स्वस्तात पिळवून घेत मालकांचे नफे वाढत राहतील आणि दुसरीकडे जनतेच्या कराच्या पैशांमधून सुद्धा लोकांच्या गरजांवर नाही तर भांडवलदारांच्या सोयीच्या प्रकल्पांवर खर्च करतात. या प्रकल्पांवर खर्च होणाऱ्या पैशांचा आणि मालकांच्या नफ्याचा एक वाटाच या पक्षांचा निधी बनतो आणि त्यावर हे पक्ष चालतात.

भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, मनसे, शिवसेना यासारख्या सर्व भांडवली पक्षांच्या सर्व नेत्यांना ही गणितं माहित आहेत. म्हणूनच ते कधी या पक्षात तर कधी त्या पक्षात जातात आणि काही फरक पडत नाही! म्हणूनच हे सर्व सत्तेत असताना कायद्याच्या चौकटीत किंवा तिला ओलांडून पक्षाला पोसणाऱ्या भांडवलदारांचे खिसे भरायचे काम करतात. या पक्षांचे काही नेते स्वत:च भांडवलदार असतात आणि भांडवलदार या नात्याने कमावतात आणि बाकीचे भांडवलदारांकडून दलाली घेतात. "आप" सारखे भांडवली पक्ष वरवर प्रामाणिकपणाचा आव ठेवत, पारदर्शकतेचा चेहरा ठेवत, "कायदेशीर" मार्गाने उद्योगपतींकरिता योजना, धोरणे राबवतात आणि "जाहीरपणे" देणग्या घेतात! यांच्या पारदर्शकतेमुळे असो किंवा भाजप-शिवसेने सारख्या पक्षांच्या भ्रष्टाचारामुळे असो, जनतेवर होणाऱ्या परिणामात काहीही गुणात्मक फरक पडत नाही!

म्हणूनच सरकार कोणाचेही येवो किंवा जावो, जनतेच्या जीवनात कोणताही आमूलाग्र बदल होत नाही. आज सामान्य जनतेने, कामगार कष्टकऱ्यांनी भांडवली पक्षांचे खरे चरित्र ओळखून सामान्य जनतेच्या, कामगार कष्टकऱ्यांच्या निधीवर चालणारा स्वत:चा पक्ष उभा व मजबुत करणे आणि खाजगी संपत्ती व नफ्याची व्यवस्था संपवणाऱ्या क्रांतिकारी आर्थिक परिवर्तनांकडे जाणे हाच भ्रष्टाचारावर खरा उपाय होऊ शकतो.

# पाच राज्यातील निवडणूक निकाल

पान 1 वरून

आपल्या भ्रामक प्रचाराची यंत्रणा जोमाने चालवतात. काँग्रेसप्रणीत सरकारांच्या काळात, विशेषत: 1991 पासून जागतिकीकरणाची धोरणे सुरू झाल्यानंतर, ज्या वेगाने गरिबी, बेरोजगारी, बदहाली वाढली त्याच्याच परिणामी जनतेच्या मोठ्या हिश्श्याचा या तथाकथित विकासाबद्दलचा भ्रमनिरासही वाढत गेला. जनतेमधील या असंतोषाचा फायदा घेत आणि त्याला व्यवस्थाविरोधी असंतोषाकडे जाऊ न देण्याकरिताच भांडवलदार वर्ग 2013 पासूनच जोमाने फॅसिस्ट भाजपच्या मागे उभा राहिला आहे; कारण की फॅसिस्टांकडे जनतेला जात-धर्म-अस्मितेच्या चौकटीत अडकवणारी, भांडवली व्यवस्थेऐवजी मुस्लिम-दलितांना शत्रू म्हणून दाखवणारी ती जास्त प्रभावी विचारधाराही आहे आणि तिच्या प्रचाराकरिता लागणारे कॅडर सुद्धा. त्यामुळेच निवडणुकीत हरले तरी सुद्धा भाजप-संघाची जमिनीवरची शक्ती संपत नाही. विरोधात असतानाही जातीय-धार्मिक प्रचाराची बीजं जनतेत रोवण्याची कामं ते करत राहतातच आणि सत्तेत असलेल्या भांडवली पक्षांची धोरणेही पुन्हा यांच्याकरिता पोषक वातावरण तयार करत जातात.

सर्वच भांडवली पक्ष भ्रष्ट असतातच, परंतु फॅसिस्टांमागे असलेली भांडवलदारांमार्फत नियंत्रित मीडियाची शक्ती त्यांच्या भ्रष्टाचाराला मुद्दा न बनवता मुस्लिम-चीन-पाकिस्तान-अंधराष्ट्रवाद यांचाच विखारी खुराक जनतेला देत राहते; आणि इतर भांडवली पक्ष जर सत्तेवर असले तर हाच मीडिया त्यांच्या भ्रष्टाचाराला सुद्धा फॅसिस्टांच्या समर्थनाचा एक मुद्दा बनवतो. तेव्हा इतर भांडवली पक्षांचे सत्तेत येणे अनेकदा फॅसिस्टांच्या पुढील उभाराकरिता जमीन तयार करत जाते

त्यामुळे फॅसिस्टांच्या कॅडर आधारित जन-आंदोलनाला योग्य वैज्ञानिक समजदारीवर आधारित क्रांतिकारी कॅडर आधारित कामगार वर्गीय जन-आंदोलन, म्हणजेच एक योग्य कम्युनिस्ट आंदोलनच खरे उत्तर देऊ शकते. हे आंदोलन उभे करणे हा आज आपल्यासमोरील सर्वात महत्वाचा कार्यभार बनतो. फॅसिझम विरोधातील लढा तेव्हाच यशस्वी होऊ शकतो जेव्हा त्यांच्या भरती केंद्रांना खिंडार पाडले जाईल, जेव्हा एका प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलनाच्या विरोधात एक क्रांतिकारी सामाजिक आंदोलन उभे केले जाईल जे फॅसिस्टांच्या खोट्या दाव्यांचा निरंतर भंडाफोड करेल, जेव्हा एका कॅडर आधारित गुंडशक्तीला एक क्रांतिकारी संघटित शक्ती उत्तर म्हणून उभी राहील; जेव्हा सर्वधर्मसमभावाला त्यागून खऱ्या धर्मनिरपेक्षतेच्या आधारावर राजकारण उभे राहील आणि राष्ट्रवादाला नाकारत आंतरराष्ट्रीयतावादाला रुजवले जाईल; जेव्हा उदारवाद, समाजवाद, दुरुस्तीवादाला त्यागून एका योग्य कामगार वर्गीय समजुतीवर आधारित क्रांतिकारी आंदोलन उभे राहील जे फॅसिस्टांच्या मागे उभ्या असलेल्या भांडवलाच्या शक्तीला खऱ्या अर्थाने आव्हान बनेल आणि जनतेमध्ये क्रांतिकारी समाजपरिवर्तनाची मागणी रुजवेल आणि या मागण्यांकरितांचे झुंझार लढे उभे करेल.

# नेटवर्क मार्केटींगचा भुलभुलैया

पान 3 वरून

नाहीत तर त्या त्याला वैचारिकरित्या सुद्धा भ्रष्ट करतात. विनामेहनत पैसा कमावणे ही भांडवलदार मालकाची मूल्य-मान्यता असते, कारण नफ्याच्या रुपाने ते विना-मेहनतच संपत्ती एकत्र करत असतात. नेटवर्क मार्केटींग सारख्या योजनांद्वारे 'झटपट', 'विनामेहनत', 'नशिबाच्या जोरावर' पैसे कमावण्याची सर्व भ्रामक स्वप्ने दाखवून खरेतर कामगार वर्गाच्या मनात भांडवली विचारांचे बी पेरले जाते आणि स्वत: अपरंपार मेहनत घेऊनही, फुकट राबूनही जेव्हा नेटवर्क मार्केटींग मधून स्वप्न साकार होत नाहीत तेव्हा दोष स्वत:च्या नशिबाला वा कर्तृत्वहीनतेला दिला जातो. याप्रकारे कामगार वर्गाला श्रमाच्या संस्कृतीपासून दूर करण्याचे, श्रमप्रतिष्ठेच्या मूल्यापासून दूर करण्याचे काम केले जाते.

अशा सर्व फसव्या योजनांना समजायचे असेल, त्यांचा भंडाफोड करायचा असेल तर कामगार वर्गाने मार्क्सवादी राजकीय अर्थशास्त्राचा अभ्यास चालू केला पाहिजे आणि नफ्याच्या, झटपट श्रीमंतीच्या शोषणकारी कल्पनांना नाकारत, समानतेच्या, श्रमप्रतिष्ठेच्या, समाजवादाच्या मूल्यमान्यतांवर आधारित, शोषणाच्या विरोधात एकता स्थापित केली पाहिजे.

# दिल्लीच्या अंगणवाडी स्वयंसेविकांचा ऐतिहासिक संप

पान 15 वरून

कामगारांना ह्या व्यवस्थेचे, त्यातील यंत्रणेचे, वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे आणि त्यांच्या मालकांचे खरे चरित्र उघडे करून दाखवतो. दिल्लीच्या अंगणवाडी कामगारांच्या संपाने कामगारांना हे सर्व काही शिकवले आहेच, परंतु त्याचबरोबर इतरही अनेक गोष्टी कामगार ह्या संपाद्वारे शिकले.

संपाचे कव्हरेज व वृत्तांकन करणाऱ्या प्रसारमाध्यमांचे चारित्र्य ओळखून संपकरी महिलांनी पहिल्या दिवसापासूनच **हिंदुत्व-फॅसिस्टांच्या मांडीवर जाऊन बसलेल्या 'गोदी मीडिया'चा जाहीर संपूर्ण बहिष्कार केला. अंगणवाडी** कामगारांचा संघर्ष प्रथमतः आपच्या केजरीवाल सरकार विरोधात आहे, पण त्याबरोबरच केंद्रातल्या मोदी सरकारविरोधात सुद्धा आहे. मानधनात वाढीची मागणी जरी दिल्ली सरकारकडे असली, तर कर्मचाऱ्याचा दर्जा देण्याची मागणी किंवा नवे शिक्षण धोरण रद्द करण्याची मागणी व अशा इतर अनेक महत्त्वाच्या मागण्या ह्या मोदी सरकारकडे आहेत. असे असताना कुठल्याही राजकीय पक्षाने वा शक्तीने कुठल्याही दुसऱ्या राजकीय पक्ष वा शक्तीच्या विरोधात ह्या संघर्षाचा वापर करून घेता कामा नये ह्याबाबतीत संपकरी कामगार सजग होते.

संप हे केवळ राजकीय शिक्षणाचे प्राथमिक विद्यालय असते असे नाही तर कामगारांमधून जन्माला येणाऱ्या कला व कामगारवर्गीय संस्कृतीचे देखील ते प्राथमिक विद्यालय असते. दिल्लीच्या अंगणवाडी कामगारांच्या संपात देखील कामगारवर्गीय पथनाट्य बसवण्यासाठी व संपात सादर करण्यासाठी म्हणून **कामगारांमधूनच 'अपराजिता नाट्य टोळी' बनवली गेली.** 10 फेब्रुवारी रोजी, महान कामगारवर्गीय नाटककार व साहित्यिक बर्टोल्ट ब्रेख्तच्या जन्मदिनी, ह्या टोळीने कष्टकरी महिलांच्या दैनंदिन आयुष्यावर आधारित एका पथनाट्याचा प्रयोग देखील केला.

**'सडकें हि हमारी गॅलरी है' नावाने एक आर्ट गॅलरी देखील आंदोलन स्थळी लावण्यात आली.** ह्या आर्ट गॅलरीद्वारे पिकासो, गुत्तोसो, सारख्या इतिहासातील महान कामगार वर्गीय कलाकारांची कला थेट कामगारांपर्यंत पोचत आहे. त्या कलाकृतींमध्ये जगभरातील कामगारांच्या परिस्थितीबद्दलच्या, त्यांच्या संघर्षाच्या चित्रांनी कामगारांची सौंदर्यदृष्टी विकसित केली. त्याबरोबरच अनेक कलाकार, छायाचित्रकार व कलाशाखेतील विद्यार्थी संपात सहभागी झाले आणि चित्रकला, ग्राफिटी व पोस्टर बनवून संपाची कलात्मक नोंद इतिहासात जतन केली. वर्गसंघर्षाच्या घुसळणीतून कामगारवर्गीय कलेची निर्मिती येथे दिसून आली.

### सामूहिक संघर्षाचा चढता आलेख : संपाचे योग्य डावपेच

दररोज सरकारला घेरायचे वेगवेगळे मार्ग व वेगवेगळ्या पद्धतींचा वापर कामगारांनी केला. सुरुवातीला गोवा व पंजाबला टीम पाठवून आपचे 'भांडाफोड अभियान' चालवले गेले. त्यानंतर 11 फेब्रुवारीला आंदोलनस्थळापासून एक भव्य रॅली आयोजित केली. त्यानंतर प्रेस कॉन्फरन्स बोलावून मीडियासमोर अंगणवाडी कामगारांची परिस्थिती व संपातील मागण्या मांडल्या आणि आप व सिटूचे चरित्र उघड केले. अंगणवाडी कामगारांचा संघर्ष व्यापक जनतेपर्यंत पोचवण्यासाठी जनतेच्या नावे पत्रक काढून प्रत्येक अंगणवाडी कामगाराने आपापल्या कार्यक्षेत्रातील घरोघरी पोचवले. 'आप'च्या स्थानिक नेत्यांच्या कार्यालयाबाहेर निदर्शने करून त्यांच्या नाकी नऊ आणणारे 'नाक में दम करो' अभियान चालवले. दिवसागणिक संघर्षातील वैविध्य आणि त्याचा ज्वर चढता ठेवला, व त्याचबरोबर ह्याद्वारे सरकारला चहूबाजूंनी घेरण्याची रणनीती देखील प्रभावीपणे अंमलात आणली.

दुसरे, आणि तितकेच महत्त्वाचे म्हणजे संपामध्ये आडकाठी आणणाऱ्या प्रत्येक शक्तीशी लढताना कलम-कायद्याच्या कचाट्यात न अडकता, **कुणालाही आर्जव, विनंत्या, निवेदने, पत्राचार इत्यादी सोपस्कार न करता, कुठल्याही नायकाच्या करिष्म्यावर विसंबून न राहता, केवळ कामगारांच्या एकजुटीच्या सामूहिक शक्तीच्या जोरावरच सर्वांचा बिमोड केला.** परिवहन महामंडळाचा घेराव करणे असो, पहाटेपर्यंत पोलीस स्टेशनचा घेराव करणे असो, रॅलीत बॅरिकेड उल्लंघणे असो, किंवा 'नाक में दम करो' अभियान असो, संघर्षाचा मार्ग जनतेनेच दाखवला आहे, आणि जनतेच्या एकीच्या जोरावरच लागू केला गेला आहे. इतिहास घडवणारी, जग बदलणारी एकमेव शक्ती जनताच आहे, हाच जनदिशेचा गाभा आहे. दिल्लीच्या अंगणवाडी कामगारांच्या संघर्षाने जनदिशा लागू करण्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आज देशातील व जगातील कामगारांसमोर ठेवले आहे.

जनदिशेवर सामूहिक संघर्ष संगठीत होण्याच्या प्रक्रियेमध्येच वैयक्तिक प्रतिरोध व अभिव्यक्ती देखील फुलत जाते. **"संप सुरु नसता तर 'माझ्यासाठी बस का थांबवली नाहीस रे?' म्हणून बसला सामोरे जाऊन अडवण्याची माझी कधीच हिम्मत झाली नसती.** हे ह्या संपामुळेच शक्य झाले." अशा आशयाची भावना अनेक महिलांनी व्यक्त केली आहे. अभिनयाची आवड असणाऱ्या महिलांनी नाट्य टोळीमधून हजारो प्रेक्षकांसमोर अभिनयकौशल्य प्रदर्शित केले. संपात अनेक महिला मंचावर येऊन आपल्या हजारो सहकाऱ्यांशी हितगुज करतात, लिहून येऊन भाषण करतात, मंचावरून गाणी, कविता, घोषणा देतात ही जनदिशेचीच अभिव्यक्ती होती.

### 8 मार्च रोजीचा अतिभव्य मोर्चा

आंतरराष्ट्रीय महिला दिनी, 8 मार्च रोजी, अंगणवाडीच्या 22,000 कामगार महिलांनी गेल्या अनेक दशकातील सर्वाधिक भव्य असा मोर्चा काढून संपूर्ण दिल्लीला लाल रंगाने भरून टाकले आणि "जब लाल-लाल लहरायेगा, तब होश ठिकाने आयेगा" असे म्हणत आप आणि भाजप सरकारांना निर्वाणीचा इशाराच दिला.

### 'एस्मा' आणि दडपशाही

कामगार वर्गाच्या याच शक्तीला पाहून वरवर एकमेकांना विरोध करणारे भाजप आणि 'आप' एकत्र आले आणि दिल्लीच्या लेफ्टनंट गव्हर्नरांमार्फत कामगारांवर 'एस्मा' कायदा लागू केला. या कायद्यान्वये सरकारला आता कामगारांना विना वॉरंट अटक करण्याचे, कामावरून काढण्याचे, तुरुंगात टाकण्याचे अधिकार दिले आहेत. हा कायदा सरकारी कर्मचाऱ्यांनाच लागू होतो. अंगणवाडी कर्मचाऱ्यांची एक प्रमुख मागणी सरकारी कर्मचाऱ्याचा दर्जा मिळावा हीच आहे. असे असतानाही सरकारी कर्मचारी नसलेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांना आप आणि भाजप सरकारने 'एस्मा' लावून आपले दमनकारी चरित्र तर दाखवून दिले आहे. या निर्णयाविरोधात संप सध्या स्थगित करून युनियनने न्यायालयाचे दार ठोठावले आहे आणि या निर्णयाच्या संवैधानिकतेला आव्हान दिले आहे. न्यायालयाने कामगारांचा अधिकार नाकारत निर्णय नकारात्मक दिल्यास सविनय कायदेभंगाची चळवळ करण्याचा आणि निर्णय सकारात्मक आल्यास आंदोलन पुन्हा चालू ठेवण्याचा निर्धार युनियनने जाहीर केला आहे.

ह्या संपातून मिळालेले धडे व शिकवणी कामगारांना भविष्यातील संपात व वर्गसंघर्षात मार्गदर्शक ठरतील ह्यात शंका नाही.

# दिल्लीच्या अंगणवाडी स्वयंसेविकांचा ऐतिहासिक संप

पान 16 वरून

अंगणवाडीत खाजगी भांडवलाच्या शिरकावाला मोठी चालना दिली आहे. ह्या संपातून नवे शिक्षण धोरण रद्द करण्याची व अंगणवाडीमध्ये खाजगी भांडवल व एनजीओंची घुसखोरी थांबवण्याची मागणीसुद्धा अंगणवाडी कामगार करत आहेत.

अंगणवाडीतील रिकाम्या जागा तातडीने भरल्या जाव्यात, तसेच लोकसंख्येच्या प्रमाणात अंगणवाड्यांची संख्या विस्तारली जावी ह्याही मागण्या कामगारांनी केल्या आहेत. दोन वर्षांपूर्वी नरेंद्र मोदींनी त्यांच्या 'मन कि बात' कार्यक्रमात देशभरात अंगणवाडी सेविकांचे व सहाय्यिकांचे मानधन क्रमशः 1,500 व 750 रुपयांनी वाढवल्याचे जाहीर केले होते. ह्या घोषणेस चाळीस महिने उलटून गेले तरी ही वाढवलेली रक्कम कुणाच्याही खात्यात जमा झालेली नाही. हे थकवलेले पैसे तात्काळ दिले जावेत ही देखील संप करणाऱ्या कामगारांची मागणी आहे.

7 सप्टेंबर 2021 रोजी अंगणवाडी कामगारांनी एक भव्य रॅली काढून दिल्लीचे महिला व बाल कल्याण मंत्री, राजेंद्र पाल गौतम ह्यांना मागणीपत्रक सोपवले होते. त्यानंतर 3 महिने त्यावर काहीही कारवाई राज्य सरकारकडून झाली नाही. त्यामुळेच अंगणवाडी कामगारांनी अनिश्चितकालीन संप पुकारला आहे.

### अंगणवाडी कामगार विरोधी केजरीवाल सरकार : आम आदमी पार्टीचे वर्ग चारित्र्य ओळखा !

अंगणवाडी कामगारांच्या संपाला आडकाठी करण्याचे नित्य नवे मार्ग केजरीवाल सरकार शोधते, व आपल्या सामूहिक शक्तीच्या जोरावर **अंगणवाडी कामगार महिला आप सरकारचे हे प्रयत्न हाणून पाडतात असे संपकाळात अनेक वेळा घडले आहे.** सुरुवातीच्या काही दिवसात दिल्लीच्या सार्वजनिक बस सेवेच्या बस अंगणवाडी कामगारांसाठी थांबत नसत, त्यांना बसू देत नसत. महिलांना आंदोलनस्थळी पोहोचता येऊ नये म्हणून केजरीवाल सरकारचा पाठिंबा व आदेश ह्यामागे असल्याशिवाय हे होऊ शकत नाही असे युनियनच्या कामगारांनी सांगितले. काही दिवसांनी आंदोलनरत महिलांनी एकत्रितपणे बससमोर जाऊन बस अडवणे सुरु केले. त्यानंतरही काही ठिकाणी असाच प्रकार सुरु राहिला तेव्हा शेकडो कामगारांनी 23 फेब्रुवारी रोजी दिल्ली परिवहन महामंडळाच्या तीन महत्त्वाच्या डेपोंना घेराव घातला.

**दिल्लीच्या कामगार कष्टकऱ्यांना केजरीवाल व आम आदमी पार्टीने केवळ "कल्याणकारी" भूलथापा दिल्या आहेत.** केजरीवालच्या घरासमोर हजारो अंगणवाडी कामगार संपावर बसलेले असताना केजरीवाल मात्र पंजाब- गोव्याचे प्रचारदौरे करत फिरत होता, व त्याही राज्यांमध्ये सत्तेवर येण्याची स्वप्ने रंगवत होता. गोव्याच्या आणि पंजाबच्या जनतेसमोर गोड बोलून गळे कापणाऱ्या केजरीवालचे पितळ उघडे पाडण्यासाठी अंगणवाडी कामगारांची एक तुकडी गोव्याच्या व दोन तुकड्या पंजाब दौऱ्यावर जाऊन आल्या. तेथे त्यांनी 'भांडाफोड अभियान' चालवले व त्या राज्यांतील अंगणवाडी कामगारांसमोर व जनतेसमोर 'आप'ला उघडे केले.

त्यानंतर केजरीवाल सरकारने अंगणवाडी कामगारांच्या मानधनात दीड-दोन हजाराची थातुरमातुर वाढ करून अंगणवाडी कामगारांना दिग्भ्रमित करण्याचा पुन्हा प्रयत्न केला. मानधनात ही वाढ म्हणजे केजरीवाल सरकारने भुरळ घालून संप मोडून काढण्याचा केलेला प्रयत्न आहे, व कामगार ही लढाई जिंकत असल्याचेच द्योतक आहे हे ओळखून **कामगारांनी आप सरकारने दाखवलेले हे नवे गाजर धुडकावून लावले व आपल्या मागण्यांसाठी संप चालूच ठेवला.**

### संपविरोधी सरकारी यंत्रणेविरोधातही कामगारांचा संघर्ष

अंगणवाडी ज्याच्या अखत्यारीत येते त्या महिला व बालविकास विभागाने देखील संप मोडून काढण्याचे पुरेपूर प्रयत्न केले. संप सुरु होण्याच्या एक दिवस आधी विभागातील अधिकाऱ्यांनी संपाचे नेतृत्व करणाऱ्या दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियनला व युनियनच्या कार्यकर्त्यांना बदनाम करण्यासाठी अंगणवाडी कामगारांमध्ये दुष्प्रचार मोहीमच उघडली होती. संपातून माघार घेतल्यास अंगणवाडी मदतनिसांना बढती देऊन अंगणवाडी सेविका करणार असल्याची बतावणी करून विभागाने अंगणवाडी मदतनिसांना भुलवून संप कमकुवत करायचा प्रयत्न केला. त्यानंतर दररोज काही कामगारांना विभागाकडून धमक्या व कारणे दाखवा नोटिसा येऊ लागल्या. ह्यातील कशालाही दिल्लीचे अंगणवाडी कामगार बधलेले नाहीत. उलट त्यांनी संप दिवसेंदिवस अधिकाधिक तीव्र केला आहे. विभागाने संपकरी कामगारांना धमक्या देऊन त्यांच्या संप करण्याच्या लोकशाही अधिकारावर आघात केल्याबद्दल कामगारांना आलेल्या धमक्या व नोटिसा मागे घेण्याची मागणी करत शेवटचे अनेक दिवस महिलांनी दिल्लीच्या महिला व बालविकास मंत्रालयाच्या कार्यालयात देखील धरणे आंदोलन चालू केले.

"जनतेच्या सुरक्षेसाठी" उभ्या केलेल्या पोलीस यंत्रणेचे कामगारविरोधी रंग देखील ह्या संपाने उघडे पाडले आहेत. 11 फेब्रुवारी रोजी कामगारांनी एका भव्य रॅलीचे आयोजन केले होते. ही रॅली पोलिसांनी बराच वेळ विनाकारण व वास्तवात बेकायदेशीरपणे अडवून ठेवली. कामगारांच्या संयमाचा बांध फुटल्यावर पोलिसांनी लावलेले बॅरिकेड उल्लंघून कामगारांनी रॅली सुरु केली. पोलिसांनी रॅली सुरु असताना काहीही केले नाही. परंतु रॅली संपवून संध्याकाळी कामगार पुन्हा आंदोलनस्थळी परतल्यानंतर काही कामगारांना व युनियनच्या ध्वनिक्षेपक यंत्रणेला पोलिसांनी ताब्यात घेतले. दिवसभर रॅली काढल्यानंतरही शेकडो कामगारांनी पोलीस ठाण्यासमोरच ह्याविरोधात धरणे आंदोलन सुरु केले. कामगारांच्या एकजुटीच्या दबावाखाली सर्व कामगारांना पोलिसांनी सोडल्यानंतरच रात्री अडीच वाजता कामगारांनी आपले धरणे मागे घेतले.

### सिटू : कामगार चळवळीतील बिभीषण

केजरीवाल सरकार व सरकारी यंत्रणा अंगणवाडी कामगारांचा लढा मोडून काढण्याचे सर्व प्रयत्न करत होतेच. त्यांच्या बरोबरीला चळवळीत कामगारांचा लाल झेंडा घेऊन कामगारांच्या मागे मागे चालण्याचे ढोंग करणाऱ्या व संधी मिळताच कामगारांच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्या सिटू सारख्या दलाल कामगार संघटना देखील संप फोडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नरत होत्या.

अंगणवाडी कामगारांनी दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियन ह्या स्वतंत्र युनियनच्या नेतृत्वात 31 जानेवारीपासून संप पुकारला होता. कामगारवर्गाशी प्रामाणिक असणारी कोणतीही संघटना, कामगारांच्या न्याय्य मागण्यांचे व लढ्याचे समर्थनच करील. दिल्ली शेजारील गुरगावच्या ऑटोमोबाईल इंडस्ट्री कॉन्ट्रॅक्ट वर्कर्स युनियन पासून महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन पर्यंत आणि छत्तीसगड माईन्स श्रमिक संघापासून न्यू यॉर्क सिटी रेस्टॉरंट वर्कर्स युनियनपर्यंत अनेक कामगार संघटनांनी अंगणवाडी कामगारांच्या ह्या संघर्षाला समर्थन दिले आहे. अंगणवाडी कामगारांनी व त्यांच्या दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियनने देखील दिल्ली परिवहन महामंडळ कॉन्ट्रॅक्ट वर्कर्स युनियन पासून त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी संप करणारे दिल्ली महानगरपालिकेचे डॉक्टर व नर्सेस सर्वांना पाठिंबा दिला आहे.

माकप पक्षाची कठपुतळी असलेल्या **सिटूने मात्र आपल्या स्वभावाला व पूर्वेतिहासाला जागून पुन्हा एकदा अंगणवाडी कामगारांचा लढा फोडून काढण्याचे प्रयत्न चालवले.** सिटूची एक युनियन दिल्लीच्या अंगणवाडी कामगारांमध्ये कार्यरत होती, परंतु तिचा विश्वासघातकी स्वभाव दिसून आल्यानंतर 2015 मध्ये कामगारांनी ह्या युनियनला त्यांच्या संपातून पळवून लावले होते. आता ह्या युनियनचे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच कामगार सदस्य आहेत. इतर युनियन व संघटनांप्रमाणे अगोदरच सुरु असलेल्या आणि हजारो कामगारांचा सहभाग असलेल्या संपाला पाठिंबा देणे तर सोडाच, सिटूच्या अंगणवाडी युनियनने 5 फेब्रुवारी रोजी, मूळ अंगणवाडी संपाचे सहा दिवस उलटून गेल्यावर, एक स्वतंत्र वेगळे मागणीपत्रक सरकारला देऊन त्याआधारे आपले वेगळे आंदोलन चालवले. हे मागणीपत्रक मूळ संपाच्या मागणीपत्रकापेक्षा अत्यंत मवाळ होते. ह्याने कामगारांची एकी विखुरते व कमकुवत होते, आणि त्यामुळे सरकारला हा संप मोडून काढणे सोपे होते हे सरळ आहे. त्यामुळे सिटू आणि तिची अंगणवाडी युनियन हे कामगारांच्या बाजूचे नाहीत तर सरकारच्याच बाजूचे आहेत हे स्पष्ट आहे.

इतकेच करून सिटू थांबली नाही, तर 11 फेब्रुवारीला संपकरी कामगारांनी रॅली काढली त्यादिवशी ह्या दलालांनी देखील रॅली काढण्याचा कांगावा केला. 21 फेब्रुवारी रोजी केजरीवाल सरकारशी वार्ता देखील केली. परंतु आपल्या वाटाघाटींनी संप संपुष्टात येत नाही हे लक्षात आल्यावर सरकारशी वाटाघाटी अयशस्वी झाल्याचे जाहीर केले ! समाजमाध्यमांवर दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियनच्या कार्यकर्त्यांचे चारित्र्यहनन करण्यापर्यंत आता सिटूची मजल गेली. संप करणाऱ्या कामगारांवर पोलिसांनी केलेल्या दडपशाहीच्या विरोधात सिटूच्या युनियनने एक चकार शब्द काढलेला नाही. ह्यातूनच त्यांचे खरे चारित्र्य दिसून येते !

दिल्लीचे अंगणवाडी कामगारदेखील सिटूचे वास्तव अनुभवातून जाणून आहेत. सिटूच्या युनियनने संप फोडण्याचा पहिला प्रयत्न केल्यावर लगेचच हजारो संपकरी कामगारांनी मिळून गद्दार सिटूच्या पुतळ्याला काठ्या-चपलांचा नैवेद्य दाखवला व त्याचे दहन केले. **'ये अंदर कि बात है, केजरी-सिटू साथ है', 'दलाल सिटू मुर्दाबाद',** 'सिटू कि है एक दवाई, जूता, चप्पल, और पिटाई' सारख्या घोषणा कामगार संपात दररोज देत व अशा विश्वासघातकी दलालांपासून आपल्या साथीदारांना सावध करत.

देशभरातील कामगार देखील सिटूच्या ह्या केविलवाण्या प्रयत्नांमुळे शिक्षित झाले. 2011 मधील मारुती कामगारांचा लढा असो, किंवा 2015 मधील दिल्लीच्या अंगणवाडी कामगारांचा संप, सिटूच्या युनियनने नेहमीच सरकारपुढे नमते घेतले आहे, दलाली केली आहे, व कामगारांच्या नावावर पावत्या फाडून सिटूचे नेते गब्बर झालेले आहेत. अनेक क्षेत्रांमधील अनेक लढायांमध्ये सिटूच्या गद्दारीमुळे कामगारांना हार पत्करावी लागली आहे, व आज कामगारांचे लढे कमजोर करण्यामध्ये व हाणून पाडण्यामध्ये सर्वात मोठा वाटा सिटूचाच आहे.

**सिटूचा मातृक पक्ष, माकप देखील कामगारांचे रक्त पिणाऱ्या ह्या भांडवली व्यवस्थेची एक बचावफळी बनलेला आहे.** बंगाल-केरळ मध्ये यांची सत्ता असताना भांडवली धोरणे राबवण्यात हे इतर पक्षांपेक्षा एक पाऊल सुद्धा मागे नव्हते ! तेलंगणापासून काश्मीर पर्यंत आणि मुंबईपासून बंगालपर्यंत देशभरात कामगार कष्टकऱ्यांवर दडपशाही आणि जुलूम करणाऱ्या काँग्रेसला देखील ह्यांनी समर्थन दिलेले आहे, आणि आम आदमी पार्टीचे देखील तोंड भरून कौतुक केले आहे. अशा ह्या सिटू आणि माकपचे पितळ पुन्हा एकदा उघडे पाडण्याचे काम दिल्लीच्या झुंजार अंगणवाडी कामगारांनी केले आहे.

इतरही अनेक संघटनांचे खरे चारित्र्य ह्या संपाच्या निमित्ताने दिसून आले. काही सन्माननीय अपवाद वगळता "पुरोगामी", "स्त्रीवादी" इत्यादी बिरुदं मिरवणाऱ्या बहुतांशी विचारवंतांनी ह्या ऐतिहासिक संघर्षावर 'अळी मिळी गुप चिळी' हेच धोरण अवलंबले. जातीय-धार्मिक अस्मितेवर प्रखर जळजळीत भूमिका घेणाऱ्या अनेक व्यक्ती व संघटना देखील अंगणवाडी कामगारांच्या संघर्षावर मूग गिळून गप्पच होत्या. अंगणवाडी कामगारांमध्ये सर्वच जाती-धर्मांच्या महिला आहेत. त्यांच्या शोषणाच्या विरोधात त्या आवाज उठवत आहेत. तरीदेखील सर्वच जाती-धर्मांतील अस्मितावादी संघटना मात्र ह्या मुद्द्यावर मौन होत्या. अस्मितावादी राजकारण किती पोकळ आहे, आणि जाती-धर्माच्या नावाने डरकाळ्या फोडणारे नेते व संघटना वास्तव संघर्षात कशा पद्धतीने पायात शेपूट घालून बिळात लपून बसतात हे पुन्हा एकदा अंगणवाडीच्या संघर्षाने दाखवून दिले आहे.

### संप : वर्गसंघर्षाचे प्राथमिक विद्यालय !

**संप हे कामगारांचे प्राथमिक विद्यालय असते असे महान क्रांतिकारक लेनिन ह्यांनी म्हटले आहे.** प्रत्येकच संप कामगार वर्गाला हे शिकवतो कि हे जग पैशावर नाही तर कामगारांच्या श्रमावर चालतं. प्रत्येकच संप

पान 14 वर

# दिल्लीच्या अंगणवाडी स्वयंसेविकांचा ऐतिहासिक संप

## कामगार चळवळीच्या इतिहासातील मैलाचा दगड

**निमिष**

दिल्ली मध्ये दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल ह्यांच्या घरासमोर चाललेला अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा ऐतिहासिक संप सध्यापुरता स्थगित झालेला असला, तरी या संपाने कामगार चळवळीमध्ये एक मैलाचा दगड रोवला आहे. 31 जानेवारी पासून दिल्लीच्या अंगणवाडी कामगारांचा संप चालू झाला. **दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियनच्या** नेतृत्वात दिल्लीचे 22,000 अंगणवाडी कामगार पगारवाढ, सरकारी कर्मचाऱ्याचा दर्जा इत्यादी मागण्यांसाठी दिल्लीच्या कानाकोपऱ्यातील 11,000 अंगणवाडी केंद्रांना टाळे ठोकून सिव्हिल लाईन्स येथे संपावर बसल्या होत्या. गेला महिनाभर चाललेल्या ह्या झुंजार संघर्षाने देशातल्या सर्वच मुख्य राजकीय शक्तींचे पितळ कामगारांसमोर उघडे पाडले आहे. संपकरी कामगार सरकारी कर्मचाऱ्याच्या दर्जाची मागणी करत आहेत, परंतु केजरीवालचे **आप सरकार आणि केंद्रातील भाजप सरकारने मिळून** दिल्लीतील अंगणवाडी संपकरी कामगारांवर सरकारी कर्मचाऱ्यांकरिताच असलेला 'एस्मा' हा दमनकारी कायदा लागू करून आपल्या दमनकारी चरित्राची ओळख दिली आहे. यानंतर न्यायालयाकडे न्याय मागत सध्या संप स्थगित केला गेला असला तरी अंगणवाडी कामगारांचा हा संघर्ष देशभरातील सर्वच कामगारांना महत्त्वाची शिकवण आणि प्रेरणा देणारा संघर्ष ठरत आहे.

### अंगणवाडी : प्रकल्पाची व कामगारांची वास्तव परिस्थिती

देशभरात अंगणवाडीची सुरुवात जवळ जवळ अर्ध्या शतकापूर्वी झाली. त्या काळात भारताचा बालमृत्युदर 202 होता. म्हणजेच जन्माला आलेल्या प्रत्येक 1,000 बाळांपैकी 202, म्हणजेच एक पंचमांश पेक्षा जास्त बाळांचा मृत्यू एका वर्षाच्या आतच होत असे. कुपोषणाची स्थिती देखील अतिशय भयानक होती. ग्रामीण भागात पाच वर्षांखालील 62 टक्के मुले कुपोषित होती. आरोग्यव्यवस्थेची अवस्था देखील अत्यंत दयनीय होती. भांडवली राज्यसत्ता नेहमीच जनतेच्या दैन्यावस्थेला मर्यादित करण्याचा प्रयत्न करते, जेणेकरून जनतेचा असंतोषही मर्यादित रहावा. ह्या पार्श्वभूमीवर 1975 मध्ये इंदिरा गांधींनी कुपोषण व बालमृत्युदर कमी करण्याच्या व विशेषतः ग्रामीण आरोग्यव्यवस्था घरोघरी पोचवण्याच्या उद्दिष्टाने एकात्मिक बाल विकास सेवेची (ICDS) स्थापना केली. ह्या सेवेअंतर्गत देशभरात व विशेषतः ग्रामीण भागात अंगणवाड्यांचे जाळे उभे केले गेले. प्रत्येक अंगणवाडीत एक सेविका व एक मदतनीस कामावर असणे अपेक्षित आहे. गरोदर महिलांना व लहान मुलांना आहार व पूरक पोषण पुरवणे, लहान मुलांना अनौपचारिक प्राथमिक-पूर्व शिक्षण देणे, लसीकरण व आरोग्य तपासणी करणे ह्या सर्व अंगणवाडी सेविका व मदतनिसांच्या जबाबदाऱ्या आहेत असे कागदोपत्री म्हटले गेले आहे.

परंतु वास्तव अत्यंत वेगळे आहे. अनेक अंगणवाड्यांमध्ये अनेक जागा रिक्त आहेत. त्याशिवाय, अंगणवाडी सेविका व मदतनिसांच्या कार्यक्षेत्रात नसलेल्या अनेक गोष्टी त्यांच्याकडून करवून घेतल्या जातात. गावातील गाई-गुरांचा सर्व्हे करणे, गरोदर महिलांचे डोहाळेजेवण आयोजित करणे, इतकेच काय, सत्तेतले पक्ष निवडणुकीच्या काळात स्वतःचा प्रचार देखील अंगणवाडीच्या कामगारांकडून करवून घेतात. प्रत्येक सरकारी योजनेची माहिती आणि लाभ प्रत्येक घरादारापर्यंत पोहोचवण्याचे काम अंगणवाडी कामगारांच्याच अंगावर पडते. अंगणवाडीच्या कामगारांना प्रत्येकच सरकारने (सर्वच राज्यांतील व केंद्रांतील सुद्धा) हरकाम्या गुलामासारखे वापरून घेतले आहे. त्या वरताण म्हणजे रोजच बारा बारा तास सरकारचे तळागाळातील काम करण्यासाठी पायपीट करणाऱ्या व झिजणाऱ्या ह्या कामगारांना




सरकार कामगार वा कर्मचारी मानतच नाही! सरकारच्या लेखी ह्या सर्व महिला स्वयंसेवक आहेत! अंगणवाडी कामगारांना सरकारकडून पगार नाही, मानधन मिळते! काम करवून घेताना मात्र पडेल ते काम करायची सक्ती असलेले गुलाम, आणि मोबदला देताना मात्र स्वयंसेवक असा कावा करून सरकार अंगणवाडी कामगारांच्या श्रमाची अतिप्रचंड प्रमाणात लूट करत आहेत.

परंतु असे करणारे केवळ दिल्लीचे केजरीवाल सरकार नाही, किंवा केवळ आज केंद्रात असलेले मोदी सरकार देखील नाही. गेल्या पन्नास वर्षांपासून सर्वच सरकारे हेच करत आहेत. व्यापक दृष्टीने बघितल्यास, ही केवळ आपल्या देशापुरती मर्यादित घटना आहे असेही नाही. जगभरामध्येच, सामाजिक पुनरुत्पादनाच्या कामांमध्ये—म्हणजेच लहान मुलांचे भरणपोषण व संगोपन, वयोवृद्धांची देखभाल इत्यादी कामांमध्ये लागणाऱ्या श्रमाला दुय्यम समजले गेले आहे, व हे श्रम करणाऱ्या व्यक्तींना देखील दुय्यम समजले गेले आहे. त्यामुळेच अंगणवाडी मध्ये काम करणारे कामगार देखील कामगार किंवा कर्मचारी नाही, तर स्वयंसेवक म्हणवतात. ह्यातून त्यांचे मोठ्या प्रमाणावर अनौपचारिक शोषण देखील दररोज होत असते. भांडवली व्यवस्था श्रमशक्तीला माल बनवते, आणि सामाजिक पुनरुत्पादनात खर्च झालेल्या श्रम शक्तीला सर्वात निम्न दर्जाचा माल बनवते. ह्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर महिलाच कार्यरत असल्याने ह्यातून महिलांच्या श्रमशक्तीचे आणि अंतिमतः महिलांचे देखील मोठ्या प्रमाणावर अवमूल्यन होते. भांडवली पितृसत्तेचे हे एक महत्त्वाचे अंग आहे.

कोव्हिडच्या काळात देखील अंगणवाडीच्या कामगारांकडून प्रचंड प्रमाणात अनौपचारिक आणि मोफत श्रम सरकारने करवून घेतले. घरोघरी राशन पोहोचवणे, दारोदारी जाऊन कोव्हिड सर्व्हे करणं, कोव्हिडच्या सुरक्षा उपाययोजनांची माहिती व प्रशिक्षण घरोघरी जाऊन देणं हे सर्व गेल्या दोन वर्षात अंगणवाडीच्या कामगारांनी केले आहे. अर्थातच इतर कामगारांप्रमाणे अंगणवाडी कामगारांना देखील सरकारने पीपीई किट वा इतर कोणतीही सुरक्षा साधने दिली नाहीत! अत्याधिक काम व अत्याधिक दुर्लक्ष अशा जात्यात देशभरातील अंगणवाडी कामगार गेली दोन वर्षे पिसून निघत आहेत.

### देशभरातील अंगणवाडी कामगारांचे लढे

गेल्या सहा महिन्यांत अनेक राज्यांतील अंगणवाडी कामगारांनी संप केले आहेत. सप्टेंबर मध्ये हिमाचल प्रदेशातील, ऑक्टोबर मध्ये उत्तराखंडमधील, नोव्हेंबर मध्ये केरळमधील, डिसेंबर मध्ये गोव्यामधील व उत्तर प्रदेशातील अंगणवाडी कामगारांनी संप आणि निदर्शने केली आहेत. देशभरातील ह्या अंगणवाडी कामगारांनी मानधनात वाढ व सरकारी कर्मचाऱ्याचा दर्जा ह्या समान मागण्यांबरोबरच इतर वेगवेगळ्या स्थानिक मागण्या देखील केल्या होत्या.

दिल्लीतील अंगणवाडी कामगारांनी देखील दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियनच्या नेतृत्वात 31 जानेवारी रोजी अनिश्चितकालीन संप सुरु केला. परंतु दिल्लीतील संप अनेक अर्थांनी देशभरातील इतर संपांपेक्षा वेगळा ठरला आहे.

### दिल्लीतील अंगणवाडी कामगारांचा झुंजार लढा

**दिल्लीतील अंगणवाडी कामगारांनी पुकारलेला हा पहिला संप नव्हे. 2017 मध्ये देखील** मानधनात वाढ करण्याची मागणी करत दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियनच्या नेतृत्वात दिल्लीच्या हजारो अंगणवाडी कामगारांनी संप केला होता. **भर पावसाळ्यात केलेला हा संप 58 दिवस चालला.** जवळ जवळ दोन महिने ऊन, पाऊस, थंडी व पोलिसांची दडपशाही सोसून अद्वितीय जिद्दीने लढून दिल्लीच्या अंगणवाडी कामगारांनी आपल्या एकीच्या बळावर **केजरीवाल सरकारला झुकवून आपले मानधन दुप्पट करून घेतले होते.**

त्यानंतरच्या पाच वर्षात अंगणवाडी कामगारांचे मानधन वाढलेलेच नाही. पाच वर्षात महागाईने मात्र सर्व विक्रम मोडले आहेत. म्हणजेच, खरेतर मानधनाच्या रूपात मिळणाऱ्या मजुरीचे वास्तव मूल्य कमी झाले आहे. दिल्ली मध्ये अंगणवाडी सेविकेचे मानधन महिन्याला 9,678 व मदतनिसाचे 4,839 रुपये आहे. इतक्या तुटपुंज्या रकमेत घर चालवणे तर सोडाच, दोन वेळच्या भाताची तजवीज होणे अशक्य आहे. अंगणवाडी कामगारांना सन्मानजनक जीवन जगता यावे ह्यासाठी सेविकेचे मानधन दर महिना 25,000 व मदतनीसांचे 20,000 करण्याची मागणी ह्या संपाद्वारे कामगारांनी केली आहे.

वर म्हटल्याप्रमाणे अंगणवाडीमध्ये काम करणाऱ्या कामगारांना सरकाच्या लेखी कामगार वा कर्मचारी समजलेच जात नाही, स्वयंसेवक म्हणून गणले जाते व ह्या युक्तीने त्यांचे सर्व तऱ्हेने अनौपचारिक शोषण केले जाते. त्यामुळेच सर्व अंगणवाडी कामगारांना नियमित केले जावे आणि अंगणवाडी कामगारांना सरकारी कर्मचाऱ्याचा दर्जा मिळावा व सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच पगारी सुट्टी, प्रॉविडेंट फंड, पेन्शन इत्यादी सुविधा मिळाव्यात ही ह्या संपातील कामगारांची दुसरी महत्त्वाची मागणी आहे.

एकीकृत बाल विकास सेवा सुरु झाली त्या काळात, म्हणजे 1975-90 च्या काळात आरोग्यव्यवस्था व बालसंगोपनात एक भाग सरकारच्या जबाबदारीचा असणे हे सर्वमान्य होते. परंतु नव्वदच्या दशकात खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचे (खाउजा) धोरण स्वीकारल्यावर सरकारने, मग ते कुठल्याही पक्षाचे असो, सर्वच क्षेत्रात निर्गुंतवणूक करणे व खाजगीकरणाला रान खुले करणे सुरु केले. एकीकृत बाल विकास सेवेत देखील सरकार टप्प्याटप्प्याने खाउजा धोरण लागू करत आहे. नव्या शिक्षण धोरणाने

पान 15 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित